- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : मंगळवार, ८ सप्टेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २६९ | किंमत : २ रूपये

**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# मराठा आरक्षण : समितीने शोधलेल्या ५८ लाख नोंदी ग्रामपंचायतींमध्ये प्रसिद्ध होणार

## १० सप्टेंबरपासून राज्यभरात विशेष शिबिरांचे आयोजन



## सेवानिवृत्त न्यायमूर्ती शिंदे समितीने शोधून काढल्या नोंदी

**वृत्तसंस्था, मुंबई**

मराठा आरक्षणाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने राज्य सरकारने एक अत्यंत महत्त्वाचा आणि मोठा निर्णय घेतला आहे. सेवानिवृत्त न्यायमूर्ती शिंदे समितीने शोधून काढलेल्या तब्बल ५८ लाख कुणबी नोंदी लवकरच राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये जाहीर केल्या जाणार आहेत. याचसोबत मराठा समाजातील नागरिकांना जात प्रमाणपत्रासाठी आवश्यक ती कागदपत्रे गोळा करता यावीत, यासाठी १० ते १७ सप्टेंबर दरम्यान राज्यभरात विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सोमवारी ही महत्त्वाची माहिती दिली. या संदर्भातील वृत्त एका वृत्तसंस्थेने दिले आहे.

मराठा आरक्षणाबाबत सरकारने घेतलेल्या विविध निर्णयांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सोमवारी मराठवाड्यातील प्रमुख जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांसोबत व्हर्च्युअल बैठक पार पाडली. या बैठकीत धाराशिव, बीड, छत्रपती संभाजीनगर, परभणी, हिंगोली, लातूर आणि जालना या जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी सहभागी झाले होते.

मराठा आरक्षणाचा विषय अत्यंत संवेदनशील असून महसूल प्रशासन आणि जिल्हा यंत्रणेने याकडे गांभीर्याने पाहावे, असे स्पष्ट निर्देश विखे पाटील यांनी दिले. विभागीय आयुक्त आणि सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी आपापल्या क्षेत्रात योग्य समन्वय राखून या प्रक्रियेत कुठेही अडथळा येणार नाही याची दक्षता घ्यावी, असे ते म्हणाले.

### थोडक्यात

## तीन बळी घेणारी वाघिण जेरबंद

**अमरावती:** गेल्या अकरा दिवसांत तीन जणांचे बळी घेणाऱ्या वाघिणीला बेशुद्ध करुन पिंजऱ्यात बंदिस्त करण्यात वनविभागाच्या पथकाला यश प्राप्त झाले आहे. शिरजगाव कसबा नजीक सोमवारी दुपारी शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यावर वाघिणीने हल्ला केला होता. त्यात या शेतकऱ्याचा मृत्यू झाला होता. त्यानंतर वनविभागाच्या पथकाने शोधमोहीम तीव्र केली होती. शिरजगाव कसबा येथील एका शेतातून या वाघिणीला जेरबंद करण्यात आले.

रविवारी सायंकाळी वाघिणीने चांदूर बाजार तालुक्यातील सोनोरी येथील शेतशिवारात एका १८ वर्षीय तरूणीवर हल्ला करून तिला ठार केले होते. त्यानंतर ड्रोनच्या सहाय्याने वाघिणीचा शोध सुरू करण्यात आला. वनविभागाचे कर्मचारी वाघिणीच्या हालचालींवर लक्ष ठेवून होते. परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर वाघिणीला बेशुद्धीकरणाचे इंजेक्शन देऊन बंदिस्त करण्याचा निर्णय घेण्यात आला. एका शेतात वाघिण थांबून असल्याची माहिती वन विभागाच्या पथकाला मिळाली होती. पुणे येथील रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्टचे पशुवैद्यक डॉ. हेमराज यांनी वाघिणीला यशस्वीपणे डार्ट करून बेशुद्ध केले. त्यानंतर वाघिणीला पिंजऱ्यात टाकण्यात आले. चांदूर बाजार तालुक्यात सातपूड्याच्या पायथ्याशी मार्गक्रमण करीत असलेल्या वाघिणीने सोमवारी शिरजगाव कसबा नजीक शेतात काम करीत असलेल्या शेतकऱ्यावर हल्ला केला.

# पावसाअभावी सोयाबीन संकटात, शेतकऱ्यांवर आर्थिक संकट

**वृत्तसंस्था, मुंबई**

राज्यातील विविध भागात पावसाचा खंड पडला आहे. गेल्या महिनाभरापासून व्यवस्थित पाऊस पडलेला नाही. पाऊस न पडल्याने शेत जमीन तापू लागली आहे. या हवामानाने शेतकऱ्यांवर मोठे संकट निर्माण झाले आहे. पावसाअभावी शेतकऱ्यांचे टेन्शन वाढले आहे. पाऊस पडत नसल्याने पैसा मिळवून देणारे सोयाबीन पीक हातातून जाणाच्या मार्गावर असल्याती भीती शेतकऱ्यांना वाटू लागली आहे. त्यामुळे पावसाची प्रतीक्षा करण्यापेक्षा दुसरा कोणताही उपाय शेतकऱ्यांच्या हाती नसल्याचे समोर येत आहे.एक महिन्यापासून अमरावती जिल्ह्यात पावसाचा खंड पडल्याने सोयाबीनचे पीक शेतकऱ्यांच्या हातातून जाण्याच्या मार्गावर आहे.

उन्हाळ्यासारखं ऊन तापत असल्याने आणि जमिनीत ओलावा नसल्याने सोयाबीन पीक धोक्यात आले आहे. सप्टेंबर महिन्याच्या कालावधीत सोयाबीन शेंगा भरण्याचा कालावधी असतो. मात्र पाऊसच



नसल्याने सोयाबीनची वाढ ही थांबली आहे. तसेच शेंगांचा भरणाही थांबला आहे. पुढील दोन-तीन दिवस पाऊस न आल्यास सोयाबीन पिके शेतक-यांच्या हातातून जाणार असल्याचा दावा करण्यात येत आहे.

### लातूरमध्ये शेतकऱ्याचा टोकाचा निर्णय

पावसाअभावी सोयाबीन करपले आहे. त्यामुळे लातूर जिल्ह्यातील पांढरवाडीत एका शेतक-याने सोयाबीनच्या पिकांत मेंढर चरायला सोडली आहेत. पावसाअभावी सोयाबीन हातून गेल्याने शेतकरी सतीश एरंडे यांनी आपल्या सोयाबीनच्या वावरात मेंढर सोडून दिली आहेत.

### सोलापुरात पिकावर ट्रॅक्टर फिरवण्याची वेळ

सोलापूर जिल्ह्यात पावसाअभावी संतप्त शेतकऱ्याने ५ एकरावरील सोयाबीनवर ट्रॅक्टर फिरवला आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यातील उळे गाव येथील शेतकरी संतप्त झाले आहेत. सोलापूर जिल्ह्यात गेल्या अनेक दिवसांपासून पावसाने दडी मारली आहे. त्यामुळे खरीप हंगामातील पिके धोक्यात आली आहेत. पावसाअभावी जळणाऱ्या सोयाबीन पिकावर ट्रॅक्टर फिरवण्याची वेळ शेतक-यावर आली आहे. विकास खंडागळे या शेतक-याने दोन महिन्यापूर्वी सोयाबीन पीक पेरण्यासाठी अडीच लाख रुपये खर्च केला होता. मात्र पावसाने दडी मारल्यामुळे आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे.

### उडदाच्या पिकावर फिरवले रोटर

दक्षिण सोलापूर तालुक्यात पावसाने पाठ फिरवल्यामुळे अनेक शेती पिके करपून जाण्याची भीती शेतकऱ्यांना वाटत आहे. दक्षिण सोलापुरात पावसाचा मोठा खंड पडल्याने शेतकऱ्यांना उडदाच्या पिकावर रोटर फिरवण्याची वेळ आली. दक्षिण सोलापुर तालुक्यातील संभाजी गाजरे या शेतकऱ्याने उडीद पिकावर रोटर फिरवला. पावसाअभावी तब्बल ५ एकर उडदावर शेतकऱ्याने वैतागून रोटर फिरवला. अवघ्या ६५ दिवसात उडदाचे पिक येत असल्याने शेतकऱ्यांचा खरीपा उडीदाकडे कल असतो.

### दोन एकर खरबूज उपसून टाकण्याची वेळ

गेल्या ५० दिवसांपेक्षा जास्त काळ पावसाने पाठ फिरवल्याने सांगोल्याची दुष्काळी स्थिती अधिकच गंभीर होऊ लागली असून पावसाच्या आशेवर टँकर मागून वाढविलेली पिके आता उपसून टाकण्याची वेळ बळीराजावर येऊ लागली आहे. सुरुवातीला काही दिवस पावसाच्या आशेवर हजारो रुपये खर्चून टँकरने ही पिके आणि बागा जीवंत प्रयत्न करण्यात आला. मात्र, पाऊस पूर्णच ठप्प झाल्याने बळीराजा हतबल होऊन शेतात लावलेल्या बागा आणि पिके उपसून टाकू लागला आहेत. टँकरने पीक जगवने अवघड असल्याची जाणीव झाल्यानंतर अखेर मजूर लावून नवनाथ याने आपल्या शेतातील फळाला आलेले दोन एकर खरबूज उपसून टाकले आहे.

# ॲमेझॉनच्या कार्गो विमानाचा अपघात, ५ ठार

**वृत्तसंस्था, न्यूयॉर्क**

अमेरिकेतील मियामी आंतरराष्ट्रीय विमानतळावर ॲमेझॉनच्या प्राईम एअर नेटवर्कसाठी कार्यरत असलेल्या बोईंग मालवाहू विमानाचा भीषण अपघात झाला. विमान धावपट्टीवर उतरल्यानंतर नियंत्रणाबाहेर जाऊन धावपट्टीवरून घसरले आणि अनेक वाहनांना धडकले. त्यानंतर विमानाला भीषण आग लागली. या दुर्घटनेत पाच जणांचा मृत्यू, तर पाच जण जखमी झाले आहेत. जखमींपैकी तिघांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. वृत्तानुसार, हा अपघात रविवारी स्थानिक वेळेनुसार दुपारी सुमारे २ वाजता झाला. हे विमान पोर्तो रिकोमधील लुईस मुनोज मारिन आंतरराष्ट्रीय विमानतळावरून उड्डाण करून मियामीला पोहोचले होते.

मियामी विमानतळावर उतरल्यानंतर विमान धावपट्टीवरून घसरले आणि त्याची अनेक वाहनांना धडक बसली. या वाहनांमध्ये काही लोक अडकले होते. विमानाचा पायलट आणि को-पायलटदेखील कॉकपिटमध्ये




अडकल्याची माहिती समोर आली. अपघाताची माहिती मिळताच मियामी-डेड फायर रेस्क्यूची ६० हून अधिक पथके घटनास्थळी दाखल झाली. बचावकार्य आणि आग नियंत्रणात आणण्यासाठी २०० हून अधिक आपत्कालीन कर्मचारी तैनात करण्यात आले. पथकांनी विशेष फोमचा वापर करून विमानाला लागलेली आग विझवली आणि वाहनांमध्ये तसेच विमानात अडकलेल्या लोकांना बाहेर काढले.

अपघातानंतर अनेक तास विमानातून इंधनाची गळती सुरू असल्याचेही सांगण्यात आले. दरम्यान, विमानात नेमके किती जण होते आणि जमिनीवर किती लोक या दुर्घटनेत प्रभावित झाले, याबाबत अधिकाऱ्यांनी अद्याप स्पष्ट माहिती दिलेली नाही.

### लँडिंगच्या वेळी विमानाचा वेग २०८ किमी प्रतितास

विमानांच्या हालचालींवर लक्ष ठेवणाऱ्या फ्लाइटरडार २४ या वेबसाइटच्या माहितीनुसार, विमान धावपट्टीच्या वापरण्यायोग्य भागाबाहेर गेले, त्यावेळी त्याचा वेग सुमारे ११२ नॉट्स म्हणजेच जवळपास २०८ किलोमीटर प्रतितास होता. विमान धावपट्टी क्रमांक ३० वर उतरले होते. मात्र, लँडिंगनंतर विमान वेळेत का थांबू शकले नाही, याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

# गोंदियात दहीहंडी उत्सवात मोठा अपघात, पायऱ्यांचा स्लॅब कोसळून २१ जखमी

## ६ जण गंभीर; गोंदिया जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी केले स्थलांतर, १६ जखमींवर उपचार करून रुग्णालयातून देण्यात आली सुट्टी, दहीहंडी पाहण्यासाठी स्लॅबवर मोठ्या संख्येने उभे होते नागरिक





**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

गोंदिया जिल्ह्यातील आमगाव येथे दहीहंडी उत्सवादरम्यान मोठा अपघात घडला आहे. अष्टविनायक दहीहंडी उत्सवासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी झाली असताना अचानक पायऱ्यांचा स्लॅब कोसळल्याने एकच खळबळ उडाली. दहीहंडी पाहण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिक आसपासच्या उंच ठिकाणी आणि पायऱ्यांच्या स्लॅबवर उभे होते. याचवेळी अचानक स्लॅब भराभर कोसळला आणि त्यावर उभे असलेले नागरिक खाली कोसळले.

या दुर्घटनेत एकूण २१ जण जखमी झाले आहेत. त्यापैकी ६ जण गंभीर जखमी असून, त्यांना पुढील उपचारासाठी गोंदिया जिल्हा रुग्णालयात स्थलांतरित करण्यात आले आहे. तर १६ जखमींवर आमगाव ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले असून, उपचारानंतर त्यांना रुग्णालयातून सुट्टी देण्यात आली आहे. गंभीर जखमींपैकी दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती समोर आली आहे. अपघातानंतर घटनास्थळी काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. नागरिक आणि आयोजकांनी तत्काळ मदतकार्य सुरू करून जखमींना रुग्णालयात दाखल केले.

आमगाव येथे अष्टविनायक दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात सुरू असताना अचानक हा धक्कादायक प्रकार घडला. दहीहंडी पाहण्यासाठी परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. गर्दीमुळे अनेक नागरिक आसपासच्या उंच ठिकाणी तसेच पायऱ्यांच्या स्लॅबवर उभे राहून दहीहंडीचा सोहळा पाहत होते. मात्र, अचानक पायऱ्यांचा स्लॅब भराभर कोसळला. स्लॅब कोसळताच त्यावर उभे असलेले नागरिक खाली पडले आणि घटनास्थळी एकच आरडाओरड सुरू झाली. या दुर्घटनेत २१ नागरिक जखमी झाले. जखमींना तातडीने आमगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

प्राथमिक उपचारानंतर १६ जखमींना रुग्णालयातून सुट्टी देण्यात आली, तर गंभीर जखमी असलेल्या ६ जणांना पुढील उपचारासाठी गोंदिया जिल्हा रुग्णालयात स्थलांतरित करण्यात आले आहे.

गंभीर जखमींपैकी दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. या दुर्घटनेनंतर उत्सवाच्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था आणि गर्दी नियंत्रणाचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे.

# एमपीएससी विद्यार्थ्यांचा पुण्यात आक्रोश मोर्चा!




**वृत्तसंस्था, पुणे**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कारभारातील कथित ढिसाळपणा, पेपरफुटी आणि निकालातील गोंधळाविरोधात आज पुण्यात एमपीएससीच्या हजारो विद्यार्थ्यांनी भव्य आक्रोश मोर्चा काढला. मोर्चात सहभागी झाल्यानंतर खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकारवर तीव्र शब्दांत टीका केली. मुलं रस्त्यावर उतरलेली असताना सरकारने त्यांचे ऐकून तरी घ्यायला हवे, चर्चेला बसायला हवे. विद्यार्थ्यांचा अर्धा वेळ अभ्यासिकेऐवजी रस्त्यावर आंदोलने करण्यात जात आहे, हे सरकारचे मोठे अपयश आहे, असा घणाघात सुळेंनी केला.

पेपरफुटीबाबत बोलताना त्या म्हणाल्या की, देशात टोफेल आणि जीआरई सारख्या परीक्षा होतात, तिथे पेपर फुटत नाहीत. एआय तंत्रज्ञान असतानाही पेपर फुटणे थांबत नाही, यावर माझा विश्वास नाही.

तसेच, देशात आणि राज्यात सुरू असलेल्या आर्थिक संकटावरून लक्ष विचलित करण्यासाठीच सरकार दोन धर्मांमध्ये भांडणे लावत असल्याचा आरोपही त्यांनी केला. सरकारने हट्टीपणा सोडून जबाबदार व्यक्तीला पाठवून विद्यार्थ्यांशी चर्चा करावी आणि जंतर-मंतर सारखा उद्रेक टाळावा, असे आवाहन त्यांनी केले.

संपादकीय लेखणीतून...

# दुष्काळमुक्त मराठवाडा

मराठवाडा कायमस्वरूपी दुष्काळमुक्त करण्याची मोठी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला जालना येथे केली असली तरी प्रत्यक्षात आज मराठवाड्यात दुष्काळ आ वासून उभा आहे. कोल्हापूर आणि सांगली परिसरातील पुराचे अतिरिक्त पाणी उजनी धरणात आणून त्यातील ३५ टीएमसी पाणी मराठवाड्यात आणण्याचे काम सुरू आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले होते. यासोबतच पश्चिम वाहिनी नद्यांचे समुद्राकडे वाहून जाणारे सुमारे ८० टीएमसी पाणी कोकणातून थेट मराठवाड्यात आणि गोदावरी खोऱ्यात वळविण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचेही फडणवीस म्हणाले होते. परंतु भविष्याच्या गप्पा मारण्यापेक्षा वर्तमानात काय वाढून ठेवले आहे ते बघितले पाहिजे. मराठवाड्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने विभागीय महसूल उपायुक्तांकडे करण्यात आली आहे.

मराठवाड्यातील सर्व छोट्या-मोठ्या प्रकल्पातील पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्यात यावे अशी मागणीही करण्यात आली आहे. मराठवाड्यातील चित्र अत्यंत गंभीर असून पावसाळ्याचे तीन महिने उलटूनही या भागातील एकाही जिल्ह्यात अपेक्षित प्रमाणात पाऊस झालेला नाही. जो थोडाफार पाऊस झाला होता त्या पावसावर शेतकऱ्यांनी पेरणी केली. परंतु गत दीड-दोन महिने कोरडे गेल्याने शेतकऱ्यांनी पेरलेली पिके धोक्यात आली असून खरीप हंगामातील पिके वाळून गेली आहेत. त्यामुळे शेतकरी आर्थिक व मानसिकदृष्ट्या मोठ्या संकटात आहे. सप्टेंबर महिन्यातही पाऊस कमी पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे तात्काळ पंचनामे करून त्यांना मदत द्यावी. मराठवाड्यातील ग्रामीण भागातील शेतमजूर, भूमिहीन कुटुंबांना रोजगाराची व्यवस्था रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून उपलब्ध करून द्यावी अशी मागणी होत आहे, मराठवाड्यातील सर्व तलावांतील पाणीसाठा हा भविष्यातील पाणीटंचाईच्या अनुषंगाने आरक्षित करणे आवश्यक आहे. शासनाने दुष्काळी परिस्थितीची दखल घेऊन शेतकऱ्यांना तात्काळ मदत करणे गरजेचे आहे. राज्यात पावसाने पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे.अनेक भागात उभी पिके पाण्याअभावी करपू लागली आहेत. गत तीन महिन्यांपासून पावसाने दडी मारल्याने सोयाबीन, बाजरी, कपाशी, तूर, मूग, उडीद आणि ऊस पिकांवर संकट आले आहे. ऐन मोक्याच्या क्षणी पावसाने ओढ दिल्याने निर्माण झालेली परिस्थिती थेट पीक उत्पादकतेवर गदा आणणारी ठरणार आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते आणि माजी आमदार धिरज देशमुख यांनी लातूरसह संपूर्ण मराठवाडा आणि महाराष्ट्रातील दुष्काळसदृश भागामध्ये कृत्रिम पाऊस (क्लाऊड सिडिंग) पाडण्याची मागणी सरकारकडे केली आहे. पावसाने डोळे वटारल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. पिके वाया जाण्याच्या मार्गावर आहेत. अशा वेळी केवळ पावसाची वाट पाहत बसण्यापेक्षा सरकारने उपलब्ध असलेल्या वैज्ञानिक आणि तांत्रिक पर्यायांचा तातडीने वापर करण्याची गरज आहे. हे तंत्रज्ञान हमखास पाऊस पाडेल, असा दावा नाही, मात्र योग्य हवामान आणि ढगांची परिस्थिती उपलब्ध असेल, तर हा पर्याय तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली नक्कीच तपासून पाहिला पाहिजे. शेतकरी संकटात असताना सरकारकडे उपलब्ध असलेला प्रत्येक वैज्ञानिक पर्याय वापरला गेला पाहिजे, असे धिरज देशमुख यांनी म्हटले आहे.

कृत्रिम पावसाच्या प्रयोगामुळे शेतकऱ्यांना थोडाफार दिलासा मिळू शकतो. यंदाच्या मान्सून हंगामाने शेतकऱ्यांची कठोर परीक्षा घेतली आहे. ऑगस्ट महिन्यात काही भागात चांगला पाऊस झाला असला तरी देशातील एकूण पावसाची तूट १४ टक्क्यांवर पोहोचली आहे. असमान आणि अनियमित पावसामुळे खरीप पिकांच्या पेरणीवर परिणाम झाला आहे. भाताच्या क्षेत्रात ३ टक्क्यांहून अधिक घट झाली आहे तर मक्याच्या क्षेत्रात ४ टक्क्यांपेक्षा अधिक घट झाली आहे. देशातील १२ राज्यांमध्ये पावसाची तूट २० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. बिहार, आंध्र प्रदेश, मेघालय, मणिपूर आणि अरुणाचल प्रदेशामध्ये ही तूट ४० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. १ जून ते २९ ऑगस्टदरम्यान महाराष्ट्रात पावसाची तूट सुमारे १० टक्के आहे, तर मराठवाड्यात २८ टक्के आणि विदर्भात २४ टक्के आहे. याचा फटका खरीप पिकांना बसला असून विविध भागात दुष्काळ जाहीर करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

# पाकिस्तान: अण्वस्त्रांचे नियंत्रण आता थेट लष्करप्रमुखांकडे

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

पाकिस्तानात लष्कराचे वर्चस्व अधिक बळकट करणारा एक वादग्रस्त निर्णय घेण्यात आला आहे. पाकिस्तानच्या इतिहासात प्रथमच एकाच लष्करी अधिकाऱ्याकडे भूदल नौदल आणि हवाई दल अशा तीनही सैन्य दलांची कायदेशीर कमान सोपवण्यात आली आहे. 'डिफेन्स फोर्सेस ऑफ पाकिस्तान अ‍ॅक्ट, २०२६' आणि 'नॅशनल कमांड अथॉरिटी अ‍ॅक्ट' मध्ये मोठे बदल मंजूर केले आहेत. यानुसार, पाकिस्तानचे लष्करप्रमुख फील्ड मार्शल असीम मुनीर आता देशाचे पहिले 'चीफ ऑफ डिफेन्स फोर्सेस' बनले असून, त्यांच्याकडे देशाच्या अण्वस्त्रांचे थेट नियंत्रण सोपवण्यात आले आहे. या कायद्याने लष्कर प्रमुख मुनीर यांच्या हाती आता अण्वस्त्रांचा ताबा असेल. फिल्ड मार्शल मुनीर हे पाकिस्तानचे पहिले सीडीएफ बनले असून ते लष्कर प्रमुखा सोबतच या नव्या पदाची धुरा सांभाळतील.

नव्या कायद्यानुसार, पाकिस्तानच्या अण्वस्त्रांवर देखरेख आणि नियंत्रण ठेवण्यासाठी 'नॅशनल स्ट्रेटेजिक कमांड'ची स्थापना करण्यात आली आहे, जी थेट असीम मुनीर यांना रिपोर्ट करेल. यापूर्वी पाकिस्तानच्या अण्वस्त्रांच्या वापराबाबतच्या निर्णय प्रक्रियेत देशाच्या पंतप्रधानांचा महत्त्वाचा सहभाग असायचा. मात्र, आता पंतप्रधानांची भूमिका केवळ 'माहिती घेण्यापुरती' मर्यादित राहिली असून, अण्वस्त्रांचे मुख्य नियंत्रण मुनीर यांच्याकडे गेले आहे.

संरक्षण तज्ज्ञांच्या मते, हा बदल म्हणजे पाकिस्तानमध्ये लोकशाही आणि नागरी नियंत्रणाला धक्का देऊन लष्कराचे वर्चस्व कायदेशीररीत्या प्रस्थापित करण्याचा एक भाग आहे. अण्वस्त्रांचे नियंत्रण एकाच लष्करी अधिकाऱ्याच्या हाती केंद्रित झाल्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर आणि विशेषतः भारतासाठी सुरक्षेच्या दृष्टीने चिंता व्यक्त केली जात आहे.

असीम मुनीर यांच्याकडे एकहाती सत्ता आल्यामुळे भारताला सीमेवर अधिक सतर्क राहावे लागेल.

जनरल मुनीर यांनी यापूर्वी भारताला जाहीरपणे अण्वस्त्रांची धमकी दिली आहे ("आम्ही बुडालो, तर अर्धे जग सोबत घेऊन बुडू"). तसेच भारताच्या पायाभूत सुविधांना (जसे की धरणांना) लक्ष्य करण्याची विधानेही त्यांनी केली आहेत. भारताने यापूर्वीच स्पष्ट केले आहे की भारत अशा प्रकारच्या कोणत्याही 'न्यूक्लियर ब्लॅकमेलिंग' (अण्वस्त्रांच्या धमक्यांना) बळी पडणार नाही. भारताकडे सक्षम 'न्यूक्लियर ट्रायड' (जमीन, हवा आणि पाण्यातून अण्वस्त्र डागण्याची क्षमता) आहे. पाकिस्तानातील या 'सॉफ्ट कूप' (कायदेशीर बंडाने) मुळे असीम मुनीर हे २०३० पर्यंत पाकिस्तानचे सर्वेसर्वा बनले आहेत. यामुळे सीमेवर अनपेक्षित तणाव वाढू शकत असल्याने भारतीय सुरक्षा यंत्रणांना अधिक सतर्क राहावे लागणार आहे.

पाकिस्तानच्या अंतर्गत अस्थिरतेमध्ये अण्वस्त्रांचे नियंत्रण एका महत्त्वाकांक्षी जनरलाकडे जाणे हे केवळ भारतासाठीच नव्हे, तर जागतिक शांततेसाठी चिंतेची बाब आहे. संपूर्ण देशाची आणि अण्वस्त्रांची सूत्रे लष्कराच्या ताब्यात गेली आहेत, ज्यावर जागतिक स्तरावरून चिंता व्यक्त केली जात आहे.

पाकिस्तान नेहमीच आपल्या अण्वस्त्रांच्या सुरक्षेबाबत जागतिक स्तरावर प्रश्नांच्या फेऱ्यात राहिला आहे. देशातील राजकीय अस्थिरता आणि आर्थिक संकट पाहता, लष्कराने संपूर्ण नियंत्रण स्वतःकडे घेणे हा त्यांचा अंतर्गत सुरक्षेचा भाग असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, यामुळे पाकिस्तानमधील लोकशाही व्यवस्था आणखी कमकुवत होण्याची आणि लष्करशाही अधिक मजबूत होण्याची भीती तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

– ९५६१५०४३०६

# अत्याधुनिक युगात वाढत्या गंभीर समस्या लक्षात घेता, सामाजिकदृष्ट्या साक्षर होणे गरजेचे!

रमेश लांजेवार
नागपूर

१९६५ मध्ये ८ ते १९ सप्टेंबर दरम्यान इराणची राजधानी तेहरान येथे जगभरातील शिक्षणमंत्र्यांची एक बैठक झाली. यानंतर १९६६ साली संयुक्त राष्ट्रसंघाने शिक्षणप्रणालीमध्ये जागरूकता वाढावी याउद्देशाने ८ सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. तेव्हापासुन जगभरात ८ सप्टेंबरला दरवर्षी साक्षरता दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.म्हणजेच देशाची प्रगती असो वा स्वतःची प्रगती असो शिक्षण अत्यंत महत्त्वाचे असते. हाच उद्देश साक्षरतेचा आहे. कारण यातुनच आयुष्याची जडणघडण निर्माण होते व मन्युष्य घडतो.आज अनेक देश प्रगतीपथावर आहेत.परंतु आफ्रिका आणि आशिया खंडात साक्षरतेचे प्रमाण कमी दिसून येते.याचे मुख्य कारण म्हणजे अशिक्षितपणा, बेरोजगारी, भुकमरी, कुपोषण व जंगली जीवन आहे.

आजही भारत पुर्णपणे साक्षर नाही. याकरीता सरकारला मोठे अभियान चालविण्याची गरज आहे.भारत सध्याच्या परिस्थितीत फक्त ७० टक्के साक्षर आहे. देशात साक्षरतेच्या अभावामुळेच शेतकऱ्यांच्या आत्महत्यां होत आहे. त्या थांबविण्याचा संकल्प ८ सप्टेंबरला घेऊन साक्षरता अभियान युध्दपातळीवर व्हायला पाहिजे. कारण बदलत्या काळानुसार १०० टक्के साक्षर होणे गरजेचे आहे.भारतातील केरळ हे असे एकमेव राज्य आहे की ते १०० टक्के साक्षर आहे. आजच्या परिस्थितीत ज्या देशात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे तो देश मागासलेल्या देशाच्या रांगेत येतो. भारतातील आदीवासी भाग व अती दुर्गम भाग अजून पर्यंत साक्षर नाहीत.त्यामुळे त्यांना अनेक कठीण प्रसंगांचा सामना करावा लागतो. साक्षरतेच्या अभावामुळे देशातील अनेक दुर्गम भागातील राज्यात नक्षलवादाचा किंवा गुन्हेगारांचा जन्म होतो. अती दुर्गम भागात पोषक आहाराची व योग्य शिक्षणाची गरज आहे अन्यथा येथुनच कुपोषण, भुकमरी, वाममार्ग व आत्महत्येचा उदय होत असतो. भारतातील वाढती लोकसंख्या ही साक्षरतेच्या अभावामुळेच निर्माण झालेली मोठी समस्या आहे.

भारतातील वाढत्या लोकसंख्येमुळे धर्मा-धर्मात कटुता निर्माण होते आणि धर्माच्या नावावर लोकसंख्या वाढवीण्याची शर्यत लागते. यामुळेच भारताला लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी मोठी अडचण निर्माण होत आहे. भारतातील वाढती लोकसंख्या नियंत्रीत ठेवण्यासाठी भारताने साक्षरता अभियान युध्दपातळीवर राबवायला हवे. जगातील अनेक देश प्रगतीपथावर आहेत. आज प्रत्येक देशाजवळ मोठ्या प्रमाणात दारुगोळा आणि अत्याधुनिक शस्त्रसामग्रीचा साठा आहे. परंतु जर तो देश साक्षर नसेल तर काय फायदा! असे देश मागासल्यामध्ये गणल्या जातात. आज पाकिस्तान फक्त ३० टक्के साक्षर आहे.त्यामुळे तो गेल्या ७९ वर्षाच्या काळात तो कवडीचीही प्रगती करू शकला नाही. पाकिस्तानने फक्त आतंकवाद्यांना खतपाणी घालण्याचे काम केले व आताही करीत आहे व याचा परिणाम आज संपूर्ण पाकिस्तान रक्ताच्या लाथोळ्यात लथफतलेला दिसून येतो. त्यामुळेच आज पाकिस्तानाच्या हातात भिकेचे ढोबर दिसून येते व आजच्या परिस्थितीत पाकिस्तान जगातील आतंकवाद्यांचे माहेरघर बनले आहे. जगातील प्रत्येक देशांनी ८ सप्टेंबर आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाचे औचित्य साधून प्रत्येक देशांनी साक्षरता अभियान युध्दपातळीवर चालवायला पाहिजे. यामुळे देश प्रगतीपथावर येईल. आजच्या यांत्रिकी युगात युवावर्ग मोबाईलमध्ये गर्क असतो. त्यामुळे नवीन नवीन अनेक व्याधी निर्माण होवू शकते याला नाकारता येत नाही.याकरिता साक्षरतेच्या माध्यमातून जनजागृती करून मोबाईल पासून होणाऱ्या नुकसानाबद्दल सूध्दा जागृती करणे आज गरजेचे आहे.

आज स्वीडनमध्ये दोन वर्षांखालील मुलांना मोबाइल, टीव्ही पाहण्यास बंदी घालण्यात आली आहे. देशाच्या सार्वजनिक आरोग्य संस्थेच्या मते स्क्रीनचा वापर शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम



करत असल्याने लहान मुलांना डिजिटल मीडिया आणि टेलिव्हिजनपासुन पूर्णपणे दूर ठेवले पाहिजे. हा संपूर्ण परीणाम साक्षरतेच्या अभावामुळे निर्माण झाल्याचे दिसून येते. साक्षरता म्हणजे फक्त शिक्षण नसुन आपुलकी, खान-पाण, रहाणीमान,देशाचा विकास, पारिवारिक सुख-दुःख, सुविधा, परिपक्वता, संस्कृती, आरोग्याची काळजी, अति दुर्गम भागातील विकास,सोशल मिडियापासुन लहान मुलांवर होणारे दुष्परिणाम ह्या संपूर्णबाबी साक्षरतेमध्ये मोडत असतात. आज संपूर्ण जग बारूदच्या ढिगाऱ्यावर बसलेले आहे. त्यामुळे पृथ्वी नष्ट व्हायला काहीच वेळ लागणार नाही. आज जगात महाप्रलय, भुकंप, सुनामी, अतिउष्णता, भुस्खलन, अतिथंडी, ज्वालामुखीचा उद्रेक या संपूर्ण विनाशकारी घटना मानवाने स्वतःहून ओढवल्या आहेत. जगात सध्याच्या परिस्थितीत जंगलतोड व हिमालयातील विकासकामे मोठ्या प्रमाणात सुरू आहे यामुळे पृथ्वीतलावरील सर्वांचा जीव धोकादायक स्थितीमध्ये आल्याचे दिसून येते. या सुध्दा साक्षरतेच्या अभावामुळेच निर्माण झालेल्या समस्या आहेत.

आंतराष्ट्रीय साक्षरता दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात साक्षरता अभियान छेडुन मानवजाती, जिवजंतु, पर्यावरण व निसर्ग यांना वाचविले पाहिजे. कारण मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे त्यामुळे तो स्वतःच्या स्वाथार्साठी कोणत्याही स्तरावर जात असतो अशा परिस्थितीत तो मागचा-पुढचा कुठलाही विचार करीत नाही व याचा दुष्परिणाम संपूर्ण मानवजातीला व जीवसृष्टीला भोगावा लागतो. या संपूर्ण बाबी साक्षरतेच्या अभावामुळे निर्माण झाल्याचे दिसून येतो. त्यामुळे साक्षरतेमध्ये सर्वच स्तरातून विचार व्हायला हवा. अम्याझॉनसारखे जंगल जळने, वनवे लागले, महाप्रलय येणे हे सर्व साक्षरतेच्या अभावामुळे निर्माण झालेली परिस्थिती आहे असे मला वाटते. निसर्गाचे वाटोळे मानवाने केले, जंगल संपदा मानवाने नष्ट केली, हिमालयात सुरूंग लावण्याचे काम मानवाने केले व नवीन-नवीन समस्या मानवाने निर्माण केल्या यामुळेच आज पृथ्वीचे संतुलन डगमगले आहे.

मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी पृथ्वीच्या पोटातील संपूर्ण पाणी निचोडुन टाकले यामुळेच आज अनेक देश पीण्याच्या पाण्यासाठी रेडझोनमध्ये आल्याचे दिसून येते. याला साक्षरतेच्या माध्यमातून जनजागृती करून वाचविले पाहिजे. याकरिता जगातील प्रत्येक देशांना युध्दपातळीवर प्रयत्न करण्याची गरज आहे. आज प्रत्येक देश युद्धासाठी सज्ज आहे त्यापध्दतीने प्रत्येक देशांनी आपली तयारी केली आहे. म्हणजे जग आज तिसऱ्या महायुध्दाच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचले आहे. याला साक्षरता अभियानाच्या माध्यमातून थांबविले पाहिजे. जगातील प्रत्येक देशांनी प्रगती अवश्य करावी. परंतु मानवजातीच्या कल्याणासाठी व जे निसर्गाच्या सानिध्यात रहातात (पशुपक्षी, वण्यप्राणी) त्यांच्यावर कोणताही प्रकारचा अन्याय होणार नाही याचीही काळजी घेतली पाहिजे. यातच आपल्या खरा आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस दिसून येईल.चारित्र्य बनविण्यासाठी, चांगले व्यक्तीत्व निर्माण करण्यासाठी जो कोणी प्रयत्न करेल तोच खरा साक्षरतेचा भागीदार आहे. ८ सप्टेंबर आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवसाचे औचित्य साधून जगभरातील प्रत्येक देशांनी साक्षरता अभियानासोबत बदलत्या हवामानावर मात करण्यासाठी वृक्षलागवड अभियान युध्दपातळीवर चालवायला पाहिजे. यामुळे निसर्ग प्रफुल्लित रहाण्यास मोठी मदत होईल जय हिंद!

– ९९२१६९०७७९

# नागपुरची जगावेगळी लोकपरंपरा 'मारबत'

शशिकांत तोटे
दारव्हा, जि.यवतमाळ

महाराष्ट्र सांस्कृतिकदृष्ट्या विविध परंपरेने नटलेला आहे. जत्रा, यात्रा,मिरवणूका, सण-उत्सव हे महाराष्ट्राचे सांस्कृतिक लोकवैभव. गतिमान बदलत्या काळात अनेक परंपरा आज लुप्त झाल्यात;तर काही अद्यापही तग धरून आहे. बहुतांश ठिकाणी ग्रामीण जीवनातील लोकपरंपरा आजही कायम दिसते.परंतु शहरी भागातील लोकपरंपरा जतन असल्याचा प्रसंग अथवा क्षण अभावानेच सापडतो. अशापैकीच एक लोकपरंपरा राज्यातील नागपूर शहराने अबाधीत ठेवली आहे.

बैलपोळा सणाच्या पाडव्याला नागपूरात काळी आणि पिवळी मारबत मिरवणूक निघते. हा उत्सव सार्वजनिक असतो.भारतात इंग्रजांचे राज्य असताना लोकांना एकत्र येणार बंदी होती.परंतु धार्मिक कार्यावर इंग्रजांचा हस्तक्षेप नव्हता. त्यामुळे धार्मिक कायार्साठी लोकांना एकत्र येत असल्याने लोकमान्य टिळकांनी राष्ट्रवादी विचारांच्या प्रचाराच्या उद्देशाने पुण्यात १८९३ साली सार्वजनिक गणेशोत्सवाचा प्रारंभ केला. परंतु नागपुरात त्याही पूर्वी १९८१ पासूनचं मारबत उत्सवाला प्रारंभ झाला होता.

## मारबतचा पूर्व इतिहास

ब्रिटिश राजवटीत लोक त्यांच्या अन्याय अत्याचाराने त्रस्त होते. त्यावेळी देश स्वातंत्र व्हावा या लोक भावनेतून पिवळी मारबत सुरू केली, तर इंग्रज शासनाला बाकाबाई भोसले (भोसले राजकारणातील) ही इंग्रजांना जाऊन मिळाली. त्यामुळे बाकाबाईचे प्रतीकात्मक रूप म्हणून काळी मारबत सुरू करण्यात आली. मुळात या मारबतीची परंपरा ही आदिवासींची आहे असे सांगितले जाते.

## पिवळी मारबत व स्वरूप

पिवळी मारबत या संकल्पने मागे द्वापार युगातील कृष्ण अवताराची कथा सांगितली जाते. त्यानुसार दुष्टकंसाने बाल कृष्णाला मारण्यासाठी पूतना नामक राक्षसनीला पाठविले होते. ती आपल्या स्तनाला विष लावत बालकृष्णाला स्तनपान करविते. परंतु श्रीकृष्णाने तिच्या प्रत्युत्तरात शाप दिला की, कलियुगात तिचे पूजन केले जाईल.हीच ती पिवळी मारबत होय.मारबत म्हणजे धिंड काढणे होय.पूर्वी धिंडीचे स्वरूप होते. परंतु नंतरच्या काळात तिला देवी म्हणून पूजा केली जाते. स्त्रिया तिची ओटी सुद्धा भरतात. तिची स्थापना पाच दिवसाआधी केली जाते व मारबतीतील मूर्ती बनविण्यासाठी दरवर्षी नागपंचमीला प्रारंभ होतो. त्यासाठी प्रथम काठ्या व बांबूचा ढाचा बनविला जातो, त्यावर कागद रंग लावून पिवळे स्वरूप दिले जाते. धार्मिक स्वरूप बघून ब्रिटिशांचा त्याकाळी विरोध नव्हता. पुढे काळी मारबत सुद्धा सुरू झाली.

## काळी मारबत इतिहास व स्वरूप

नागपूर येथील महाराणी बाकाबाई सन १७९० ते १८५८ या नागपूर घराण्याचे राजे रघुजी भोसले (दुसरा) यांच्या पत्नी होत्या. रघुजी राजे या अल्पवयीन राजाला दत्तक घेऊन राज्यकारभार केला. हे दत्तक विधान लॉर्ड डलहौसीने नामंजूर करूनही तिने इंग्रजांशी हात मिळवणी केली. त्यामुळे १८५७ चा उठाव यशस्वी होऊ शकला नाही. तिच्या या निषेधार्थ म्हणून ही काळ्या रंगाची काळी मारबत काढण्यात येते. असा पूर्व इतिहास सांगितला जातो. त्यामध्ये अनेकांचे आजही मतभेद कायम आहेत.

## बडग्यांचा इतिहास व स्वरूप

अनेक वाईट विचार, प्रसंग, घटना, प्रसंगांना मूकपणे तटस्थपणे धिक्कार न करता बघणाऱ्यांचा प्रतीकात्मक रूप निषेध म्हणजे बडगे होय. या बडग्यांच्या गळ्यात मोडके झाडू, फाटके कपडे, फुटके डब्बे, टायरचे तुकडे त्यांच्या माळा गळ्यात घालतात. बडग्याच्या हातात मुसळ आणि कमरेला उखळ बांधलेले असते. एकंदरीत त्यांच्या कृतीचे निषेध म्हणून प्रतीकात्मक स्वरूप बडग्यांचे असते.

पौराणिक आणि अनिष्टेपासून सकारात्मकतेकडे नेणारी मारबत मिरवणूक असते. वाईट परंपरा, रोगराई, संकट, समाजातून नष्ट व्हाव्यात आणि चांगल्या गोष्टींचे स्वागत करण्यासाठी नागपूरकरांचे मारबत लोकोत्सव असतो . या मिरवणुकीच्या दरम्यान "ईडा,पिडा,रोगराई, जादूटोणा, महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, अत्याचारी घेऊन जागे मारबत..!" असे म्हणत



समाजातील वाईट गोष्टींना संपविण्याचा सामूहिक प्रयत्न असतो. तसेच राजकारणातील व समाजातील चुकींच्या लोकांच्या मानसिकतेचा विचारांचा विरोध व निषेध यावेळी सामूहिकरीत्या केल्या जातो. या उत्सवात राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील मुद्द्यांसह स्थानिक समस्यांवर भाष्य करणारे फलक, सूचना, ओळी, जनतेच्या मनातील प्रशासनाच्या विरोधातील राग आणि संतापही व्यक्त होतो. या निमित्ताने समाजातील वाईट चालीरीती, प्रथा दूर करण्याचे साकडे मारबताकडे घातले जाते. अखेर या मारबतीचे दहन केले जात. त्यानंतर परत नव्याने सकारात्मकतेची सुरुवात होते असा समज आहे. अशी ही अनोखी ही लोकपरंपरा संपूर्ण देशाच्या पातळीवर नागपुरात आजही कायम आहे.

– ९१३०८३५४५८

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# गणेशोत्सव मंडळांच्या मागणीला नितीन गडकरींचा सकारात्मक प्रतिसाद

## मंडळांनी ढोलताशा वादन कार्यक्रमासाठी ९ तारखेपर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
येत्या १४ सप्टेंबरपासून गणेशोत्सवाला प्रारंभ होत असून, शहरात सांस्कृतिक वातावरण निर्माण व्हावे, या उद्देशाने खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीने गणेशोत्सवादरम्यान विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यंदा गणेशोत्सव मंडळांकडून ढोलताशा वादनाची मोठ्या प्रमाणात मागणी होत असल्याने मंडळांच्या आग्रहास्तव केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीला ढोलताशा वादनासाठी मंडळांच्या नोंदणीची प्रक्रिया सुरू करण्याच्या सूचना केल्या आहेत.

गणेशोत्सव मंडळांनी ढोलताशा वादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी आपली नावे ८ व ९ सप्टेंबर रोजी दुपारी १२ ते सायंकाळी ४ या वेळेत गडकरी वाडा, महाल, नागपूर येथे संपर्क साधून नोंदवावी, असे आवाहन खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीतर्फे करण्यात आले आहे. ज्या मंडळांना यापूर्वीच कार्यक्रमांचे वाटप झाले आहे, त्यांनी या नोंदणी प्रक्रियेत सहभागी होऊ नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून कला, साहित्य, संस्कृती आणि परंपरांचा प्रचार-प्रसार व्हावा, तसेच गणेशोत्सवाच्या माध्यमातून विविध गणेश मंडळांना सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध व्हावे, या उद्देशाने खासदार सांस्कृतिक महोत्सव समिती, नागपूरच्या वतीने गेल्या चार वर्षांपासून शहरात सांस्कृतिक गणेशोत्सव साजरा करण्यात येतो. यंदाही गणेशोत्सवादरम्यान विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करू इच्छिणाऱ्या स्थानिक गणेश मंडळांना आवाहन करण्यात आले होते. त्याला मंडळांकडून भरघोस प्रतिसाद मिळाला आहे.

भक्तिसंगीत, सुगम संगीत, देशभक्तिपर गीते, हास्य कविसंमेलन, जागरण, गोंधळ, कीर्तन, लोकनृत्य, शास्त्रीय नृत्य, एकपात्री प्रयोग, नाट्यप्रयोग, नकला, गीत रामायण, जादूचे प्रयोग, रांगोळी प्रशिक्षण वर्ग, मेंदी प्रशिक्षण वर्ग, कथाकथन आदी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यासाठी कलाकार आणि सांस्कृतिक संस्थांच्या तयारीला वेग आला आहे.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी खासदार सांस्कृतिक महोत्सव आयोजन समिती, नागपूरचे अध्यक्ष प्रा. अनिल सोले, उपाध्यक्ष डॉ. गौरीशंकर पाराशर, अशोक मानकर, दिलीप जाधव, सचिव जयप्रकाश गुप्ता, कोषाध्यक्ष प्रा. राजेश बागडी, सदस्य बाळासाहेब कुलकर्णी, हाजी



अब्दुल कदीर, सारंग गडकरी, अविनाश घुशे, डॉ. दीपक खिरवडकर, संदीप गवई, संजय गुळकरी, रेणुका देशकर, गुड्डू त्रिवेदी, किशोर पाटील, चेतन कायरकर, आशिष वांदिले, भोलानाथ सहारे, ॲड. नितीन तेलगोटे, मनिषा काशीकर, विजय फडणवीस, महेंद्र राऊत, दिलीप गौर, शैलेश ढोबळे, संजय बंगाले, अतुल गुरू, योगेश बन आणि राजू कनाटे यांचे सहकार्य लाभत आहे.

## ज्येष्ठ निवेदक किसन शर्मा यांचा सत्कार व मुलाखत

### विदर्भ साहित्य संघातर्फे 'संवादयात्रा'चे ९ सप्टेंबर रोजी आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** विदर्भ साहित्य संघाच्यावतीने 'संवादयात्रा' या उपक्रमांतर्गत नागपूरचे ज्येष्ठ निवेदक किसन शर्मा यांच्या सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्यानिमित्त विशेष सत्कार व मुलाखतीचे आयोजन बुधवार, ९ सप्टेंबर रोजी करण्यात आले आहे. महाराष्ट्र राष्ट्रभाषा संकुलातील श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृहात सायंकाळी ५ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमात विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांच्या हस्ते किसन शर्मा यांचा सत्कार करण्यात येईल. माजी प्रसिद्ध ज्येष्ठ संपादक बाळ कुळकर्णी हे किसन शर्मा यांची प्रकट मुलाखत घेतील. माजी संपादक श्रीपाद अपराजित यांची यावेळी उपस्थिती राहील. आकाशवाणीच्या माध्यमातून कारकिर्दीला सुरुवात करणारे किसन शर्मा आपल्या प्रभावी निवेदनशैलीमुळे विदर्भातील 'अमीन सयानी' म्हणून परिचित होते. चित्रपटसृष्टीतील अनेक दिग्गज अभिनेते, लेखक, संगीतकार, दिग्दर्शक तसेच तंत्रज्ञांशी त्यांचे निकटचे संबंध राहिले आहेत. या मुलाखतीच्या माध्यमातून त्यांच्या प्रदीर्घ कारकिर्दीतील अनुभव, आठवणी तसेच माध्यम क्षेत्रातील प्रवासाला उजाळा मिळणार आहे. या विशेष सोहळ्याला नागरिक, साहित्यप्रेमी व रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.



## सावनेर पोलिसांच्या गणेशोत्सव मंडळ व साऊंड चालक, मालकांना विशेष सुचना

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**
पोलीस स्टेशन सावनेर येथे सागर खर्डे सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सांगणार यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय अधिकाऱ्यांसोबत गणेश मंडळ व साऊंड सिस्टिम वाजविणारे चालक मालक व ऑपरेटर यांची बैठक घेण्यात आली बैठकीमध्ये सार्वजनिक उत्सव साजरा करण्या संबंधात अडचणी बाबत चर्चा करून उपयोजना करण्याबाबत चर्चा करण्यात आली.कायदा व सुव्यवस्था राखण्याचे दृष्टिकोनातून मार्गदर्शन करण्यात आले माहिती सविनय सादर आहे.



## ऐतिहासिक 'मारबत महोत्सवाच्या' अनुषंगाने दोन दिवसीय भव्य छायाचित्र स्पर्धा व प्रदर्शनी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपूरची पारंपारिक आणि ऐतिहासिक ओळख असणारी 'मारबत' आता केवळ शहरापुरती मर्यादित न राहता देशभरात पोहोचली आहे. काळी व पिवळी मारबत या पारंपरिक नावाने सुरू झालेली ही परंपरा आज विविध स्वरूपांत साजरी केली जाते. मारबत महोत्सवच्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिकेच्या वतीने येत्या १० व ११ सप्टेंबर रोजी कविवर्य सुरेश भट सभागृह, तळमजल्यावरील प्रदर्शन हॉल, येथे सकाळी १०:०० ते रात्री ८:०० वाजेपर्यंत एका भव्य छायाचित्र स्पर्धा व प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांतील मारबतीचे दुर्मिळ फोटो गोळा करून त्याचे सार्वजनिक प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. अशी माहिती स्थायी समिती सभापती श्रीमती शिवानी दाणी वखरे यांनी दिली आहे.

महापौर निता ठाकरे यांच्या मार्गदर्शनात व उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, सत्तापक्ष नेते नरेंद्र(बाल्या) बोरकर, मनपा आयुक्त डॉ. विपीन यांच्यासह क्रीडा विशेष समिती सभापती दर्शनी धवड यांच्या देखरेखीत मारबत व बडग्या महोत्सवाची तयारी केल्या जात आहे. या विशेष छायाचित्र स्पर्धा व प्रदर्शनीचे संपूर्ण संयोजन 'ऑरेंज सिटी फोटोग्राफर क्लब'तर्फे गजानन रानडे पाहणार आहेत. त्यांच्या संग्रही असलेले मारबतीचे जुने व ऐतिहासिक छायाचित्र क्लबच्या ocpc.ngp@gmail.com या अधिकृत ईमेलवर पाठवून या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा. नागपूरच्या या समृद्ध सांस्कृतिक वारशाची साक्ष देणारी जुनी छायाचित्रे नव्या पिढीसमोर आणण्यासाठी आणि मारबत महोत्सवाचा उत्साह अधिक द्विगुणीत करण्यासाठी या स्पर्धेत नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे यांनी केले आहे.

## बुद्धिबळाच्या पटावर एस.आर.के. इंडो पब्लिक स्कूलचा दबदबा!



### तालुका स्पर्धेत पाचही विद्यार्थी विजयी, जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
जिल्हा क्रीडा विभाग, नागपूर यांच्या वतीने शनिवारी नरखेड येथे आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत जलालखेडा येथील एस. आर. के. इंडो पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी करत शाळेचा नावलौकिक उंचावला आहे. स्पर्धेत सहभागी झालेल्या शाळेच्या पाचही विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली.

तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा १४ व १७ वर्षे वयोगटात घेण्यात आली. नरखेड तालुक्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. अत्यंत चुरशीच्या सामन्यांमध्ये एस. आर. के. इंडो पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी संयम, अचूक नियोजन आणि बुद्धिचातुर्याच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांवर मात केली.

१४ वर्षे वयोगटात अणिक रहेमान, नीरज खरपूरिया आणि भव्य टेंभेकर, तर १७ वर्षे वयोगटात ईशांत ठाकरे आणि कुशल कळंबे यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. विशेष म्हणजे स्पर्धेत सहभागी झालेले शाळेचे पाचही विद्यार्थी जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पधेर्साठी पात्र ठरले, ही शाळेसाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

बुद्धिबळ हा केवळ खेळ नसून विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता, निर्णयक्षमता, संयम, तर्कशक्ती आणि नियोजन कौशल्य विकसित करणारा खेळ म्हणून ओळखला जातो. या गुणांचा प्रभाव विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवरही होत असल्याने एस. आर. के. इंडो पब्लिक स्कूलकडून विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्याला विशेष प्रोत्साहन दिले जात आहे. त्याचाच परिणाम म्हणून बुद्धिबळ स्पर्धेत शाळेने उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

या यशाचे श्रेय विद्यार्थ्यांनी प्राचार्य शुभांगी अर्डक, शारीरिक शिक्षक पंकज ठाकरे, स्वाती गाखरे तसेच आई-वडिलांना दिले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष रणजीत देशमुख, डॉ. आशिष देशमुख, सुधीर देशमुख, अमिशी अरोरा, गणेश ठवरे, मुकेश चोपडे, कुलदीप हिवरकर आणि प्राचार्य शुभांगी अर्डक यांनी विजयी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांकडून आगामी स्पर्धेतही अशीच दमदार कामगिरी होईल, असा विश्वास शाळा व्यवस्थापन व शिक्षकांनी व्यक्त केला. तालुकास्तरावर मिळविलेल्या या यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीला आणखी बळ मिळाले असून विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## आद्यब्रह्मवादिनी नागपूर तर्फे आयोजित 'गुरुकुल-हसत खेळत मराठी' या उपक्रमाचा शुभारंभ



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
दीनदयाल नगर येथील श्री पांडुरंगेश्वर मंदिरातील सभा मंडपात आद्यब्रह्मवादिनी फाऊंडेशन नागपूर च्यावतीने 'गुरुकुल- हसत खेळत मराठी' या उपक्रमाचा उद्घाटन सोहळा, रविवारी ६ सप्टेंबर रोजी, मोठ्या उत्साहात पार पडला. सप्टेंबर ते जानेवारी या कालावधीत दर रविवारी घेण्यात येणाऱ्या या उपक्रमाची संकल्पना आद्यब्रह्मवादिनी फाउंडेशनच्या संस्थापिका डॉ. वृषाली शिलेदार यांची असून या उपक्रमाच्या मुख्य सल्लागार प्रमुख संचालिका जयश्री धर्माधिकारी आहेत.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पांडूरंगेश्वर शिवमंदिर मंडळाचे अध्यक्ष दिलीपजी कातरकर आणि डॉ. वृषाली शिलेदार यांच्या सोबत सहसंस्थापिका डॉ. योगिता कस्तुरे संचालिका आरती महाजन आणि मंदिराचे सचिव दीपकजी पथे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संचालिका डॉ. मेघा जोशी व अरुंधती महाजन प्रामुख्याने उपस्थित होत्या. अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने घेण्यात आलेल्या कार्यक्रमात अध्यक्षांचे पुष्पगुच्छ देऊन डॉ. वृषाली शिलेदार यांनी स्वागत केले. प्रमुख संचालिका आरती महाजन यांनी आद्यब्रह्मवादिनीच्या विविध क्षेत्रातील बहुमूल्य कार्याची आणि संस्थेच्या भारतभर पसरलेल्या शाखांची माहिती दिली.

अभिजात मराठी ही सक्तीचा विषय म्हणून अभ्यासक्रमात शिकताना पालक आणि पाल्य दोघेही दडपण घेतात शिवाय मुलं आपलीच भाषा बोलतांना अडखळतात हे ओळखून हाती घेतलेल्या या उपक्रमाच्या स्वरूपाची आणि उद्देशाची माहिती संयोजिका डॉ. ज्योती शिवलकर यांनी दिली. आपल्या अध्यक्षीय भाषणात अध्यक्ष दिलीपजी कातरकर यांनी गुरुकुल या संकल्पनेत समाविष्ट मूल्याधिष्ठित शिक्षणाची भावना समृद्ध व्यक्तिमत्व घडवण्यासाठी किती महत्वाची आहे आणि कॉन्व्हेन्ट मधील उच्चपगार केंद्रित शिक्षणपद्धत किती संकुचित दृष्टिकोन शिकवते हे स्पष्टपणे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन सीमा घिसाड यांनी तर आभार संयोजिका सुनीती मोहरील यांनी मानले.

द्वितीय सत्रात जेव्हा ९ ते १२ वयोगटातील सहभागी मुलामुलींनी आत्मविश्वासाने आपला अल्प परिचय करुन दिला, तेव्हा त्यांच्या बोलण्यातून 'हसत खेळत मराठी' या उपक्रमाचा मुलांना खूपच उपयोग होईल हे प्रकर्षाने जाणवले. या उपक्रमासाठी ९ ते १२ वयोगटातील ३८ मुलामुलींची नोंदणी झाली आहे. याप्रसंगी आद्य ब्रह्मवादिनीच्या कार्यकर्त्या अबोली भाटवडेकर, उज्वला गोळे, हेमांगी जोशी, शिल्पा नाईक, मानसी देशपांडे, कविता मोहरील, अर्चना साने, प्रज्ञा बेहेरे, सुवर्णा आशिरगडे अश्विनी उपाध्ये, सविता जोशी, सरिता पुराडभट आणि इतर सख्यांचे तसेच शिवमंदिर मंडळातील उपस्थित सदस्यांचे सहकार्य लाभले.

### थोडक्यात

## अमर नगर ज्येष्ठ नागरिकांचा वाढदिवसाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
अमरनगर ज्येष्ठ नागरिक मंडळ, अमरनगर यांचे वतीने मंडळाचे अध्यक्ष देविदास आगरकर व सचिव वसंतराव इझनकर व कार्यकारी मंडळ यांच्या मार्गदर्शात गणपतराव निंबाळकर, ज्योती निंबाळकर, रामेश्वर कांबळे, रामकृष्ण बांगडे, विजय लांजेवार, प्रांजली चांगदे, मोहन धवल, रामभाऊ चव्हाण, चंद्रभान खोडे, रेखा बोबडे, अशोक सांभारे, कल्पना बांगडे, संजय अस्वले यांच्या वाढदिवसाचा कार्यक्रम ३० ऑगस्ट रोजी, हनुमान मंदिराच्या सभागृहात अमरनगर येथ संपन्न झाला. याप्रसंगी प्रभागाचे नगरसेवक बाबाराव तायडे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता गणपतराव निंबाळकर, धनराज भोयर, रमेश जिल्हारे, अँड. अरमरकर, डॉ. राजेश कुऱ्हाडे, शोभा आगरकर, दत्तात्रय उदापुरे, सरिता धनजोड, जया रासेकर, मालती गौरखेडे, रेखा काठीकर यांनी अथक प्रयत्न केले. कार्यक्रमाला सौ. गौरखेडे, भोयर, ज्योती निंबाळकर, शेषराव ठाकरे, देवानंद दुधे, गौतम वरघट, धनराज भोयर, प्रकाश गोजे व इतर सभासद मोठ्या संख्येने हजर होते. याप्रसंगी प्रभागाचे नगरसेवक बाबाराव तायडे यांचा सत्कार करण्यात आला.

## "जीवशास्त्राचे रंग"या विषयावर चित्रकला स्पर्धेचे आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**
नुकताच नबिरा महाविद्यालय, काटोल येथील सूक्ष्मजीवशास्त्र आणि जैवतंत्रज्ञान विभागाने "जीवशास्त्राचे रंग" या संकल्पनेवर आधारित एका उत्साही चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले होते. कलेच्या माध्यमातून जीवशास्त्राचे सौंदर्य, विविधता आणि महत्त्व अधोरेखित करतानाच विद्यार्थ्यांना त्यांची सर्जनशीलता व्यक्त करण्याची संधी देणे, हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. या स्पर्धेत एकूण ५१ विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. त्यांनी सूक्ष्मजीवशास्त्र, जैवतंत्रज्ञान, जैवविविधता, पेशी, सूक्ष्मजीव, जनुकशास्त्र , पर्यावरण संवर्धन आणि जीवशास्त्रातील इतर रंजक पैलूंचे दर्शन घडवणारी रंगीबेरंगी व कल्पक चित्रे सादर केली. डॉ. दमयंती घागरगुंडे आणि प्रा. निलेश जाधव यांनी या स्पर्धेचे परीक्षण केले.

या स्पर्धेने विज्ञान आणि सर्जनशीलता यांचा संगम घडवून आणणारे एक उत्तम व्यासपीठ उपलब्ध करून दिले, ज्यामुळे विद्यार्थ्यांना वैज्ञानिक संकल्पनांचा कलात्मक दृष्टिकोनातून विचार करण्यास प्रोत्साहन मिळाले. जीवसृष्टीतील अद्भुत गोष्टींचे चित्रण करताना सहभागी विद्यार्थ्यांनी प्रचंड उत्साह, मौलिकता आणि कलात्मक कौशल्य प्रदर्शित केले. विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाची पारितोषिके तसेच सहभाग प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. हा कार्यक्रम प्राचार्य डॉ. सुनीलकुमार नवीन आणि विभागप्रमुख डॉ. एन. बी. हिरुलकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. यावेळी विभागातील प्राध्यापक ए. एस. चांडक, कु. डी. एम. रिधोरकर, एस. पी. नबिरा, कु. एस. एम. शेख, कु. ए. मानकर, कु. एस. पहलेरिया तसेच शिक्षकेतर कर्मचारी कु. रुचिका हिवसे आणि योगेश वाकोडे उपस्थित होते. आयोजकांनी विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागाचे कौतुक केले आणि त्यांच्या सर्जनशील प्रयत्नांबद्दल त्यांचे अभिनंदन केले. सर्व सहभागींचे कौतुक करून आणि विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक जागरूकता, सर्जनशीलता व सर्वांगीण विकासाला चालना देणारे असे नाविन्यपूर्ण उपक्रम यापुढेही आयोजित करण्याचा संकल्प करून या कार्यक्रमाची सांगता झाली.

## मनपा व लोककल्याण समिती सुपोषण जनजागृती मोहिम राबविणार

### महापौरांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत निर्णय



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
संतुलित आहार, पोषणाचे महत्व व निरोगी जीवनशैलीबद्दल नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी नागपूर महानगरपालिका व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या लोक कल्याण समितीतर्फे शहरात सप्टेंबर महिन्यात जनजागृती मोहिम राबविली जाणार आहे. यासंदर्भात महापौर निता ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली महापौर कक्षात बैठक पार पडली. यात जनजागृती करण्याच्या संदर्भात विविध उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी सत्ता पक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर, आरोग्य समितीच्या सभापती मनीषा अतकरे, आरोग्य समितीचे उपसभापती श्रीकांत आगलावे, परिवहन समितीचे उपसभापती सुधीर (बंडू) राऊत, रा. स्व. संघाच्या लोक कल्याण समितीचे अध्यक्ष डॉ. दिलीप गुप्ता, सचिव माधव उराडे, डॉ. हर्षद दासरे, डॉ. प्रसाद वरकडकर, सविता जोशी, जयंत जोशी, माजी उपमहापौर संदीप जाधव वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर व प्रफुल जोशी उपस्थित होते.

राष्ट्रीय सेवा भारतीच्यावतीने दरवर्षी सप्टेंबर महिना सुपोषण महिना म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने नागरिकांमध्ये पोषण, आरोग्य व संतुलित आहाराबाबत जनजागृती करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या अंतर्गत मनपाच्या शाळांमध्ये तसेच आशा वर्करच्या माध्यमातून लोकांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे आपली बसवर या मोहिमेबद्दल बॅनर लावण्यात येईल. तसेच शहराच्या प्रमुख चौकांमध्ये फलक लावण्याचे निर्देश महापौर निता ठाकरे यांनी दिले.

थोडक्यात

## जालंदर ट्युशन क्लासेसमध्ये शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा

### चिमुकल्या विद्यार्थ्यांनी दिला संचालिका अर्पिता जालंदर यांना अनोखा 'सरप्राईज' !



**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

शिक्षक दिनाचे औचित्य साधून जालंदर ट्युशन क्लासेस मध्ये विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साही आणि आल्हाददायक वातावरणात शिक्षक दिन साजरा केला. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे लहानग्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी ट्यूशन क्लासच्या संचालिका कु. अर्पिता जालंदर यांना दिलेले सुंदर 'सरप्राईज'! शिक्षकांबद्दलचे प्रेम, आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतःहून या खास सरप्राईजचे नियोजन केले होते या वेळी संपूर्ण जालंदर ट्यूशन क्लासमध्ये संगीत आणि ढोल-ताशांच्या तालावर नाचत-गाजत मुलांनी शिक्षक दिन धुमधडाक्यात साजरा केला. चिमुकल्यांचा हा उत्साह आणि त्यांचे निस्सीम प्रेम पाहून संचालिका कु. अर्पिता जालंदर या देखील भावुक झाल्या. कार्यक्रमा दरम्यान विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या महत्त्वाबद्दल मनोगत व्यक्त केले तसेच शिक्षकांसाठी विविध छोटेखानी खेळ आणि सांस्कृतिक उपक्रम आयोजित केले होते.

या प्रसंगी बोलताना संचालिका कु.अर्पिता जालंदर म्हणाल्या विद्यार्थ्यांनी दिलेले हे सरप्राईज आणि त्यांचे निर्मळ प्रेम माझ्यासाठी अत्यंत मोलाचे आहे. मुलांच्या या गोड आठवणी आणि त्यांचा उत्साह मला भविष्यात आणखी उत्तम मार्गदर्शन करण्यासाठी मोठी ऊर्जा देणारा आहे. कार्यक्रमाचा शेवट गोडधोड वाटून संचालिका कु अर्पिता जालंदर यांना शुभेच्छा देऊन करण्यात आला या सोहळ्यामुळे जालंदर ट्युशन क्लासेसमध्ये एका कौटुंबिक आणि आनंदी वातावरणाची अनुभूती सर्वांना मिळाली.

## पारशिवनीत ओला बाईकचा अपघात, शाळकरी मुलगी गंभीर

**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

पारशिवनी पारशिवनी पोलीस स्टेशन हद्दीतील पालोरा-आमडी रोडवर ओला दुचाकीच्या निष्काळजीपणामुळे झालेल्या अपघातात १७ वर्षीय शाळकरी मुलगी गंभीर जखमी झाली. याप्रकरणी पारशिवनी पोलिसांनी अप. क्र. ६२५/२०२६ कलम २८१, १२५(अ)(ब) बीएनएस व १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा नोंदविला आहे. ७ सप्टेंबर रोजी दुपारी १२.३० वा. मौजा पालोरा येथे घडली. आरोपी चालक अमन संजय बरियारा हा MH 31 GC 4216 क्रमांकाची ओला दुचाकी भरधाव वेगाने चालवत होता. पाठीमागे कु. मरसीलता बसकी (१७, रा. पारशिवनी) बसली होती. फिर्यादी दिलीप कामडे (रा. पालोरा) यांनी दिलेल्या माहितीनुसार, चालकाने चालत्या गाडीवर एका हाताने हेल्मेट काढण्याचा प्रयत्न केला. एका हाताने गाडी चालवल्याने तोल बिघडून दुचाकी रस्त्याकडेच्या झाडावर आदळली. चालक खाली पडला तर मुलगी झाडावर आपटल्याने तिच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. जखमींना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. फिर्यादीच्या जबाबावरून व वैद्यकीय अहवालावरून गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास गुन्हा दाखल अधिकारी म.पोहवा स्मिता व तपास अधिकारी पोउपनि पवार हे करीत आहेत.

## बोनसाई स्पर्धेत लुकेश वऱ्होकर यांचे यश



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर गार्डन क्लबतर्फे आयोजित फ्लॉवर शो व बोनसाई स्पर्धेत कोराडी येथील लुकेश वऱ्होकर यांनी घवघवीत यश संपादन केले. वसंतराव देशपांडे सभागृहात झालेल्या या स्पर्धेत ३५ ते ४० बोनसाईंचा सहभाग होता. बोनसाई ही केवळ झाडांची लहान आकारातील मांडणी नसून त्यामध्ये वृक्षसंवर्धन, कलात्मकता, संयम आणि सर्जनशीलतेचा सुंदर संगम असतो. या स्पर्धेत १२ इंचांपेक्षा कमी व अधिक अशा दोन गटांत झालेल्या स्पर्धेत वऱ्होकर यांनी १२ इंचांपेक्षा कमी गटात प्रथम व द्वितीय, तर अधिक गटात प्रथम व तृतीय क्रमांक पटकावला. स्पर्धेचे परीक्षण बोनसाई आर्टिस्ट मंगेश ठवरे व विक्रम परिहार यांनी केले. यशाबद्दल नागपूर गार्डन क्लबचे सचिव समित आदमने, सदस्य नदीम रेहमान व सहसचिव तन्मय गोडघाटे यांनी वऱ्होकर यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## उद्या रेशीम कार्यशाळा, रेशीम शेतीतून शाश्वत उत्पन्नाची संधी, लक्षाधीश शेतकऱ्यांचा सत्कार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

रेशीम शेतीचे महत्त्व तसेच त्यातून मिळणाऱ्या हमखास व शाश्वत उत्पन्नाची माहिती जिल्ह्यातील शेतकऱ्यांना व्हावी, यासाठी जिल्हा रेशीम कार्यालयाच्या वतीने ८ सप्टेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता रेशीम कार्यशाळेचे आयोजन जिल्हा रेशीम कार्यालय, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ परिसर, निर्मल नगरी जवळ, उमरेड रोड, नागपूर येथे करण्यात आले आहे. यावेळी लक्षाधीश रेशीम शेतकऱ्यांचा सत्कार तथा लाभार्थी सक्षमीकरण योजनेंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या शेतकऱ्यांचा समारोप कार्यक्रम होणार आहे. रेशीम शेतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना उपलब्ध होणाऱ्या उत्पन्नाच्या संधी, रेशीम उद्योगाचे महत्त्व तसेच विविध शासकीय योजनांची माहिती या कार्यशाळेत देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील अधिकाधिक शेतकऱ्यांनी या कार्यशाळेस उपस्थित राहून रेशीम शेतीविषयक मार्गदर्शन व योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

# भदंत ससाईच दीक्षाभूमी स्मारक समितीचे अधिकृत अध्यक्ष

### धर्मादाय आयुक्तांकडून दीक्षाभूमी ट्रस्टचा स्पष्टीकरण अर्ज निकाली, जुन्या आदेशात बदलाची गरज नसल्याचे स्पष्ट





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती (दीक्षाभूमी) च्या अध्यक्षपदावरून निर्माण झालेल्या वादावर धमार्दाय आयुक्तांच्या आदेशामुळे पडदा पडला आहे. धमार्दाय आयुक्तांनी दीक्षाभूमी ट्रस्टचा स्पष्टीकरण अर्ज निकाली काढताना, कार्यालयीन अधिकृत नोंदीनुसार भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई हेच समितीचे अधिकृत अध्यक्ष असल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच यापूर्वी कलम ४१-अ अंतर्गत २० फेब्रुवारी २०२६ रोजी पारित केलेल्या आदेशात कोणताही बदल करण्याची आवश्यकता नसल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. अशी माहिती भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांनी प्रसार मामध्यमांना दिली.

डॉ. राजेंद्र गवई व इतरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीच्या संदर्भात धमार्दाय आयुक्तांकडे स्पष्टीकरण अर्ज दाखल केला होता. या अर्जावर सुनावणी घेतल्यानंतर धमार्दाय आयुक्तांनी तो निकाली काढला. यावेळी कार्यालयातील अधिकृत नोंदींचाही विचार करण्यात आला.

धमार्दाय आयुक्त कार्यालयातील अधिकृत अभिलेखातील परिशिष्ट-१ नुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती (दीक्षाभूमी)चे अध्यक्ष म्हणून भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांचे नाव नोंदविण्यात आले आहे.

**बदल अर्ज प्रलंबित, निर्देश देता येत नाही**

दरम्यान, संस्थेच्या सदस्यत्वासंदर्भातील बदल अर्ज धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे प्रलंबित असताना संबंधित विश्वस्तांना कलम ४१-अ अंतर्गत कोणतेही निर्देश देता येत नसल्याचेही ससाई यांनी स्पष्ट केले. त्यामुळे सदस्यत्वातील बदलाबाबतचा अर्ज प्रलंबित असताना विद्यमान अधिकृत नोंदींनुसारच समितीची पदाधिकारी रचना ग्राह्य धरली जात असल्याचे त्यांनी सांगितले.

त्यामुळे सध्या उपलब्ध अधिकृत नोंदीनुसार अध्यक्षपद भदंत ससाई यांच्याकडेच कायम असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्याच नोंदीनुसार समितीच्या सचिवपदी डॉ. सुधीर फुलझेले यांचे नाव आहे.

## फ्रेंड्स फोरेवर ग्रुपने केला शिक्षकांचा सत्कार

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक :** शिक्षक दिनाचे औचित्य साधत शनिवार दिनांक ५ सप्टेंबरला दुपारी स्वर्गीय घनश्यामराव किंमतकर स्मृती सभागृह रामटेक येथे शिक्षक - शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. फ्रेंड्स फोरेवर महिला ग्रुप रामटेक च्या वतीने हा सोहळा आयोजित करण्यात आला होता. सर्वपल्ली राधाकृष्णन व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून तसेच दीप प्रज्वलन



करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाची अध्यक्षता नगरपरिषद हटवार प्राथमिक शाळेचे शिक्षक चंद्रशेखर धावडे यांनी केली तर प्रमुख अतिथी म्हणून नप मुख्याधिकारी पल्लवी राऊत, नगरसेवक रजत गजभिये, नगरसेवक आलोक मानकर, माजी नगरसेवक अनिल वाघमारे,राहुल जोहरे, वनमालाताई चौरागडे, लक्ष्मीताई खोब्रागडे, भारती गजभिये,हसरत सय्यद,ज्योती यादव,मीनाक्षी वाळके, पुष्पा बर्वे मंचावर उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात मंगला खंडारे यांच्या सुस्वागतम या नृत्याने करण्यात आली. यानंतर फ्रेंड्स फोरेवर महिला ग्रुपचे सदस्यांनी नमन नमन....गुरुवर नमन या नृत्याने उपस्थित शिक्षकांना नमन केले.

अतिथींनी उपस्थित त्यांना मार्गदर्शन करून शिक्षकांची वर्तमान स्थिती, त्यांचे कर्तव्य, योगदान व त्यांच्या पुढील आव्हाने यावर विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन रंजना गजभिये यांनी केले गायन अर्चना मेश्राम तर नृत्य मंगला खंडाळे यांनी केले. उपस्थित आणि सर्व सहयोगींचे आभार शिवकन्या दूंडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिवकन्या दूंडे,रंजना गजभिये, अर्चना मेश्राम, शालू सोमकुवर, लता बिसेन सूर्यकांता घरडे, सृष्टी मेश्राम,भावीन भोवते, विकास भोवते रवी डोंगरे पंकज भोव ते यांनी सहकार्य केले.

## खापरीमध्ये स्मार्ट मीटर बायपास करून वीजचोरी करणारी १४ प्रकरणे उघड, दोषींवर कठोर कारवाईचे सत्र सुरू



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

वीज ग्राहकांना पारदर्शक आणि अचूक बिलिंगचा लाभ मिळवून देण्यासाठी महावितरणतर्फे अत्याधुनिक स्मार्ट मीटर बसवण्याचे काम वेगाने सुरू असतानाच, बुटीबोरी उपविभागांतर्गत खापरी शाखा कार्यालयाच्या हद्दीत महावितरणने धडक कारवाई करत थेट 'सर्व्हिस वायर बायपास' करून विजेचा अपहार करणारी तब्बल १४ प्रकरणे एकाच दिवशी पकडण्यात आली आहेत.

विशेष म्हणजे, या सर्व १४ ग्राहकांच्या आवारात हायटेक स्मार्ट मीटर आधीपासूनच बसवण्यात आले होते. तरीही ग्राहकांनी तांत्रिक प्रणालीत थेट हस्तक्षेप न करता, मुख्य वीज वाहिनीवरून वायर बायपास करून स्मार्ट मीटरलाच चकवा देण्याचा प्रयत्न केला. यामुळे विजेचा वापर बेधडक सुरू होता, मात्र मीटरमध्ये एकही युनिट नोंदवला जात नव्हता.

महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हा प्रकार उघडकीस आणला असून पकडलेल्या सर्व १४ प्रकरणांमधील चोरीच्या विजेचे मूल्यमापन आणि दंड आकारणी करण्याचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. दोषी आढळलेल्या ग्राहकांवर वीज कायदा, २००३ च्या कलम १३५ अन्वये कडक फौजदारी आणि दंडात्मक कारवाईची प्रक्रिया वेगाने राबवली जात आहे. या यशस्वी कारवाईनंतर संपूर्ण नागपूर परिमंडळातील औद्योगिक, व्यावसायिक आणि निवासी क्षेत्रांत तपासणी मोहीम अधिक आक्रमक करण्यात आली आहे. तर शांतीनगर परिसरात देखील ४ वीजचोऱ्या उघडकीस आल्या आहेत. याशिवाय भुतिया अरवाजा, गांधीबाग, गौंडखैरी, भिवापूर, चापेगडी, सालवा, गोवरी येथे प्रत्येकी १, खापा येथे २ वीजचोऱ्या उघडकीस आल्या आहेत.

महावितरणने वीजचोरीच्या विरोधात पूर्णपणे 'झिरो टॉलरन्स' धोरण स्वीकारले असून, भरारी पथके आणि स्थानिक अधिकाऱ्यांना वीजचोरी शोधण्यासाठी विशेष उद्दिष्टे देण्यात आली आहेत. सध्या थकबाकीमुळे वीजपुरवठा खंडित केलेल्या जोडण्यांवरही कडक नजर ठेवली जात आहे. बेकायदेशीर वीज वापरामुळे शॉर्टसर्किट, ट्रान्सफॉर्मरमधील बिघाड आणि आगीसारख्या जीवघेण्या दुर्घटना घडून महावितरणचे व नागरिकांचे मोठे नुकसान होते. त्यामुळे संपूर्ण वितरण व्यवस्थेत सुसूत्रता आणि पारदर्शकता आणण्यासाठी महावितरण कटिबद्ध आहे. महावितरणचे प्रत्येक जोडणीवर बारीक लक्ष असून, नागरिकांनी कोणत्याही आमिषाला बळी न पडता केवळ अधिकृत विजेचाच वापर करावा, असे सडेतोड आवाहन महावितरणच्या नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी केले आहे.

## नरखेड तालुक्यातील सरपंच आरक्षणाचा मंगळवारी फैसला!

### ५१ ग्रामपंचायतींचे सुधारित आरक्षण जाहीर होणार, इच्छुकांच्या राजकीय हालचालींना वेग, आरक्षण कुणाच्या पथ्यावर पडणार? तालुक्यातील राजकीय वर्तुळाचे लक्ष सोडतीकडे

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाचे सुधारित आरक्षण अखेर मंगळवारी जाहीर होणार असून, या आरक्षणाकडे तालुक्यातील इच्छुक सरपंच पदाच्या उमेदवारांसह राजकीय पक्षांचेही लक्ष लागले आहे. सन २०२५ ते २०३० या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींसाठी नागरिकांचा मागास प्रवर्ग, खुला प्रवर्ग तसेच या प्रवर्गातील महिलांसाठी सुधारित आरक्षणाची सोडत काढण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या निर्देशानुसार नरखेड तालुक्यातील एकूण ७० ग्रामपंचायतींपैकी अनुसूचित जातीच्या ११ आणि अनुसूचित जमातीच्या ८ अशा एकूण १९ ग्रामपंचायती वगळून उर्वरित ५१ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाचे सुधारित आरक्षण निश्चित करण्यात येणार आहे. मंगळवारी सकाळी ११ वाजता नरखेड तहसील कार्यालयातील प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात सरपंच पदाच्या आरक्षणाची सोडत काढण्यात येणार आहे. यामध्ये नागरिकांचा मागास प्रवर्ग, खुला प्रवर्ग तसेच संबंधित प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षण निश्चित होणार असल्याने अनेक इच्छुकांच्या राजकीय गणितांना आता आरक्षणाच्या निकालाची प्रतीक्षा लागली आहे.

**आरक्षण बदलल्याने अनेकांचे गणित बदलणार**

सरपंच पदाचे सुधारित आरक्षण जाहीर झाल्यानंतर अनेक ग्रामपंचायतींमध्ये संभाव्य उमेदवारांची नावे बदलण्याची शक्यता आहे. आतापर्यंत सरपंच पदासाठी तयारी करणाऱ्या इच्छुकांमध्ये आरक्षणामुळे कोणाला संधी मिळणार आणि कोणाला माघार घ्यावी लागणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. काही गावांमध्ये आरक्षण आपल्या प्रवर्गासाठी पडावे यासाठी इच्छुकांकडून राजकीय पातळीवरही हालचाली सुरू असल्याचे चित्र आहे. विशेषतः महिला आरक्षण कोणत्या ग्रामपंचायतीला मिळते, यावर अनेक विद्यमान पदाधिकारी व इच्छुकांचे राजकीय भवितव्य अवलंबून राहणार आहे. त्यामुळे मंगळवारी होणारी सोडत ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया न राहता अनेक गावांमधील आगामी राजकीय समीकरणांची दिशा ठरविणारी ठरणार आहे.

**तहसीलदारांचे नागरिकांना आवाहन**

नरखेड तालुक्यातील नागरिकांनी सुधारित सरपंच पदाच्या आरक्षण सोडतीस उपस्थित राहावे, असे आवाहन तहसीलदार भागवत पाटील यांनी केले आहे. जिल्हाधिकारी नागपूर यांच्या निर्देशानुसार ही प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यात येणार आहे. मंगळवारी सकाळी ११ वाजता आरक्षणाची सोडत होताच कोणत्या ग्रामपंचायतीचे सरपंच पद कोणत्या प्रवर्गासाठी राखीव होते, हे स्पष्ट होणार असून त्यानंतर तालुक्यातील आगामी ग्रामपंचायत राजकारणाला वेग येण्याची शक्यता आहे. त्यामुळे नरखेड तालुक्यातील ५१ ग्रामपंचायतींसह संपूर्ण तालुक्याचे लक्ष आता मंगळवारच्या आरक्षण सोडतीकडे लागले आहे.

## सर्जा-राजाला सजवण्यासाठी शेतकऱ्यांची बाजारात तोबा गर्दी, महागाईचे चटके

### पोळा सणाच्या खरेदीकरीता शेतकऱ्यांमध्ये उत्साह





**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

बळीराजाला वर्षभर शेतात राबण्यासाठी मदत करणाऱ्या सर्जा- राजाचा पोळा सण यंदा गुरुवारी (ता. १०) साजरा होत आहे. त्यानिमित्त पारशिवनी येथील आठवडी बाजारामध्ये आपल्या लाडक्या सर्जा-राजाला सजवण्याकरिता साहित्य खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांनी गर्दी केली.

पोळा सणाच्या निमित्ताने पारशिवनी शहरात सोमवारी आठवडी बाजारामध्ये सजावटीचे साहित्य विक्री करणाऱ्या व्यावसायिकांनी आपली दुकाने थाटली. सर्जा-राजाला सजवण्यासाठी लागणारे इंगूळ, भोरकडी, पितळी शेंबी, चवरी, घुंगरू, कपाळ गोंडा, कवडी माळ, पैंजण, कासरा, वेसण गोंडे, बेगडी, म्होरकी, कासरा, चवरी आदी साहित्याने दुकाने सजली होती. आपल्या लाडक्या सर्जा-राजाला सजवण्यासाठी येथील बाजारपेठेमध्ये शेतकऱ्यांनी गर्दी केली होती.

दरम्यान, यावर्षी महागाईचे चटके सहन करत शेतकरी तरी देखील पोळा सणासाठी खरेदी करताना शेतकऱ्यांमध्ये उत्साह जाणवत आहे. यंदा सजावट साहित्याच्या किमतीमध्ये २० ते ३० टक्के वाढ झाली आहे. तरी देखील काळ्या आईची इमाने इतबारे सेवा करणाऱ्या बैलांना सजवण्यासाठी शेतकरी आपापल्या आर्थिक कुवतीप्रमाणे साहित्य खरेदी करताना दिसून आले.

**महागाईची झळ, उत्साह मात्र कायम**

बाजारात बैलांचे गळपट्टे, रंगीबेरंगी दोर, घुंगुरमाळ, मुसकी, शेल, म्होरकी गोंडा, पितळी शेंबी, कपाळ गोंडा, कवडी माळ, पैंजण, वेसण गोंडे, बेगडी, म्होरकी आदी वस्तूंचा समावेश आहे. दरवाढीची झळ, उत्साह मात्र कायम यंदा बैलांच्या सजावटीच्या साहित्याच्या किमतीत सुमारे २० ते ३० टक्के वाढ झाली आहे. तरीही दरवाढीची फारशी पर्वा न करता शेतकरी आपल्या आर्थिक ऐपतीनुसार साहित्याची खरेदी करत आहेत.

ग्रामीण भागातील पोळ्याची परंपरा आणि बैलांप्रति असलेली कृतज्ञतेची भावना यामुळे सणाच्या तयारीत उत्साह दिसून येत आहे. खरेदीसाठी शेतकऱ्यांनी पारशिवनी बाजारात गर्दी केली होती. बैलांच्या साज-शृंगाराची परंपरा कायम आधुनिक युगात शेतीच्या पद्धतीत मोठे बदल झाले असले, तरी पोळ्याच्या निमित्ताने बैलांना सजविण्याची आणि त्यांची पूजा करण्याची ग्रामीण भागातील परंपरा आजही तितक्याच उत्साहाने जपली जात आहे. त्यामुळे आर्थिक अडचणी आणि खरीप हंगामाची चिंता असतानाही शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर पोळ्याचा उत्साह दिसून येत होता.

थोडक्यात

## मनपाद्वारे रवी नगर बस स्थानक परिसरात अतिक्रमणविरोधी कारवाई

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महापौर निता ठाकरे यांनी दिलेल्या निर्देशानुसार, शहरातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांविरोधात कठोर कार्यवाही करण्यात येत आहे. शहरातील अतिक्रमण व अवैध बांधकामाच्या



विरोधात नागपूर महानगरपालिकेने धडक कार्यवाही करीत सोमवार (ता. ७) रोजी विविध अतिक्रमणविरोधी कारवाई करण्यात आली. यात धरमपेठ झोन अंतर्गत पादचारी पथावरील अनधिकृतपणे ठेले व दुकाने लावणाऱ्यांवर अतिक्रमणविरोधी कारवाई करण्यात आली आहे. मनपाच्या प्रवर्तन विभाग व झोन कार्यालयांमार्फत शहरातील विविध भागांमध्ये अतिक्रमणांची व अनधिकृत बांधकामांची पाहणी करण्यात येत असून, नियमांचे उल्लंघन आढळलेल्या संबंधितांना नोटीस बजावण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. यामध्ये रेस्टॉरेंट, दुकाने व ठेले या आस्थापना तसेच इतर स्वरूपाच्या अनधिकृत बांधकामांचा समावेश आहे.

धरमपेठ झोन अंतर्गत रवी नगर बस स्थानक परिसरातील काही नागरिकांनी अनधिकृतपणे पादचारी पथावर अतिक्रमण व परिसरात काही अनधिकृत ठेले व दुकानेही उभारण्यात आल्याचे निदर्शनास आल्याने त्यावर अतिक्रमणविरोधी कारवाई करत संबंधितांचे अनधिकृत साहित्य जप्त करून व दुकाने हटवून परिसर रिकामा केला. यामुळे रवी नगर बस स्थानक परिसरात कारवाई करण्यात आली.

## हिवरी नगर येथे 'जेन-झी'ची दहीहंडी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूरमधील सर्वात मोठ्या दहीहंडी पैकी एक असलेल्या दहीहंडीचे आयोजन ऑरेंज सिटी स्पोर्ट्स अँड कल्चरल संस्था व राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष आणि माजी नगरसेवक दुनेश्वर पेठे व मित्र परिवारानेवतीने नुकताच हिवरी नगर परिसरात करण्यात आलेले होते. यावर्षी ही दहीहंडी भंडारा येथील शीतला माता मंडळाने फोडली. विजेता गटाला ५,५५,५५५ रोख बक्षीस देण्यात आले. गेल्या १४ वर्षांपासून ही दहीहंडी आयोजित केली जात आहे. याप्रसंगी संसदरत्न खासदार सुप्रिया सुळे, जगातील सर्वात लहान महिला ज्योती आमगे, माजी जिल्हा परिषद सदस्य सलील देशमुख, वर्षा शामकुळे, शेखर सावरबांधे, सुरेश जिचकार, अविनाश गोतमारे, पल्लवी गावंडे यांची प्रमुख उपस्थित होती. देवेंद्र घरडे, अश्विन जैन जवेरी,पवन गावंडे, महेश ठाकरे, प्रशांत ढाले, डॉ. प्रशांत बनकर, अमित जेठे व सर्व कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी योगदान दिले.

## विरखंडी शाळेत शिक्षक दिन, दहीहंडी व वृक्षारोपण



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

जि.प. उच्च प्राथमिक शाळा विरखंडी येथे शिक्षक दिनानिमित्त दहीहंडी, विविध सांस्कृतिक कार्यक्रम व वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध नृत्य, गायन आणि दहीहंडीचे सादरीकरण केले. तसेच वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. शालेय परिसरात नीम, फणस, आंबा, बेल व चिंच आदी वृक्षांची लागवड करण्यात आली. कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रामसागर जुमडे, उपाध्यक्ष कुलदीप दुपारे, उमाकांत निंबार्ते, उपसरपंच अभय ठवकर व माजी सरपंच सचिन ठवकर यांची उपस्थिती होती. मुख्याध्यापक आनंद गिरडकर यांच्या नियोजनातून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यासाठी मनीषा मानकर, रेखा निनावे, शुभांगी नान्हे व सतीश भोयर यांनी सहकार्य केले.

## सावनेर येथे गणेश विसर्जन मार्गाची पाहणी

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत सागर खर्डे, पोलीस अधीक्षक



सावनेर विभाग सावनेर, कल्याण कुमार डहाट उपविभागीय अधिकारी सावनेर, अक्षय पोयाम तहसीलदार सावनेर, आर्शिया जुही मुख्याधिकारी सावनेर, सतीश ललके सहाय्यक अभियंता महावितरण सावनेर यांचे उपस्थितीमध्ये गणेश विसर्जन मिरवणुकीच्या मार्गाची पाहणी करून विसर्जन स्थळाची सुद्धा पाहणी करण्यात आले. उपाययोजना करण्यासंबंधात संबंधित अधिकारी यांना कळविण्यात आले आहे.

# 'झूम बराबर झूम' आणि 'दम मारो दम'च्या नादात तरुणाई

### अमली पदार्थांची सहज उपलब्धता ठरतेय कारणीभूत

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

तहसीलच्या शहरी आणि ग्रामीण भागात गांजा, एमडी पावडर, महुआ आणि गावठी दारू विकण्याचा उघड धंदा झपाट्याने वाढत आहे, ज्यामुळे या अमली पदार्थांच्या व्यसनात अडकलेल्या तरुणांचे भविष्य धोक्यात आले आहे. जर पोलीस प्रशासनाने या अवैध धंद्यांवर वेळेवर कारवाई केली नाही, तर परिस्थिती गंभीर होऊ शकते.

**पोलीस प्रशासनाच्या मौनावर संशय**

दिवसभर आणि संध्याकाळ होताच, महामार्गांवर आणि शहरातील रस्त्यांवर असलेल्या उड्डाणपुलांवर, खेळाच्या मैदानांवर, ओसाड शाळांच्या मैदानांवर आणि छोट्या दुकानांमध्ये अमली पदार्थांचा व्यापार अव्याहतपणे सुरू राहतो, असा नागरिकांचा आरोप आहे. सायंकाळ होताच गर्दी जमू लागते. नशेत धुंद झालेले, दारुडे शहराच्या मुख्य रस्त्यांवर फिरताना दिसतात. त्यांना ना त्यांच्या कुटुंबाची भीती वाटते, ना पोलिसांची...? नशेच्या धुंदीत वेगाने धावणारी वाहने, भाईगीरीत गुंतलेल्या व्यसनींच्या टोळ्या आणि त्यांच्यातील दबंगगीरी व अस्तित्व या गोष्टी शहरातील अनेक तालुक्यांकरिता नवीन नाहीत.

ग्रामिण भागातील या उघड अमली पदार्थांच्या व्यापारामुळे तरुण पिढी अमली पदार्थांच्या आहारी गेली आहे आणि त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले आहे. त्याचबरोबर, कुटुंबांची चिंताही वाढत आहे. वाढत्या रस्ते अपघातांवरून हे स्पष्ट होत आहे की, त्यातील बहुतेक अपघात नशेमुळे होत आहेत, तरीही स्थानिक पोलीस प्रशासन गप्प का आहे, अवैध व्यापाराचे वाढते प्रमाण जाण्याचे प्रयत्न केले तर हा व्यापार सावनेर शहराजवळील महामार्गावरील उड्डाणपूल, बस स्थानक, रेल्वे स्थानक, छोटा पुलिया, सूर्योदय नगर इत्यादी गावांमध्ये, तसेच तालुक्यामधील धापेवाडा, बोरगाव, वाघोडा, कोलमाईन, शक्ती नगर, उमरी, खापा इत्यादी ठिकाणी फोफावत आहे, असाही नागरिकांचा आरोप आहे.



सुत्रांकडून मिळत असलेल्या माहितीनुसार, नागरिक उघडपणे बोलु लागले आहेत की, या अवैध व्यापाराच्या वाढीस स्थानिक पोलिसांची मूक संमती आहे. सूत्रांनुसार, पोलीस ठाण्यातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना माहिती असुनही अनेकदा पोलिसांच्या मूक उपस्थितीमुळे केवळ काही गोष्टीच संशयास्पद वाटत नाहीत, तर संपूर्ण प्रकरणच संशयास्पद वाटते, असे एका नागरिकाने यावेळी बोलताना सांगितले.

कोणत्याही भीतीशिवाय चालणाऱ्या या अवैध धंद्यामुळे तरुण अमली पदार्थांच्या व्यसनात अडकून आपले आयुष्य उद्ध्वस्त करत आहेत. कुटुंबे आपल्या मुलांच्या भविष्याबद्दल चिंतीत आहेत. त्याच वेळी, या अवैध धंद्याचा नकारात्मक परिणाम ग्रामीण संस्कृतीवरही दिसून येत आहे.

नागपूर जिल्हा ग्रामीणचे पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, सावनेर पोलीस उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी सागर खर्डे आणि सावनेर पोलीस ठाण्याच्या नवीन ठाणेदार ऋतुजा जाधव, हे या अवैध धंद्याला आळा घालण्यात आणि तो संपुष्टात आणण्यात यशस्वी होतील काय? की हा धंदा जसा आहे तसाच सुरू राहील, याकडे सामान्य नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## दहीहंडी उत्सवात जेएमडी गोविंदा पथकाची बाजी

### अवघ्या २८ सेकंदांत पाच थर रचत पटकावले ५१ हजारांचे प्रथम पारितोषिक

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

श्री भीमादेवी क्रीडा मंडळ व सांस्कृतिक मंडळ आणि भिवापूर युथ फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दहीहंडी उत्सव २०२६ रविवारी (दि. ६) उत्साहात पार पडला. पहिल्याच वर्षी झालेल्या या स्पर्धेत नागपूर, भंडारा आणि चंद्रपूर जिल्ह्यांतील सहा नामांकित गोविंदा पथकांनी सहभाग घेतला.

स्पर्धेत खटऊ गोविंदा पथक, बोरगाव यांनी अवघ्या २८ सेकंदांत पाच थर रचत ५१ हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक पटकावले. राधेकृष्ण गोविंदा पथक, मोठी दिघोरी यांनी एक मिनिट नऊ सेकंदांत पाच थर रचून ३१ हजार रुपयांचे द्वितीय, तर जय महाकाल गोविंदा पथक, उमरेड यांनी ४४ सेकंदांत चार थर रचून ११ हजार रुपयांचे तृतीय पारितोषिक मिळविले.

उमरेड येथील जय महाकाल महिला गोविंदा पथकाचा सहभाग स्पर्धेचे विशेष आकर्षण ठरला. या पथकाला ११ हजार रुपयांचे प्रोत्साहनपर पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. कोणतीही पूर्वतालीम किंवा अनुभव नसतानाही स्थानिक श्री भीमादेवी क्रीडा मंडळाच्या खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग नोंदविल्याने त्यांचेही कौतुक झाले. कार्यक्रमाचे उद्घाटन तहसीलदार संजय राठोड यांनी केले. ठाणेदार रवींद्र मस्कर उपस्थित होते. याप्रसंगी पवनी (जि. भंडारा) येथील शहीद मेजर प्रफुल्ल मोहरकर यांच्या मातोश्री सुधा मोहरकर तसेच शहीद मंगेश रामटेके यांच्या पत्नी राजश्री रामटेके यांचा आयोजकांच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.



पारितोषिक वितरण समारंभाला नगराध्यक्षा सुषमा श्रीरामे, पोलिस उपनिरीक्षक सचिन उरकुडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव रामकृष्ण गोंगल यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. विजेत्या पथकांना रोख रक्कम व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

## सणोत्सवात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी रामटेक पोलिसांचा रूट मार्च व दंगा नियंत्रणाची रंगीत तालीम



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

नागपूर ग्रामिण जिल्हा पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधीक्षक अनिल म्हस्के यांच्या आदेशाने रामटेक उपविभागीय पोलीस अधिकारी रमेश बरकते, रामटेक पोलीस निरीक्षक राजेशकुमार थोरात यांच्या मार्गदर्शनात दिनांक ७ सप्टेंबर २०२६ ला आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच कोणत्याही अनुचित परिस्थितीचा प्रभावीपणे सामना करण्याच्या दृष्टीने नागपूर जिल्हयातील रामटेक पोलीस स्टेशनच्या हद्दीत शहरातील गांधी चौकात रूट मार्च व दंगा नियंत्रणाची रंगीत तालीम घेण्यात आली. यावेळी पोलीस अधिकारी व अंमलदार ढाल, लाठी, हेल्मेट इत्यादी दंगा नियंत्रण साहित्याने सज्ज होऊन दंगा नियंत्रणाचा सराव करण्यात सहभागी झाले. तसेच पोलीस दलाची सज्जता, जलद प्रतिसाद क्षमता, पथकांमधील समन्वय तसेच उपलब्ध दंगा नियंत्रण साहित्याच्या हाताळणीचा सराव करण्यात आला.

# वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरण्याचे निर्देश!

### नागपूर महानगरपालिकेच्या वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समितीच्या बैठकीत आरोग्य सेवांबाबत महत्त्वपूर्ण निर्देश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेच्या वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समितीची आढावा बैठक आज (दि. ७ सप्टेंबर) समितीच्या सभापती मनीषा अतकरे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती सभागृह येथे पार पडली. बैठकीत महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाशी संबंधित विविध विषयांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीदरम्यान नागपूर महानगरपालिकेच्या अंतर्गत कार्यरत सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व शहरी आरोग्य व कल्याण केंद्रे येथील मनुष्यबळाचा आढावा घेण्यात आला. यामध्ये २६४ अठट पदे मंजूर असून २५४ कार्यरत, १०२ जीएनएम पदे मंजूर असून ९५ कार्यरत, तर १,१५७ आशा स्वयंसेविका मंजूर असून १,११२ कार्यरत असल्याची माहिती NUHMच्या शहर कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. अश्विनी निकम यांनी दिली. उर्वरित रिक्त पदांची भरती महाराष्ट्र शासनाच्या नवीन मार्गदर्शक सूचनांनुसार बाह्यस्त्रोत संस्थेमार्फत करण्याची प्रक्रिया सुरू असून, त्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

NUHM अंतर्गत वैद्यकीय अधिकारी पदांची भरती प्रक्रिया गतीने पूर्ण करून रिक्त पदे तातडीने भरण्याचे निर्देश सभापती मनीषा अतकरे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. UPHC व UHWC केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची उपलब्धता सुनिश्चित करून नागरिकांना वेळेवर व गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा मिळेल, यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच, महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रांमध्ये मुदत संपलेली औषधे आढळल्यास संबंधित झोनल वैद्यकीय अधिकारी व फार्मासिस्ट यांची जबाबदारी निश्चित करून नियमानुसार कारवाई करावी, असे स्पष्ट निर्देश सभापतींनी दिले.

**६६२ नोंदणीकृत रुग्णालयांची तपासणी मोहीम**

नागपूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत शहरातील ६६२ नोंदणीकृत रुग्णालयांची तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेदरम्यान रुग्णालयातील उपलब्ध खाटांची संख्या, अग्निसुरक्षा व्यवस्था, जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन, रुग्णांच्या हक्कांचा चार्ट दर्शनी भागात लावण्यात आला आहे किंवा नाही, तसेच उपचारासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काचा दरफलकप्रदर्शित करण्यात आला आहे किंवा नाही याची तपासणी करण्यात येत आहे.



संबंधित रुग्णालयांनी महाराष्ट्र नर्सिंग होम नोंदणी अधिनियम तसेच लागू असलेल्या संबंधित नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. तपासणीदरम्यान आढळून येणाऱ्या त्रुटींची पूर्तता करण्यासाठी संबंधित रुग्णालयांना आवश्यक त्या सूचनांसह नोटीस बजावावी, असे निर्देश सभापती श्रीमती मनीषा अतकरे यांनी दिले. रुग्णालयांच्या तपासणीदरम्यान पार्किंग व्यवस्थेबाबत त्रुटी आढळल्यास, संबंधित सहाय्यक आयुक्त व नगररचना विभागाला आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना द्याव्यात.

आरोग्य समितीचे सदस्य श्रीकांत आगलावे यांनी रुग्णालय तपासणीदरम्यान किती नोटिसा बजावण्यात आल्या, कोणत्या त्रुटी आढळून आल्या याची लेखी माहिती सादर करण्याची तसेच समितीच्या सदस्यांना आणि नगरसेवकांना त्याची माहिती देण्याची सूचना केली. तपासणी प्रक्रियेत कोणत्याही प्रकारच्या दबावाला बळी न पडता नियमानुसार कारवाई करण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

**फॉगिंग व्यवस्था अधिक प्रभावी करण्याच्या सूचना**

शहरातील प्रत्येक झोनमध्ये पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर फॉगिंग मशीनची संख्या वाढवून फॉगिंग व्यवस्था अधिक प्रभावी करण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले. हिवताप अधिकारी डॉ. मोनिका चारमोडे यांनी माहिती देताना सांगितले की, सध्या प्रत्येक झोनमध्ये ३ फॉगिंग मशीनचा वापर करण्यात येत असून काही मशीन दुरुस्तीच्या प्रक्रियेत आहेत. तसेच ब्रीडिंग चेकरच्या पदभरतीची प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

आरोग्य समितीचे सदस्य योगेश मडावी यांनी फॉगिंगसाठी मनुष्यबळाची कमतरता असल्याचा मुद्दा उपस्थित केला. नागरिकांना अधिक प्रभावी आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित केंद्रांमधील रिक्त पदे तातडीने भरण्याची मागणी त्यांनी केली. तसेच, फॉगिंगच्या कामासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांची झोननिहाय यादी समितीच्या सर्व सदस्यांना उपलब्ध करून देण्याची सूचना केली.

**बोगस डॉक्टरांविरोधात कडक कारवाई**

सर्व झोनल वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील संशयित बोगस डॉक्टरांचा शोध घेण्याबरोबरच नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींची तातडीने दखल घ्यावी. झोननिहाय विशेष पथकांमार्फत नियमित तपासणी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध नियमानुसार कठोर कायदेशीर कारवाई करावी, असे निर्देश बैठकीत देण्यात आले.

**UHWCमध्ये उपचारासाठी पैसे मागितल्यास कारवाई**

महानगरपालिकेच्या UHWCमध्ये नागरिकांकडून वैद्यकीय उपचार किंवा शासकीय आरोग्य सेवांसाठी पैसे मागितल्याची तक्रार आल्यास त्याची तातडीने चौकशी करून संबंधित व्यक्तीविरुद्ध कठोर कारवाई करावी, असे निर्देश सभापती मनीषा अतकरे यांनी दिले.

थोडक्यात

## 'फ्लुइड पॉवर सोसायटी ऑफ इंडिया'च्या नागपूर चॅप्टरचे ९ सप्टेंबरला उद्घाटन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

फ्लुइड पॉवर इंजिनिअरिंगच्या क्षेत्रात नवनवीन संशोधन, उत्कृष्ट दर्जा आणि व्यावसायिक सहकार्याला गती देण्यासाठी 'फ्लुइड पॉवर सोसायटी ऑफ इंडिया' (एफपीएसआय) च्या नागपूर चॅप्टरची स्थापना करण्यात आली असून या नव्या चॅप्टरचा अधिकृत उद्घाटन सोहळा बुधवारी, ९ सप्टेंबर आयोजित करण्यात आला आहे. अंबाझरी रोड येथील 'इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स'च्या सभागृहात सकाळी १० वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाचे आयोजन एफपीएसआय आणि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स, नागपूर लोकल चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. या सोहळ्यास मुख्य अतिथी म्हणून एमईसीएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक आय. डी. नारायण उपस्थित राहतील. एफपीएसआय, बंगळुरूचे राष्ट्रीय अध्यक्ष हेमंत कुमार अध्यक्षस्थानी असतील. तर एफआयई नागपूर चॅप्टरचे अध्यक्ष संदीप शिरखेडकर यांच्यासह एफपीएसआय नागपूर चॅप्टरचे अध्यक्ष जितेंद्र नायक, उपाध्यक्ष एस. सी. विश्वकर्मा, मिलिंद गाडगे व डॉ. संजय इंगोले प्रामुख्याने उपस्थित राहतील.

## जलालखेडा येथे ५० पशुपालकांना ३ हजार बहुवार्षिक चारा रोपांचे वाटप

### अल निनो संकटावर मात करण्यासाठी हिरव्या चाऱ्याची उपलब्धता वाढविण्याचा प्रयत्न



**सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जनावरांना वर्षभर मुबलक प्रमाणात हिरवा व वाळलेला चारा उपलब्ध झाल्यास त्यांचे आरोग्य चांगले राहते, रोगप्रतिकारक शक्ती वाढते, गाई-म्हशी वेळेत माजावर येण्यास मदत होते तसेच दुग्ध उत्पादनातही वाढ होते. यासाठी पशुपालकांनी बहुवार्षिक चारा लागवडीचा अवलंब करावा, या उद्देशाने पशुवैद्यकीय दवाखाना, जलालखेडा येथे उत्पादित करण्यात आलेल्या ३ हजार चारा रोपांचे ५० पशुपालकांना वाटप करण्यात आले. अल निनोच्या संभाव्य परिणामांमुळे निर्माण होणाऱ्या चारा टंचाईवर मात करण्यासाठी पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागाचे उपायुक्त डॉ. नितीन फुके यांनी जागा उपलब्ध असलेल्या तसेच बारमाही पाण्याची व्यवस्था असलेल्या पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये चारा बागा निर्माण करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार नागपूर जिल्ह्यातील विविध पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये चारा लागवड करण्यात आली आहे.

नरखेड तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखाना, जलालखेडा येथे अनिल इंगोले यांनी उन्हाळ्यात चारा बाग तयार केली. या चारा बागेत उत्पादित झालेल्या बीएचएन-१० व ६ आणि ऑस्ट्रेलियन रेड नेपिअर या बहुवार्षिक चारा जातींच्या एकूण ३ हजार रोपांचे ५० पशुपालकांना वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम सहायक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय, नरखेड डॉ. मुकिंदा जोगेकर यांच्या अध्यक्षतेखाली व स्व. वसंतराव नाईक स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष अॅड. निलेश हेलोंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. बहुवार्षिक चाऱ्याबरोबरच अॅड. निलेश हेलोंडे यांनी उपलब्ध करून दिलेल्या काटेविरहित निवडुंग या चारा पिकाचे जनावरांच्या आहारातील महत्त्व पशुवैद्यक डॉ. स्वप्नील रेवतकर, डॉ. राजेश भंदीरगे आणि डॉ. सुचिता उके यांनी उपस्थित पशुपालकांना समजावून सांगितले. तालुक्यातील सर्व पशुपालकांनी अशा प्रकारे बहुवार्षिक चारा लागवडीचा अवलंब करून दुग्ध उत्पादन वाढवावे, असे आवाहन अॅड. निलेश हेलोंडे यांनी केले. तसेच पशुपालकांना आवश्यक ती मदत करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी जलालखेडा येथील सरपंच मयूर सोनवणे, कुलदीप हिवरकर, प्रवीण लोहे यांच्यासह पशुपालक उपस्थित होते. उपस्थितांचे आभार डॉ. सुचिता उके यांनी मानले.

## शंकरराव चव्हाण इंग्लिश शाळेत शिक्षक दिनाला विद्यार्थ्यांनी सांभाळली शाळेची व्यवस्था



**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

वीज केंद्राच्या प्रकाश नगर वसाहतीतील शंकरराव चव्हाण इंग्लिश शाळेत भारत रत्न, शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली या प्रसंगी विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त करत एका दिवसासाठी शाळेचे संपूर्ण स्वयंशासन यशस्वीरीत्या हाताळून उपस्थितांची मने जिंकली. मंचावरील उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व दीपप्रज्वलन करण्यात आले यावेळी मंचावर शाळेच्या मुख्याध्यापिका रजनी गजभिये, वरिष्ठ शिक्षिका सुरेखा चिखले व चंद्रकांत मोहोड प्रामुख्याने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी डॉ. राधाकृष्णन यांच्या जीवनचरित्रावर व कार्यावर विस्तृत प्रकाश टाकला तसेच विशेष नृत्य सादर करून जीवन घडवण्यात शिक्षकांचे काय स्थान असते याचे महत्त्व पटवून दिले यानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या प्रिय शिक्षकांचा सत्कार करून त्यांचे आशीर्वाद घेतले. शिक्षक दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी एका दिवसासाठी विद्यालयाची सूत्रे आपल्या हाती घेतली होती विद्यार्थ्यांमधून निवडलेल्या मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक आणि शिक्षकांनी वर्ग सांभाळत शिस्तबद्ध अध्यापनाचे धडे दिले. कार्यक्रमाचे संचालन स्वरा धांडे व प्रांजल राऊत यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका रजनी गजभिये यांच्या मार्गदर्शनाखाली वेदिका ढगे, अर्पिता जालंदर, करिना बक्सरिया, रोशनी गायकवाड, प्राजक्ता गोमकाळे, कल्पना श्रीवास्तव, रुबिना शेख, प्राजक्ता गावंडे, प्रणिता भोयर, अश्विनी पटमासे या शिक्षकांसह वैदीवी आगलावे, दिव्यांका नाग, ऋतुल इंगळे, आरुष श्रीवास्तव, रुद्र ठाकरे, वेदांत खडतकर, अंश ढोके, आयुष नितनवरे या विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पारंपरिक गीत- नृत्याने रंगला तीज गौरी मातेचा उत्सव

## नागपूर नगरीत उत्साहात तीज महोत्सव २०२६ संपन्न, सामाजिक एकतेसह संस्कृती जतनाचा संदेश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जय सेवालाल! जगत जननी जगदंबा भवानी मातेच्या कृपेने तसेच जगद्गुरु संत श्री सेवालाल बापूंच्या प्रेरणेने नागपूर नगरीत तीज महोत्सव २०२६ मोठ्या उत्साहात, भक्तिमय वातावरणात आणि पारंपरिक जल्लोषात संपन्न झाला. तीज महोत्सवाच्या निमित्ताने समाजातील महिला भगिनींसह समाज बांधव मोठ्या संख्येने एकत्र आले. पारंपरिक रूढी- परंपरा, लोकसंस्कृती आणि आध्यात्मिक वारशाचे दर्शन या महोत्सवातून घडले.



पद्मावती नगर येथे संत श्री सेवालाल बापूंच्या पावन झेंड्याजवळ प्रा.डी.बी.चव्हाण नायक व नितीन राठोड कारभारी यांच्या नेतृत्वाखाली तीज गौरी मातेची विधिवत पेरणी करण्यात आली होती. त्यानंतर तीज मातेच्या तीज तोडणीचा तसेच समारोपीय विसर्जनाचा कार्यक्रम महात्मा फुले सभागृहात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी नागपूर शहरातील विविध भागांतून समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. तीज महोत्सवाच्या समारोपीय कार्यक्रमात महिला भगिनींनी तीज गौरी मातेची स्तुतीपर पारंपरिक गीते सादर केली. पारंपरिक वेशभूषेत महिलांनी केलेल्या नृत्याने कार्यक्रमाला विशेष रंगत आली. भक्तिगीते, पारंपरिक गीत- नृत्य आणि उत्साहपूर्ण वातावरणामुळे संपूर्ण सभागृह भक्तिमय झाले होते. महिला भगिनींनी पारंपरिक पद्धतीने तीज मातेची पूजा- अर्चना करून आपल्या कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी तसेच समाजाच्या मंगलमय भविष्यासाठी प्रार्थना केली.

तीज हा केवळ धार्मिक उत्सव नसून समाजाच्या लोकपरंपरा, सांस्कृतिक वारसा आणि सामाजिक बांधिलकी जपणारा उत्सव असल्याचे यावेळी दिसून आले. आधुनिकतेच्या काळातही आपल्या पूर्वजांनी जपलेल्या परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या महोत्सवाच्या माध्यमातून करण्यात आले. विशेषतः महिला भगिनींच्या मोठ्या सहभागामुळे तीज महोत्सवाला सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले.

प्रा.डी.बी. चव्हाण नायक व नितीन राठोड कारभारी यांच्या संघटन कौशल्यातून तसेच समाजातील रूढी-परंपरा आणि आध्यात्मिक मूल्ये जपण्याच्या भावनेतून नागपूर नगरीतील बहुतांश समाज बांधव एकत्र आले. विविध भागातील समाजबांधवांनी एकत्र येत तीज महोत्सव साजरा केल्याने समाजातील एकोपा, बंधुभाव आणि सामाजिक एकतेचे दर्शन घडले. या कार्यक्रमाला आत्माराम राठोड, इंजि. एन.एस. पवार, प्रा.डॉ.विजय राठोड, गणेश राठोड (उपायुक्त,NMC), रमेश आडे (उपायुक्त), प्रा. डॉ.दिलीप चव्हाण, लोबीचंद राठोड, यू. के. राठोड, प्रा. ईश्वर चव्हाण, सुरेश राठोड (उपअभियंता), विनोद जाधव, राजदीप राठोड (संघटक, शिवसेना), रणजीत राठोड, सहदेव चव्हाण, खेमचंद चव्हाण, रामप्रसाद राठोड, मधुकर राठोड, सुरेश राठोड, विनोद राठोड (मेडिकल), ओंकार चव्हाण, नरेंद्र चव्हाण, राजेश राठोड (मेडिकल) यांच्यासह महिला भगिनी व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी तीज महोत्सवाच्या माध्यमातून समाजातील पारंपरिक संस्कृती आणि रूढी- परंपरा जतन करण्याच्या उपक्रमाचे कौतुक केले. अशा सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे नव्या पिढीला आपल्या समाजाच्या परंपरा, श्रद्धा आणि सांस्कृतिक वारशाची ओळख होते, तसेच समाजातील एकोपा अधिक मजबूत होतो, असा सूर उपस्थितांमध्ये होता.

तीज महोत्सवाच्या निमित्ताने महिला भगिनींमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला. पारंपरिक गीतांवर आणि नृत्यावर महिला भगिनींनी आनंद व्यक्त केला.

संपूर्ण कार्यक्रमस्थळी जय सेवालालच्या जयघोषासह भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. परंपरा, श्रद्धा, संस्कृती आणि सामाजिक एकतेचा संदेश देणारा तीज महोत्सव नागपूर नगरीत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या महोत्सवामुळे समाजातील महिला भगिनी व समाज बांधवांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, भविष्यातही अशाच प्रकारे समाजाच्या सांस्कृतिक परंपरांचे जतन आणि संवर्धन करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.अशी माहिती प्रसिद्धी प्रमुख सहदेव चव्हाण यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

# सिग्नल तोडून भरधाव टिप्परची एसटी बसला धडक, उमरेड बायपास चौकात थरार

### अपघातात चालक जखमी; बससह कार, दुचाकी व लोखंडी शेडचे नुकसान, रेती वाहतूक करणाऱ्या टिपर चालकाच्या बेजबाबदारपणावर प्रश्नचिन्ह

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

उमरेड शहरातील बायपास चौकात वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवून भरधाव वेगाने धावणाऱ्या टिप्परने एसटी बसला जोरदार धडक दिल्याची घटना सोमवारी ७ सप्टेंबर सकाळी सुमारे ६ वाजता घडली. सिग्नल बंद असतानाही न थांबता टिप्पर चालकाने वाहन पुढे नेत हा अपघात झाल्याची तक्रार उमरेड पोलिसांत दाखल करण्यात आली आहे. या घटनेमुळे रेती वाहतूक करणाऱ्या अवजड वाहनांवर नियंत्रण नेमके कुणाचे असा संतप्त सवाल नागरिकांकडून विजय रमेशराव घुमडे यांनी उपस्थित केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या उमरेड आगारातील चालक उमेश पंजाबराव मनोहर हे सकाळी एसटी बस क्रमांक एमएच-४० एन-७५९१ घेऊन आगारातून निघाले होते. त्यांच्यासोबत वाहक अनिल लटारुजी चौधरी होते. बस उमरेड बायपास चौकातील सिग्नलजवळ पोहोचली असता सिग्नल हिरवा असल्याने चालक बस गिरड रोडने पुढे नेत होते.

याचवेळी भिवापूर मार्गाकडून नागपूर मार्गाकडे येणाऱ्या एमएच-४० सीएक्स-१९५१ क्रमांकाच्या टिप्पर चालकाने सिग्नलचे उल्लंघन करत भरधाव वेगाने वाहन चालविले आणि एसटी बसच्या वाहकाच्या बाजूच्या मधल्या भागाला जोरदार धडक दिली. धडकेनंतर बस चालकाचे नियंत्रण सुटले आणि बस थेट बायपास चौकातील क्रिश वाघमारे वस्त्रालय आणि मोहिनी जनरल स्टोअर्स कडे वेगाने गेली. या धडकेत एमएच-३१ डीसी-८५९० क्रमांकाची कार, एमएच-४० यू-५३१३ क्रमांकाची डिस्कव्हर मोटारसायकल आणि समोरील मोहिनी जनरल स्टोअर्स चे लोखंडी शेडचे नुकसान झाले. एसटी बसच्या समोरील काच व केबिनचेही नुकसान झाले आहे.



अपघातात बस चालक उमेश मनोहर यांच्या डाव्या पायाला मार लागला, तर बसमधील प्रवासी ऋतुजा मोटघरे यांनाही मुका मार लागल्याचे तक्रारीत नमूद आहे. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली.

**रेती वाहतुकीच्या टिप्परवर कारवाईची मागणी**

शहरातून वर्दळीच्या वेळी अवजड टिप्परची वेगाने होणारी वाहतूक नागरिकांसाठी धोकादायक ठरत असल्याचा मुद्दा या घटनेमुळे पुन्हा ऐरणीवर आला आहे. रेती वाहतूक करणाऱ्या टिप्परना नियमांची भीती आहे की नाही सिग्नलवरही नियम पायदळी तुडविले जात असतील तर सामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेची जबाबदारी कोणाची असा सवाल आता उपस्थित होत आहे. या प्रकरणात टिप्पर पोलिसांनी ताब्यात घेतला असून, चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २८१, १२५(अ), ३२४(४) तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास उमरेड पोलीस करीत आहेत.

रेती वाहतुकीच्या नावाखाली रस्त्यावर धावणाऱ्या अवजड वाहनांवर कठोर नियंत्रण, वेगमर्यादेची अंमलबजावणी आणि सिग्नल उल्लंघन करणाऱ्या चालकांवर कडक कारवाई होणे गरजेचे आहे. या अपघाताने प्रशासनाच्या वाहतूक नियंत्रण व्यवस्थेलाही आत्मपरीक्षण करण्याची वेळ आणली आहे.

## भिवापुरात पोलिसांचा मॉक ड्रिल, रूट मार्च



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

आगामी पोळा, गणेश स्थापना व विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर भिवापूर पोलिसांच्या वतीने सोमवारी (७ सप्टेंबर) शहरात मॉक ड्रिल व रूट मार्च घेण्यात आला. पोलीस उपविभागीय अधिकारी मयंक माधव यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमाचे नेतृत्व ठाणेदार रवींद्र मस्कर यांनी केले. यावेळी ठाण्यातील चार अधिकारी, १४ पोलीस अंमलदार तसेच आरएसीपी पथकातील ३० जवान सहभागी झाले. लाठी, ढाल व हेल्मेटसह पोलिसांनी जमाव पांगविणे व दंगल नियंत्रणाचे प्रात्यक्षिक केले. सण-उत्सवाच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करणे, हा रूट मार्चचा उद्देश होता. शहरातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आलेला रूट मार्च शांततेत पार पडला.

## शील सुधाकर चाटी यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



श्री बालाजी अपार्टमेंट, शंकरनगर येथील रहिवासी श्रीमती शील सुधाकर चाटी यांच अल्प आजाराने निधन झाले. त्या मृत्युसमयी ७९ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात त्यांचे पती, दोन मुले, तीन मुली व बराच मोठा आप्त परिवार आहे. त्याची अंतिम यात्रा मंगळवारी ८ सप्टेंबर रोजी दुपारी १२.३० वाजता त्यांच्या राहत्या घरून निघून अंबाझरी घाटावर जाईल.

## सोन्याच्या दरात ५.०३ टक्क्यांची भरघोस वाढ

**वृत्तसंस्था, मुंबई :** समोर आलेल्या आकडेवारीनुसार, ५ ऑगस्ट रोजी ९९.९ टक्के शुद्धतेच्या सोन्याचा दर १,४५,६२६ रुपये प्रति १० ग्रॅम इतका होता. ७ सप्टेंबर रोजी यामध्ये वाढ होऊन हा भाव १,५३,३४० रुपये प्रति १० ग्रॅमवर पोहोचला आहे. म्हणजेच अवघ्या महिनाभरात सोने प्रति १० ग्रॅममागे ७,७१४ रुपयांनी महागले आहे. टक्केवारीच्या हिशोबाने सोन्याच्या किमतीत ५.०३ टक्क्यांची वाढ झाली आहे.

# महावितरणच्या कंत्राटी लाईनमनला लाच घेताना रंगेहाथ अटक

### खासगी कामांसाठी पैशांची मागणी केल्याचा आरोप, नागमंदिर चौकातील कारवाई

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

महावितरणच्या सावनेर विभागात आऊटसोर्सिंगच्या माध्यमातून कंत्राटी तत्वावर लाईनमन म्हणून कार्यरत असलेल्या मुकेश चिंतामण मस्के याच्यावर ७ सष्टेंबरला दुपारच्या दरम्यान नागपूर लाचलुचपत प्रतिबंधक विभागांने सापळा रचून कारवाई केली.




मुकेश चिंतामन मस्के हा अर्बन डीसी अंतर्गत बिलाची वसुली करणे, मीटर बसविणे व ग्राहकांच्या तक्रारी सोडविणे ही कामे कांत्रटी पध्दतीने करीत होता. मात्र, याचबरोबर काही खासगी ठेके घेऊन केबल बदलणे, पोल ईस्टमेटशिवाय काम करण्यासाठी अधिक खर्च सांगणे असे नियमबाह्य प्रकार केल्याचा आरोप आहे. त्याच्या या प्रकारमुळे काही ठेकेदारात नाराजीचे असून, त्यांच्यात वाद-विवाद सुरू असल्याची माहिती आहे. आज दुपारी साडेबारा वाजताच्या सुमारास सावनेर रोडवरील नाग मंदिराजवळ लाचलुचपत प्रतिबंध विभागाने त्यास लाच स्विकारतांना रंगे हात पकडून ही सापळा कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.

सावनेर शहरात लाचलुचपत विभागाने कारवाई केल्याची माहीती सोशल मिडियावर झळकाताच अनेक विभागाचे धाबे दनानू लागले व कारवाई कुठे व कोणत्या विभागात झाली याचा शोधाशोध सुरु झाला.व सदर कारवाई महावितरण कार्यालय उप-बिभागीय अभियंता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित सावनेर उपविभाग सावनेर महावितरण सावनेर कार्यालय (अर्बन डीसी) येथील कांत्रटी कर्मचाऱ्यांवर लाचलुचपत विभागाची कारवाई झाल्याची माहीती मिळताच सर्व विभागाने सुटकेचा श्वास घेतला

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराचा एक फोटो स्टुडिओ होता आणि त्यांचे सुमारे पाच हजार रुपयांचे बिल थकीत होते. त्यामुळे, त्यांचे मीटर काढून नेण्यात आले होते. मीटर पुन्हा बसवण्यासाठी त्याने त्यांच्याकडे अधिक पैशांची मागणी केली, ज्यामुळे पीडित व्यक्तीने त्याच्याविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. ७ सप्टेंबर रोजी, मुकेश तक्रारदाराच्या दुकानात पोहोचला आणि ८५०० रुपये घेऊन त्याला रंगेहाथ अटक केली.

ही कारवाई नागपूर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक दिगंबर प्रधान, अतिरिक्त पोलीस अधीक्षक माधुरी बाविस्कर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक विजय माहुलकर यांच्या मार्गदर्शनाखाली, उपअधीक्षक सुषमा बिसांद्रे, महिला हवालदार आमसिता, पोलीस कॉन्स्टेबल विकेश राऊत यांच्या नेतृत्वाखाली उपअधीक्षक भारती गुरनुळे, पोलीस निरीक्षक संतोष जाधव यांनी केली.

थोडक्यात

## कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनतर्फे मुख्य अभियंता डॉ. भूषण शिंदे यांचे स्वागत



**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

स्थानिक औष्णिक वीज केंद्राचे मुख्य अभियंता विवेक रोकडे यांची कार्यकारी संचालक (प्रकल्प)पदी पदोन्नती झाल्याने त्यांच्या रिक्त जागी कोराडी प्रकल्पाचे डॉ. भूषण शिंदे यांची खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राच्या मुख्य अभियंता पदी निवड करण्यात आली. मुख्य अभियंता डॉ. भूषण शिंदे यांनी खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राचा पदभार सांभाळल्यानंतर खापरखेडा कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशनतर्फे संघटनेचे अध्यक्ष दिलीप बनसोड यांच्या हस्ते डॉ. भूषण शिंदे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आला. यावेळी कामगार कल्याण अधिकारी आनंद वाघमारे प्रामुख्याने उपस्थित होते.

याप्रसंगी कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे महासचिव दिवाकर घेर, एम. एफ. जैन, शामराव सरोदे,अनिल भोयर, कुणाल भोस्कर, महेश अढाऊ, पुरुषोत्तम चांदेकर, रमेश लोणारे,अहफाझ अहमद, मनोज डेविड, विनोद बरडे, दिलीप ढगे, राहुल गेडाम, चंद्रकांत तुपकर, राजेश खंडारे, रामचंद्र जोगे, देवाजी कुबडे,राजू गभने, हेमराजसिंह परिहार, चंद्रशेखर पानतावणे, नानू भगत, अमरीश गेडाम, राजेश गायकवाड, केशव पानतावणे, तुषार जेस्वानी, दिनेश लोडेकर, सुधीर फेन्डर, कबीर हुसेन, अशोक वासनिक, सुरज भारद्वाज, नागेश निकोसे, इजाज भाई, अमित मेश्राम,आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

## रामटेकमध्ये २५० नागरिकांची नि :शुल्क आरोग्य तपासणी



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

डॉ. लोकचंद शरणांगत यांच्या पुण्यतिथीनिमित्त रामटेक येथील रामाळेश्वर मंदिरात रविवारी (६ सप्टेंबर) भव्य निःशुल्क आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत झालेल्या या शिबिराचा सुमारे २५० नागरिकांनी लाभ घेतला. शिबिरात हृदयरोग, नेत्ररोग, स्त्रीरोग, दंतरोग, त्वचारोग, अस्थिरोग, बालरोग, जनरल फिजिशियन, आयुर्वेद, होमिओपॅथी तसेच अकुप्रेसर विभागांतर्गत तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी करून उपचार व आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. यावेळी रक्तदाब, रक्तशर्करा, ईसीजी, एचबीए१सी, लिपिड प्रोफाइल आणि बीएमडी यांसह विविध तपासण्या मोफत करण्यात आल्या. हृदयरोग तज्ज्ञ डॉ. खुशाल शरणांगत यांनी सीपीआरचे प्रात्यक्षिक करून दाखविले. हृदयविकाराच्या प्रसंगी सीपीआरमुळे रुग्णाचे प्राण वाचविण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले.

डॉ. हिती शरणांगत, डॉ. कश्मीरा शरणांगत, डॉ. निकुंज शरणांगत, डॉ. पंकज शरणांगत, डॉ. निलेश गद्देवार, डॉ. भास्कर पटले, डॉ. राहुल तुरकर, डॉ नुपूर तूरकर, डॉ. वेदश्री घाटबांधे व अकुप्रेसर तज्ज्ञ नत्थू घरजाळे यांनी रुग्णांची तपासणी केली. शिबिराच्या आयोजनासाठी आशिष शरणांगत, सूर्यकांता शरणांगत, भोंजू कटरे व प्लॅटिना हॉस्पिटलचे सीईओ चेतन गुप्ता यांनी परिश्रम घेतले. यावेळी विवेक तुरक, संजय झाडे व कमलेश शरणांगत व बंडू सांगोडे उपस्थित होते.

## संताजी जगनाडे चौकात पोलिसांची दंगल नियंत्रण मॉक ड्रिल

**पोळा, गणेशोत्सव व नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा सराव, गर्दी नियंत्रणासह जखमींना सुरक्षित बाहेर काढण्याचे प्रात्यक्षिक**




**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

सकाळची नेहमीची वर्दळ सुरू असताना शहरातील संताजी जगनाडे चौकात अचानक पोलिसांची मोठी हालचाल दिसू लागल्याने नागरिकांचे लक्ष वेधले गेले. पोलिसांकडून दंगलसदृश परिस्थिती निर्माण करून ती हाताळण्याचे प्रात्यक्षिक सुरू असल्याचे समोर आल्यानंतर नागरिकांनी कुतूहलाने हा सराव पाहिला. उपविभागीय पोलिस अधिकारी तथा आयपीएस अधिकारी मयंक माधव यांच्या आदेशानुसार, पोलीस निरीक्षक धनाजी जळक यांच्या नेतृत्वाखाली पोलीस दल व दंगा नियंत्रण पथकाच्या वतीने हे मॉक ड्रिल घेण्यात आले. यावेळी दंगलसदृश परिस्थितीत पोलिसांनी कोणत्या पद्धतीने कार्यवाही करावी, याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करण्यात आले. कांबरेखाली फायर करण्याचे आदेश, जमावावर नियंत्रण मिळविणे, जखमींना सुरक्षितपणे उचलून बाहेर नेणे तसेच परिस्थितीनुसार पोलिस दलाने समन्वयाने कसे काम करावे, याचा सराव करण्यात आला.

आगामी पोळा, गणेशोत्सव व नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिस प्रशासनाकडून हा उपक्रम राबविण्यात आला. सण-उत्सवांच्या काळात मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी होत असल्याने कोणतीही अनुचित परिस्थिती उद्भवल्यास पोलिस दलाने तत्परतेने परिस्थिती नियंत्रणात आणावी, यासाठी या सरावाचे आयोजन करण्यात आले. संताजी जगनाडे चौकासारख्या शहरातील अतिवर्दळीच्या ठिकाणी पोलिसांची सुरू असलेली कारवाई पाहून सुरुवातीला काही नागरिकांना शहरात नेमके काय घडले? असा प्रश्न पडला. मात्र, हा प्रत्यक्ष दंगा नसून आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून करण्यात आलेले दंगल नियंत्रणाचे प्रशिक्षण असल्याचे स्पष्ट झाले.

# रामसेतूजवळ एलसीबीचा सापळा : दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांकडून गुन्हे उघडकीस

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**

चोरीच्या दुचाकी विक्रीसाठी घेऊन फिरणाऱ्या दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले. त्यांच्याकडून जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीतून चोरीस गेलेल्या चार मोटारसायकली जप्त करण्यात आल्या. या कारवाईत एकूण १ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. ७ सप्टेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी व अंमलदारांना दोन



विधीसंघर्षग्रस्त बालक चोरीची वाहने विक्री करण्यासाठी घेऊन फिरत असल्याची गुप्त माहिती मिळाली.

माहितीच्या आधारे पथकाने रामसेतू पुलाजवळ सापळा रचून दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडील चौकशीत रामनगर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा क्रमांक १०५७/२०२६ तसेच पोलीस ठाणे पडगुस येथील गुन्हा क्रमांक २८०/२०२६ मधील चोरीस गेलेल्या दुचाकी आढळून आल्या. यानंतर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या दुचाकी चोरीच्या गुन्ह्यांबाबत माहिती घेण्यात आली.

तसेच तांत्रिक तपासाच्या आधारे दोन्ही बालकांकडे अधिक चौकशी केली असता भद्रावती पोलीस ठाण्यातील गुन्हा क्रमांक ८८४/२०२६ आणि गडचांदूर पोलीस ठाण्यातील गुन्हा क्रमांक ४७२/२०२६ मधील दुचाकी चोरी केल्याची माहिती समोर आली.या कारवाईत चोरीस गेलेल्या चार दुचाकी जप्त करण्यात आल्या असून त्यांची एकूण किंमत १ लाख ३५ हजार रुपये आहे. प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक बलराम झाडोकार, पोलीस हवालदार रजनीकांत पुठ्ठावार, सचिन गुरनुले, सुभाष गोहोकार, पोलीस अंमलदार प्रतिक हेमके, विठ्ठल काकडे, प्रफुल पुष्पलवार, दिनेश अराडे यांचा पथकात सहभाग होता.

## शिक्षक दिनानिमित्त विद्यासागर कला महाविद्यालयात 'स्वयंशासन' उपक्रम उत्साहात

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक :** रामटेक परिसरातील विद्यासागर कला महाविद्यालयात यंदाचा शिक्षक दिन अतिशय उत्साहात पार पडला. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व, भाषण व नियोजन कौशल्ये विकसित व्हावीत, या उद्देशाने महाविद्यालयात दरवर्षी 'स्वयंशासन उपक्रम' राबविण्यात येतो. या उपक्रमांतर्गत विद्यार्थी एक दिवस प्राचार्य, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भूमिका निभावतात. आजच्या या विशेष दिवशी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्राचार्य, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांच्या भूमिका अत्यंत उत्कृष्टपणे पार पाडल्या. सकाळच्या सत्रात नियमित




तासिका पार पडल्या, तर दुपारी एक औपचारिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. ज्योती कवठे होत्या. प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाचे आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. सावन धर्मपुरीवार, डॉ. गिरीश सपाटे, ग्रंथपाल डॉ. आशिष ठाणेकर, डॉ. रवींद्र पानतावणे, डॉ. सतीश महल्ले, डॉ. विलास जायभाये, प्रा. गंगा मोंढे, प्रा. रणजित वायसे, किर्ती जयस्वाल, युनुस पठाण, श्री. रुपेश माळे, श्री. विनोद परतेती, श्री. ज्ञानेश्वर हटवार सर्व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. सुरेश सोमकुवर यांना बाहेरगावी जावे लागल्याने त्यांनी विद्यार्थ्यांशी ऑनलाईन माध्यमातून संवाद साधला व मौलिक मार्गदर्शन केले. शिक्षकांची भूमिका निभावलेल्या विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. तसेच प्राध्यापकांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. सावन धर्मपुरीवार यांनी महापुरुषांच्या विचारांची उदाहरणे देत शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले. अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. ज्योती कवठे यांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील वाटचालीसाठी मूल्यवान असे मार्गदर्शन केले.

कला, मानवविद्या, भाषा व साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल डॉ. सावन धर्मपुरीवार यांना 'नॅशनल नवोदय पुरस्कार २०२६' या प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय सन्मानाने गौरविण्यात आले. या निमित्ताने महाविद्यालयातर्फे त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. हा सत्कार विद्यार्थ्यांना नवी स्वप्ने उडविण्यासाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या विद्यार्थी प्रतिनिधी जिया हिरोंदी, मुस्कान ठाकूर, नागेश्वरी मलेवार, धनश्री नरूले, तृप्ती पिसोडे, योगिता कुंजेकार, मानसी खोब्रागडे, युगांती दूधपचारे, रेशम भोयर, महेक कोकण व योगिनी शरणागत यांच्या नियोजनातून संपन्न झाला. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन तृतीय वर्षाची विद्यार्थिनी अश्विनी नागपुरे हिने केले, तर आभार प्रदर्शन अनुष्का खोब्रागडे हिने केले.

## महाराष्ट्रातील लोधी समाजाचा केंद्रीय ओबीसी यादीत समावेश करा!

**केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना आलोक संघटनेचे निवेदन, केंद्र सरकारने तातडीने निर्णय घेण्याची मागणी**



**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

महाराष्ट्रातील लोधी/लोधा/लोध समाजाचा केंद्रीय इतर मागासवर्गीय यादीत समावेश करण्यात यावा, या प्रमुख मागणीसाठी अखिल भारतीय लोधी/लोधा/लोध अधिकारी-कर्मचारी संघ (आलोक), महाराष्ट्र प्रदेशचे अध्यक्ष नरेंद्रकुमार लिल्हारे यांच्या वतीने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्रात लोधी समाजाची मोठी लोकसंख्या असूनही समाज आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला आहे. महाराष्ट्र शासनाने २००४ मध्ये शासन निर्णयाद्वारे लोधी समाजाचा ओबीसी प्रवर्गात समावेश केला आहे. त्यामुळे राज्यात ओबीसी प्रवर्गाला मिळणाऱ्या विविध सवलती व सुविधांचा लाभ समाजाला मिळत आहे.

**केंद्रीय ओबीसी यादीत समावेश नसल्याने तरुणांना फटका**

मात्र, केंद्र सरकारच्या ओबीसी यादीमध्ये महाराष्ट्रातील लोधी/लोधा/लोध समाजाचा समावेश नसल्याने केंद्राच्या विविध योजना, शैक्षणिक सुविधा तसेच केंद्र सरकारच्या नोकऱ्यांमधील ओबीसी आरक्षणाचा लाभ समाजातील नागरिकांना मिळत नाही. विशेषतः शिक्षित तरुणांना केंद्र सरकारच्या विविध विभागांमधील डइउ आरक्षित पदांसाठी अर्ज करताना अडचणींचा सामना करावा लागत असून, रोजगाराच्या संधींवर त्याचा परिणाम होत आहे.

**वर्षानुवर्षांपासून पाठपुरावा, केंद्राच्या निर्णयाची प्रतीक्षा**

लोधी/लोधा/लोध समाजाचा केंद्रीय ओबीसी यादीत समावेश करण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाकडे सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. मात्र, अद्याप या मागणीवर केंद्र सरकारकडून ठोस निर्णय झालेला नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. केंद्र सरकारने सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या माध्यमातून आवश्यक ती कार्यवाही करून महाराष्ट्रातील लोधी/लोधा/लोध समाजाचा केंद्रीय डइउ यादीत समावेश करावा आणि समाजाला न्याय द्यावा, अशी जोरदार मागणी निवेदनातून करण्यात आली.

यावेळी आमगाव-देवरी विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार भैरसिंह नागपुरे, पंचायत समिती सदस्य गुमानसिंह उपराडे, आलोक महाराष्ट्र प्रदेशचे रोशन लिल्हारे, ज्ञानीराम बनोठे, सुखवंता बनोठे, केवलचंद मच्छिरके, युवराज बसोने, जागेश्वर लिल्हारे, देवेंद्र लिल्हारे, रामचंद लिल्हारे, जयेश लिल्हारे, रोशन गराडे, राजकुमार बसोने, ओमप्रकाश लिल्हारे, नीरज नागपुरे, सुनील लिल्हारे, रामेश्वर लिल्हारे, अशोक नागपुरे, सुरेश नागपुरे, रोशन मस्करे, अनिल नागपुरे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

केंद्रीय ओबीसी यादीत समावेश झाल्यास समाजातील तरुणांसाठी शिक्षण, रोजगार आणि केंद्र सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळण्याचा मार्ग अधिक सुलभ होईल, अशी अपेक्षा आलोक संघटनेने व्यक्त केली आहे.

## पवित्र पोर्टलवरील शिक्षक भरतीतील त्रुटी दूर करा!

**हिंदी माध्यमाच्या उमेदवारांचे शैक्षणिक पात्रतेनुसार पुनर्तपासणी करून न्याय देण्याची मागणी**

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

पवित्र पोर्टलद्वारे सुरू असलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेत हिंदी माध्यमाच्या पदांसाठी पात्र उमेदवारांवर अन्याय होत असल्याचा आरोप करत, भरती प्रक्रियेतील माध्यमनिहाय पात्रतेसंदर्भातील त्रुटींची तातडीने चौकशी करून पात्र उमेदवारांना न्याय देण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात पदवीधर मतदार संघाचे आमदार डॉ. अभिजित वंजारी यांना हिंदी माध्यमाच्या उमेदवारांनी निवेदन दिले.

निवेदनानुसार, शिक्षक भरती प्रक्रियेत हिंदी माध्यमाच्या पदांवर नियुक्तीसाठी काही उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रतेचा विचार करताना विसंगती निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे. काही



उमेदवारांचे मागील १० वर्षांचे शिक्षण मराठी माध्यमातून झाले असले, तरी त्यांनी D.Ed./B.Ed. अभ्यासक्रम हिंदी माध्यमातून पूर्ण केला आहे. त्यामुळे हिंदी माध्यमाच्या शिक्षक पदासाठी आवश्यक पात्रता असूनही काही उमेदवारांना भरती प्रक्रियेत अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तसेच, हिंदी माध्यमाच्या उमेदवारांसाठी उपलब्ध असलेल्या जागा व माध्यमनिहाय नियमांचा योग्य प्रकारे विचार करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. गोंदिया व भंडारा जिल्हा परिषदेसह विविध ठिकाणी हिंदी माध्यमाच्या जागांची जाहिरात व पात्रतेच्या अंमलबजावणीबाबत स्पष्टता नसल्याने उमेदवारांमध्ये संभ्रम निर्माण झाल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

**पात्र उमेदवारांची पुन्हा निष्पक्ष तपासणी करा!**

हिंदी माध्यमाच्या उमेदवारांची शैक्षणिक पात्रता, D.Ed./B.Ed. तसेच भरतीसाठी लागू असलेल्या सर्व निकषांची सखोल व निष्पक्ष तपासणी करून पात्र उमेदवारांना न्याय द्यावा. तसेच नियमबाह्य अथवा चुकीच्या पद्धतीने नियुक्ती झाल्यास शासनाच्या नियमानुसार योग्य कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदनावर हिंदी माध्यमाच्या शिक्षक भरतीतील उमेदवारांच्या स्वाक्षऱ्या असून, पवित्र पोर्टलवरील त्रुटींमुळे पात्र उमेदवारांचे नुकसान होऊ नये आणि भरती प्रक्रिया पारदर्शकपणे राबवावी, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे. निवेदन देण्यासाठी हिंदी माध्यमचे उमेदवार ललित मच्छिरके, गायत्री दिपक नागपुरे, राजेश्वरी मानदास बसेना, दीपक मच्छीरके, प्रदीप नागपुरे, ज्योती मच्छीरके उपस्थित होते.

## कामगारांच्या संवादाला मिळाले नवे व्यासपीठ

**उमरेड विभागात इलेक्ट्रिसिटी लाईन स्टाफ असोसिएशनच्या वार्ताफलकाचे उद्घाटन**

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड मनिष शिंगणे**

इलेक्ट्रिसिटी लाईन स्टाफ असोसिएशन महाराष्ट्रच्या वतीने उमरेड विभाग, नागपूर येथे नव्याने उभारण्यात आलेल्या वार्ताफलकाचे उत्साहपूर्ण वातावरणात उद्घाटन करण्यात आले. कामगारांपर्यंत संघटनेचे निर्णय, शासनाचे आदेश, परिपत्रके, विविध उपक्रम तसेच महत्त्वाच्या सूचनांची अधिकृत व अचूक माहिती वेळेत पोहोचविण्यासाठी हा वार्ताफलक महत्त्वपूर्ण दुवा ठरणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे अध्यक्ष रमेशदादा




वाटकर होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून राजु अली मुल्ला यांची उपस्थिती लाभली. यावेळी उमरेड उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता जळगावकर तसेच सिर्सी वितरण केंद्राचे सहाय्यक अभियंता गौरकर प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी संघटनेचे उपाध्यक्ष विजय सोनटक्के, उपसरचिटणीस लक्ष्मण वैरागडे, प्रवक्ता राजेश बावनकुळे आणि नागपूर प्रादेशिक सचिव नागेश ठाकरे यांनी मनोगत व्यक्त केले.

**वार्ताफलक म्हणजे केवळ सूचना नव्हे, संवादाचा दुवा**

मार्गदर्शन करताना रमेशदादा वाटकर यांनी वार्ताफलकाचे महत्त्व अधोरेखित केले. वार्ताफलक हा केवळ सूचना लावण्याचा फलक नसून संघटना आणि कामगार यांच्यातील संवादाचा महत्त्वाचा दुवा आहे असे त्यांनी सांगितले. संघटनेची भूमिका, कामगारांच्या प्रश्नांवरील निर्णय आणि शासनाचे आदेश पारदर्शकपणे प्रत्येक कामगारापर्यंत पोहोचणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रमुख मार्गदर्शक राजु अली मुल्ला यांनी कामगारांची एकजूट, संघटनेतील शिस्त आणि हक्कांसाठी सातत्यपूर्ण संघर्ष यांचे महत्त्व सांगितले. संघटना अधिक मजबूत करण्यासाठी प्रत्येक पदाधिकारी व सभासदाने आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी, असे आवाहन त्यांनी केले.

प्रवक्ता राजेश बावनकुळे यांनी प्रभावी संवादासाठी वार्ताफलकाची भूमिका स्पष्ट केली. कामगारांना अधिकृत व अचूक माहिती वेळेत उपलब्ध करून देणे आवश्यक असून, या माध्यमातून संघटनेची संवादव्यवस्था अधिक सक्षम होईल, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाला नागपूर परिमंडळ सचिव जगदीश दोहतरे, नागपूर ग्रामीण प्रादेशिक अध्यक्ष प्रदीप गभणे, सचिव रंगलाल रामटेके, नागपूर शहर प्रादेशिक सचिव हेमंत पाटील यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमामुळे उमरेड विभागातील कामगारांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कामगारांची एकजूट, संघटनेची ताकद आणि पारदर्शक संवाद या त्रिसूत्रीच्या माध्यमातून संघटना अधिक सक्षम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आचल वंजारी, रोशन गेडाम, कमलेश नांदकर, आशिष बनकर, रुपेश तांबे आणि नितेश मेश्राम यांच्यासह उमरेड विभागातील पदाधिकारी व सभासदांनी परिश्रम घेतले.

# सप्तरंगी इंद्रधनू : सामाजिक मूल्य जपणारी कविता !

समिक्षण
राजू गरमडे
ऊर्जानगर, चंद्रपूर

कवयित्री,लेखिका सौ.सुरेखा बोरकर (नागपूर) यांचा शब्दशिल्प प्रकाशन,नागपूर या नामवंत अशा प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेला "सप्तरंगी इंद्रधनू" हा कवितासंग्रह नुकताच वाचण्यात आला. कवयित्रीने हा कवितासंग्रह सस्नेह भेट म्हणून पाठविल्याबद्दल त्यांचे मी मनपुर्वक आभार मानतो.

"गुलाब आणि इतर कविता" या कवितासंग्रहानंतर आलेला हा त्यांचा दुसरा कवितासंग्रह. कवयित्री सौ. सुरेख बोरकर या गृहिणी आहेत. वाचनाची आवड मनोभावे जोपासताना त्या काव्यलेखन करू लागल्या. विविध वृत्तपत्रे, मासिके यामध्ये त्यांच्या कविता प्रकाशित होऊ लागल्या. कवितेच आभाळ विस्तारु लागल आणि त्या फेसबुकवर कविता पोस्ट करू लागल्या. अनेकांचे प्रोत्साहन, कौतुक यामुळे त्यांच्या काव्यलेखनाला गती मिळाली आणि अल्पावधीतच त्यांचे दोन कवितासंग्रह प्रकाशित झाले.

"सप्तरंगी इंद्रधनू" या कवितासंग्रहामध्ये एकून ७२ कविता आलेल्या आहेत.मानवी जीवनाचे विविधरंग त्यांच्या कवितेमधून अधोरेखित झालेले आहेत. मानवी जीवनावरची निष्ठा, नैतिकता, सामाजिक भान आणि कर्तव्ये यासारख्या भावनांना, विचारांना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी कविता लिहिलेल्या आहेत. वाचकांच्या दृष्टीचा, विचारांचा, भावनांचा परिघ विस्तारुन जीवन जगण्यासाठी मानसिक बळ देणारी, प्रेरणा देणारी त्यांची कविता वाचकांच मनोविश्व व्यापून टाकणारी आहे.

निसर्गसृष्टीवर, मानवी जीवनावर, प्रारब्धावर, हिरव्या रानावर, नदीवर, चिऊताईवर, आईवर, पोस्टमनवर, स्त्रीमनावर, बेरोजगारीवर, गुरुवर, व्यसनांवर, सुर्यावर, फुलावर, वृत्तपत्रावर यासारख्या अनेक विषयांनी सजलेल्या कविता या कवितासंग्रहामध्ये आहेत.

कवयित्री "गुरु ज्ञानदाते" या कवितेंमधून गुरुप्रति आत्मिय भाव व्यक्त करीत आहे. आईवडील हे आपले जन्मदाते असून गुरु सुद्धा आहेत. पण, आपल्या आयुष्याला आकार देणारे, घडविणारे, ज्ञानाने संपन्न करीत विचार आणि संस्कार रुजविणारे गुरु हे सुद्धा आपले दुसरे गुरु आहेत.या गुरुचा सन्मान आपण केला पाहिजे असे त्या कवितेमधून विचार मांडीत आहेत.

आद्य गुरु मातापिता
दुजा शिक्षकाचा मान,
शिल्पकार जीवनाचे
त्यांचा करुया सन्मान

गुरुविषयी आदरभाव व्यक्त करणारी ही कविता आहे. स्त्री ही विश्वाची जननी आहे. तिच्या उदरातूनच ही सृष्टी निर्माण होत असते. ती कुटुंबाला एकसंध ठेवते. घराला घरपण आणते. तिचं अस्तित्वच मुळी घरादाराला नवचैतन्य देणार असत.सासर आणि माहेर ही दोन्ही घर प्रकाशमान करणारी ती स्वयंसिद्धा आहे."स्त्री महिमा" या कवितेत स्त्रिविषयी भावना व्यक्त करताना लिहितात,

नारी खरी शक्तीमान
तिचे अस्तित्व महान,
साऱ्या विश्वाची जननी
नवनिर्मितीची खान

स्त्रिप्रति आदरभाव व्यक्त करणारी ही कविता आहे. नरदेह लाभणे हीच खुप मोठी गोष्ट आहे.खर ते आपलं पुण्याचं संचित आहे. ८४ लक्ष योनीमध्ये मानव देह हा दुर्लभ आहे. म्हणूनच "देह देवाचे मंदिर" या कवितेत नरजन्माविषयी लिहितात,

नरदेह लाभे भाग्य
व्हावे सार्थक जीवाचे,
जन्म नराचा दुर्लभ
पुण्य ते जन्मोजन्मींचे

शेवटी या कवितेत त्या लिहितात,

देह यावा सदा कामी
दुःखी कष्टी जनांसाठी,
जसा भक्तांच्या हाकेला
धाव घेई जगजेठी

जसा ईश्वर हा भक्ताच्या हाकेसरसी धावून येतो तसाच हा नरदेह समाजाच्या कल्याणासाठी, दीनदुबळ्यासाठी, अनाथ-निराधारासाठी तसेच दुःखी कष्टी लोकांसाठी जर कामी येत असेल तर या देहाच सार्थकच झाल्यासारखे होईल असे कवयित्री या कवितेत लिहितात. नरदेहाच्या सार्थकतेविषयी लिहिलेली ही कविता आपल्यामधल्या आसक्तीला दूर सारणारी आहे.

कवयित्री आपल्या "संयम" कवितेमधून आपल्या स्वप्नांना साकार करण्याविषयी लिहित आहे. जर आपल्यामध्ये इच्छाशक्ती, चिकाटी, दृढ मनोबल, प्रयत्न करण्याची मानसिक वृत्ती असेल तर आपल्याला यशापासून आणि आपली स्वप्नपूर्ती होण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. त्या लिहितात,

मनी ठेवावा विश्वास
मानू नये कधी हार,
परिश्रम चिकाटीने
स्वप्न होतसे साकार

स्वप्नपुर्तीवर लिहिलेली ही कविता आपल्याला प्रयत्नाच महत्व सांगणारी आहे.

व्यसन ही आपल्या समाजाला लागलेली ही कीड आहे.ती वेळीच दूर केली नाही तर सामाजिक स्वास्थ्य बिघडल्याशिवाय राहणार नाही. व्यसनाचे अनेक दुरगामी परिणाम कुटुंबावर होत असतात.

म्हणूनच "व्यसन" या कवितेत त्या लिहितात,

का उगा नादी लागतो रे ?
भल्या माणसा तू मदिरेच्या,
चिंतामुक्त होण्यासाठी
नको आहारी जाऊ नशेच्या

याशिवाय नवी उमेद,माय मराठीचा जागर,मार्ग जरी ओसाड हा, पोशिंदा, माणसातला देव, रक्तदान, नंदादीप, कालचक्र, लावू एक तरी झाड यासारख्या कविता वाचकांच्या अंतर्मनावर स्वार होणाऱ्या आहे.

कवयित्री सौ. सुरेखा बोरकर यांना त्यांच्या दुसऱ्या कवितासंग्रहासाठी शुभेच्छा देतो आणि लेखनीला पुर्णविराम देतो.

- ▶ कवितासंग्रह : सप्तरंगी इंद्रधनू
- ▶ कवयित्री : सुरेखा बोरकर
- ▶ प्रस्तावना : डॉ. गुरुप्रसाद पाखमोडे
- ▶ ब्लर्ब : प्रभाकर तांडेकर 'प्रदत्त'
- ▶ प्रकाशकः शब्दशिल्प प्रकाशन, नागपूर
- ▶ पृष्ठ : ८८
- ▶ मूल्य :१५०/- रुपये




# खरे संविधान विरोधक ओळखा!

झाडाझडती
विनोद देशमुख
ज्येष्ठ पत्रकार, नागपूर



पायाखालची वाळू घसरली की लोक बेताल वागू लागतात. आणि, असे लोक संस्था किंवा राजकीय पक्ष चालवत असले की ते त्या संस्थेला/पक्षालाही बेताल वागायला लावतात. मनसेच्या विद्यार्थी आघाडीचे प्रमुख, म्हणजे महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष असलेले अमित ठाकरे यांनी गेल्या आठवड्यात पुण्यातील एका सरकारी तंत्रनिकेतन मध्ये लावलेला पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांचा फोटो काढायला लावून असंच बेताल वर्तन केलं. कारण काय? तर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रांगेत मोदींचा फोटो नको म्हणे ! हा महाराजांचा, इतर मान्यवरांचा अपमान आहे? निव्वळ मोदीद्वेषातून 'राज'पुत्रानं खुलेआम हे संविधानविरोधी कृत्य केलं, हे समजून घेतलं पाहिजे.

राजकारणात विरोध असावा, पण द्वेष नको. पण सध्या भाजपा आणि समर्थक पक्ष सोडून इतर सर्व विरोधी पक्ष मोदीद्वेषानं पछाडल्यासारखे वागताना दिसत आहेत. लोकसभेचे विरोधी पक्षनेता या भावी पंतप्रधानपदाच्या पायरीवर उभं राहून राहुल गांधी मोदींबद्दल काहीबाही बोलत असतात. संजय राउतांचा भोंगा मोदींचं नाव घेतल्याशिवाय वाजतच नाही. इतरही काही चिल्लर नेते मोदींवर सतत भुंकत असतात. हा विरोध नसून द्वेष आहे. एक तपापासून दिल्लीत ठाण मांडून बसलेले मोदी या सर्वांच्या डोळ्यात सलत आहेत. "ये हटता क्यूं नही" हे त्यांचं मूळ दुखणं आहे. मुद्यांवर प्रतिवाद करूनही काहीच होत नाही, हे पाहून मग वेडंवाकडं बोलायचं, वेडंवाकडं करायचं आणि प्रसिद्धी मिळवायची, असं काहीतरी? सध्या सुरू आहे. त्यातलाच एक नवीन प्रकार म्हणजे हे फोटो हटवणं. आपल्या कृत्याला गोंडस मुलामा देणं राजकीय नेत्यांइतकं दुसऱ्या कोणालाही साधू शकत नाही बघा. "छत्रपती हे आमचं दैवत आहे. त्यांच्या बाजूला मोदी असणं हा महाराजांचा अपमान आहे" वगैरे शब्दात केलेलं समर्थन फसवं आहे. कारण, हे फोटो आज लागलेले नाहीत. गेली बारा वर्षे ते असेच झळकत आहेत. याकाळात कोणालाही उपरती झाली नाही. देशभरातील सरकारी कार्यालयांमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी, संविधानकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विद्यमान राष्ट्रपती आणि पंतप्रधान यांचे फोटो लावण्याचा दंडक (प्रोटोकॉल) आहे.

महाराष्ट्रात त्यांच्यासोबतच छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले, लोकमान्य टिळक, विद्यमान मुख्यमंत्री आदींचेही फोटो लावले जातात. सरकार कोणत्याही पक्षाचं असो, हे पाळलं जात आहे. असं असताना, कोणीतरी पंतप्रधानांच्या फोटोवर आक्षेप घेतो, हे अनाकलनीय आणि अतिशय गंभीर प्रकरण ठरतं. आम्ही काढलेला मोदींचा फोटो पुन्हा लावला तर आम्ही तो पुन्हा काढून टाकू, हे अमित ठाकरेंचं विधान तर सरळसरळ लोकशाहीला आणि संविधानाला थेट आव्हान देत आहे. असे राजकीय नेते आणि त्यांचे पक्ष यांच्यापासून जनतेनं सावध राहिलं पाहिजे.

छत्रपतींच्या फोटोशेजारी पंतप्रधानांचा फोटो पहिल्यांदा लागला, असंही घडलेलं नाही. सरकारी कार्यालयांसह अनेक खाजगी संस्थांमध्ये, कार्यक्रमांमध्ये असे फोटो शेजारी असतात. त्यात कोणालाही कोणाचाही अपमान झाल्याचं आजवर कधी जाणवलं नाही. खुद्द अमित ठाकरेंनाही यापूर्वी असं काही जाणवल्याचं दिसत नाही. त्यांचे पिता राज ठाकरे, मूळ पितृपक्ष असलेल्या शिवसेनेनंही यावर कधी आक्षेप घेतला नाही. उलटपक्षी, या दोन्ही पक्षांनी स्वतःच उफराटा प्रकार केला असल्याचं उघडकीस आलं आहे. मनसेचे नेते बाळा नांदगावकर यांच्या कार्यालयात त्यांचा फोटो छत्रपतींच्या बाजूला लागलेला आहे. उबाठा शिवसेनेचं मुख्यालय असलेल्या शिवसेनाभवनाच्या दर्शनी भागावर बाळासाहेब ठाकरेंचा भव्य फोटो वरच्या बाजूला आणि खालच्या भागात छोटेसे छत्रपती शिवाजी महाराज स्थापित आहेत. हा छत्रपतींचा अपमान नव्हे का? यावर भाजपा आणि शिंदेसेनेनं प्रश्न विचारले, त्यावर मनसे, उबाठा काहीच बोलताना किंवा करताना दिसत नाही. "आपलं ठेवावं झाकून, दुसऱ्याचं पाहावं वाकून" किंवा "मी सांगे लोका, शेंबुड माझ्या नाका" असाच हा प्रकार झाला ना !

आम्ही वेगळे. आम्ही संविधान मानणार नाही, कायदा पाळणार नाही, राजकीय शुचिता सांभाळणार नाही. तरीही, तुम्ही मात्र आम्ही म्हणू तसंच वागलं पाहिजे, हा लोकशाहीविरोधी हट्ट धरणारेच प्रामुख्यानं संविधानाचे विरोधक असतात. विधानसभा, मुंबई महानगरपालिका निवडणुकीत जनतेनं नाकारल्यानं सैरभैर होऊन ते आता बेताल वागू लागले असल्याचं दिसत आहे. या फोटो-हटाव प्रकरणातून मराठी जनतेनं योग्य तो बोध घेण्याची गरज आहे.

# सन्मान कर्तृत्वाचा : ज्ञानसूर्याच्या ऋणातून उतराई होणारा एक अविस्मरणीय सोहळा!



शब्दांकन...
रामकृष्ण चनकापुरे,
घाटकूळ

समाजाची पायाभरणी करणाऱ्या, विद्यार्थ्यांच्या आयुष्याला आकार देणाऱ्या आणि राष्ट्रनिर्मितीत स्वतःचे आयुष्य चंदनासारखे झिजवणाऱ्या शिक्षकांचा गौरव करणे म्हणजे केवळ सत्कार नव्हे, तर साक्षात ज्ञानगंगेचा केलेला सन्मान असतो. शिक्षक दिनाचे औचित्य साधून चंद्रपूरच्या भूमीत नुकताच पार पडलेला "उत्कृष्ट शिक्षक सन्मान सोहळा २०२६" हा केवळ एक शासकीय वा संस्थात्मक कार्यक्रम उरला नाही; तर ती शिक्षण क्षेत्रातील एका ऋषितुल्य परंपरेची कृतज्ञता पावती ठरली.

विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ, गोविंदराव वंजारी फाऊंडेशन (नागपूर) आणि गोविंद मैना फाऊंडेशन (चंद्रपूर) यांच्या संयुक्त विद्यमाने, माजी आमदार स्वर्गीय ना. बा. सपाटे व स्वर्गीय दत्तात्रय मिझार्पुरे यांच्या पावन स्मृतीला उजाळा देत आयोजित केलेला हा सोहळा डोळ्यांचे पारणे फेडणारा आणि अंतःकरणाला स्पर्शून जाणारा ठरला.

**राज्यस्तरीय सोहळ्यालाही लाजवेल असे अभूतपूर्व नियोजन**

सध्याच्या काळात अनेक पुरस्कार सोहळे होतात; मात्र चंद्रपूरच्या प्रियदर्शनी इंदिरा गांधी सांस्कृतिक सभागृहात रंगलेल्या या सोहळ्याचे प्रयोजन, नियोजन आणि व्यवस्थापन कोणत्याही भव्य राज्यस्तरीय कार्यक्रमाला सहज लाजवेल इतके अचूक, देखणे आणि शिस्तबद्ध होते. मंचावरील व्यवस्था, उपस्थितांचे स्वागत, कार्यक्रमाची सुरेख मांडणी आणि वेळेचे काटेकोर भान या प्रत्येक गोष्टीत संयोजकांचा तळमळीचा आणि कौशल्याचा प्रत्यय येत होता. एक अत्यंत परिपूर्ण आणि भव्य आराखडा प्रत्यक्ष कृतीत उतरल्याचे या सोहळ्यात स्पष्टपणे जाणवत होते.

**क्षमता ९८० ची, उपस्थिती १४०० पार : संयोजनाची खरी कसोटी!**

कोणत्याही भव्य सार्वजनिक कार्यक्रमाच्या यशाचे गमक हे संकटाच्या किंवा अनपेक्षित गर्दीच्या वेळी नियोजक कसे वागतात यात असते. प्रियदर्शनी सभागृहाची बैठक व्यवस्था साधारण ९८० इतकी होती. मात्र, शिक्षण क्षेत्रातील अथांग आदर आणि आयोजकांबद्दलचे प्रेम यामुळे चंद्रपूर, वर्धा व गडचिरोली या तीनही जिल्ह्यांतून तब्बल १४०० हून अधिक शिक्षक, मुख्याध्यापक आणि शिक्षणप्रेमींचा अथांग महासागर तिथे लोटला!

बैठक क्षमतेपेक्षा कितीतरी पटीने अधिक गर्दी असूनही, एकाही शिक्षकाला वा पाहुण्याला कोणताही त्रास झाला नाही. कोणाचीही गैरसोय होऊ न देता, प्रत्येकाला मानाचे स्थान मिळवून देणे आणि शांततेत कार्यक्रम पार पाडणे हे निव्वळ अद्भूत होते. अत्यंत कुशलतेने, नम्रतेने आणि कसब पणाला लावून आयोजक पथकाने हाताळलेली ही व्यवस्था खरोखरच वाखाणण्याजोगी आणि अनुकरणीय ठरली.

**पारदर्शक आणि काटेकोर निवड : गुणवत्तेचाच खरा गौरव**

पुरस्काराचे मोल तेव्हाच वाढते जेव्हा तो मिळवणारी व्यक्ती आणि त्यामागची निवड प्रक्रिया निःपक्षपाती असते. चंद्रपूर, वर्धा आणि गडचिरोली या भागातील संस्थाचालक, मुख्याध्यापक, शिक्षक, प्राध्यापक तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील निदेशकांची निवड करताना निवड समितीने घेतलेले परिश्रम स्पष्ट जाणवत होते. प्रत्येक पुरस्कारार्थी हा आपापल्या क्षेत्रात अहोरात्र तळमळीने काम करणारा, निस्वार्थी आणि कर्तृत्ववान हिरा होता.

कोणालाही उठवून सत्कार करणे अशी ही निवड नव्हती; तर कर्तृत्वाची आणि निष्ठेची कसोटी लावून ही नावे समोर आली होती. म्हणूनच, ज्या वेळी ते सत्कारासाठी मंचावर जात होते, तेव्हा उपस्थितांच्या टाळ्यांचा कडकडाटच सांगत होता की हा पुरस्कार खऱ्या अथार्ने योग्य हातांमध्ये पोहोचला आहे. या निवडीच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणि अचूकता जपणाऱ्या निवड समितीचीही इथे मोठी कसोटी लागली असणार यात शंकाच नाही.

**मार्गदर्शनाची वैचारिक पर्वणी : सभागृह झाले भारावून**

या सोहळ्याची वैचारिक बाजू अधिक संपन्न झाली ती मंचावर उपस्थित असलेल्या दिग्गजांच्या उपस्थितीने. 'जीवनगौरव सन्मान २०२६' चे मानकरी माजी आमदार श्री. व्ही. यू. डायगव्हाणे आणि राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांच्या अनुभवाचे बोल, शिक्षक आमदार तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष सुधाकरजी अडबाले यांचे नेतृत्वगुण आणि मार्गदर्शन, पदवीधर मतदारसंघाचे आमदार अँड. अभिजीतजी वंजारी यांचे प्रेरक विचार आणि वि.मा.शि. संघाचे अध्यक्ष अरविंद देशमुख यांच्या ओघवत्या विचारांनी संपूर्ण वातावरण भारून टाकले. या दिग्गज नेतृत्वांनी शिक्षकांचे हक्क, समाजातील स्थान आणि भविष्यातील आव्हाने यावर प्रकाश टाकत शिक्षकी पेशाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या अभ्यासपूर्ण आणि अनमोल वाणीने प्रियदर्शनी सभागृहातील उपस्थित वर्ग जणू गदगदून गेला, प्रत्येकाच्या मनात एक नवी ऊर्जा आणि आदरभाव निर्माण झाला.

**आपुलकीची तृप्ती देणारे स्नेहभोजन**

कार्यक्रमाची सांगता ज्या आतिथ्याने झाली, तेही तितकेच विशेष होते. बौद्धिक आणि वैचारिक मेजवानीनंतर उपस्थितांसाठी आयोजित करण्यात आलेली स्नेहभोजनाची व्यवस्था अत्यंत दर्जेदार, स्वादिष्ट आणि आदरयुक्त होती. इतक्या मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या सर्व शिक्षक बांधवांना एकाच वेळी आपुलकीने आणि आदराने जेवू घालणे हे कौटुंबिक जिव्हाळ्याचे दर्शन घडवणारे होते. अन्नाची चव आणि वाढणाऱ्यांच्या चेहऱ्यावरील आदर दोन्हीही मनात घर करून गेले.

**समाधानाचा एक भाव आणि सहज सुचलेली कृतज्ञता**

सोहळा संपल्यानंतर जेव्हा सभागृहाबाहेर पावले पडली, तेव्हा प्रत्येक पुरस्कारप्राप्त शिक्षकाच्या, संस्थाचालकाच्या आणि प्रतिनिधीच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहणारा आनंद, सन्मानाची तृप्ती आणि अभिमान स्पष्ट दिसत होता. "आपल्या कष्टाचे चीज झाले" हाच भाव प्रत्येकाच्या मुखातून उमटत होता.

सत्कारमूर्तींच्या चेहऱ्यावरील ते अलौकिक समाधान बघून एक वाचक आणि साक्षीदार म्हणून माज्याही मनाला राहवले नाही आणि या भावना शब्दांच्या रूपाने कागदावर उतरल्या. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ, गोविंदराव वंजारी फाऊंडेशन आणि गोविंद मैना फाऊंडेशन यांनी घेतलेले हे परिश्रम, शिक्षक समाजाला दिलेला हा मान आणि स्वर्गीय नेत्यांच्या स्मृतींना दिलेली ही आदरांजली इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदवली जाईल. या ऐतिहासिक आणि देखण्या सोहळ्याच्या आयोजनाबद्दल आणि शिक्षकांच्या कर्तृत्वाला सलाम करणाऱ्या या उपक्रमाबद्दल सर्व संयोजकांचे मनापासून आभार आणि मनःपूर्वक अभिनंदन!

थोडक्यात

## विद्यार्थ्यांनी साकारला आगळावेगळा शिक्षक दिन



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तोंडली येथे शिक्षक दिन उत्साहपूर्ण व आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला. भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. शिक्षक दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका साकारत अध्यापनाचा अनुभव घेतला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिकेत येऊन वर्गातील शैक्षणिक उपक्रम, प्रश्नोत्तर, मार्गदर्शन तसेच विविध जबाबदाऱ्या उत्साहाने पार पाडल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षकाची भूमिका, जबाबदारी आणि अध्यापनातील आव्हाने यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व, संवाद, लेखन, अभिनय, सर्जनशीलता, नेतृत्व आणि सादरीकरण कौशल्यांना वाव मिळाला. तसेच विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, शिस्त, जबाबदारीची जाणीव, सहकार्याची भावना आणि शिक्षकांविषयी आदर व कृतज्ञता निर्माण झाली. अनुभवातून शिक्षण आणि शिक्षणातून व्यक्तिमत्त्व विकास या संकल्पनेतून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका अत्यंत उत्साहाने व आत्मविश्वासाने पार पाडल्याने शाळेत आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या उपक्रमाचे आयोजन मुख्याध्यापिका कु. अनुराधा धुर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली सहशिक्षक निलेश जाधव यांनी उत्कृष्टरीत्या केले. शिक्षकांच्या सहकार्याने आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शिक्षक दिनाचा कार्यक्रम शैक्षणिकदृष्ट्या समृद्ध व संस्मरणीय ठरला.

## दहीहंडीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तोंडली येथे श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त उत्साहपूर्ण वातावरणात दहीहंडी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण, राधा तसेच गोप-गोपींच्या आकर्षक वेशभूषा साकारून कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी शालेय उपक्रमांचा एक भाग म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दहीहंडीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सांघिक भावना, सहकार्य, नेतृत्वगुण, शिस्त, आत्मविश्वास, सामाजिक जाणीव, सर्जनशीलता व सांस्कृतिक मूल्यांची जपणूक यांचा विकास व्हावा, हा या उपक्रमामागील शैक्षणिक उद्देश होता. वेशभूषा व सांस्कृतिक सादरीकरणातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती व परंपरांची ओळख झाली. तसेच एकत्रितपणे नियोजन करणे, जबाबदारी स्वीकारणे, एकमेकांना सहकार्य करणे आणि समूहभावनेने कार्य करणे याचा अनुभव विद्यार्थ्यांना मिळाला.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह व आनंदाचे वातावरण होते. उत्सवातून शिक्षण आणि शिक्षणातून संस्कार, या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळून त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळाली. या उपक्रमाचे आयोजन मुख्याध्यापिका कु. अनुराधा धुर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली सहशिक्षक निलेश जाधव यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि शिक्षकांच्या नियोजनामुळे दहीहंडीचा कार्यक्रम आनंददायी व शैक्षणिकदृष्ट्या संस्मरणीय ठरला.

## इलाईट पब्लिक स्कूल चाचेर येथे जन्माष्टमी



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

रक्षा बहुउद्देशीय संस्थांचे अध्यक्ष राष्ट्रपाल गजभिये याचा मार्गदर्शनातून इलाईट पब्लिक स्कूल चाचेर येथे जन्माष्टमी उत्सव साजरा करण्यात आला. मुलांनी विविध प्रकारचे ड्रेस, राधाकृष्णाच्या वेषभूषा परिधान करून शाळेत आले होते. याप्रसंगी मुलांना कृष्णजन्माष्टमी विषयी माहिती सांगण्यात आली. मुलांना चॉकलेटचे वितरण करून कार्यक्रमाच्या समारोप करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षकवृंद शबनम शेख, भारती नारनवरे, नेहा पाल, संतोषी बरबटे, आचल वाणी व निकिता कावरे यांनी परिश्रम घेतले.

## सोने-चांदीचे दर एका महिन्यात भिडले गगनाला

**वृत्तसंस्था, मुंबई**

गेल्या महिन्याभरात सोने आणि चांदी खरेदी करू इच्छिणाऱ्या ग्राहकांसाठी तसेच गुंतवणूकदारांसाठी बाजारात मोठी उलथापालथ पाहायला मिळाली आहे. ५ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर या एका महिन्याच्या कालावधीत सोने आणि चांदी या दोन्हींच्या किमतीत लक्षणीय वाढ झाल्याचं दिसून आलं आहे. दरात प्रति १० ग्रॅम ५ टक्क्यांहून अधिक, तर चांदीच्या दरात प्रति किलो तब्बल १० हजार रुपयांहून अधिक वाढ नोंदवण्यात आली आहे.

# प्रारूप मतदार यादीत आपले नाव असल्याची नागरिकांनी खात्री करावी

### मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रे, नगरपंचायत, नगरपरिषद व ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करावी. तांडा वस्ती, पारधी बेडे या ठिकाणी विशेष शिबिरांचे आयोजन करून मतदारांची नोंदणी करण्यात यावी. तसेच मतदार यादीत सर्व मतदारांची नोंद घेण्यात आली असल्याची खात्री करावी असे आदेश विभागीय आयुक्त तथा मतदार यादी निरीक्षक विजयलक्ष्मी बिदरी यांनी आज दिले.

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त तथा मतदार यादी निरीक्षक विजयलक्ष्मी बिदरी यांच्या प्रमुख उपस्थितीत नागपूर येथील राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत बैठक आयोजित करण्यात आली होती. जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित बैठकीला आमदार संजय मेश्राम, आमदार नितीन राऊत, आमदार कृष्णा खोपडे, शिवसेनेचे प्रतिनिधी अध्यक्ष संदीप इटकेलवार, काँग्रेस शहर अध्यक्ष प्रफुल गुडधे, श्रीमती रश्मी बर्वे यांच्यासह मान्यताप्राप्त राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद, अपर आयुक्त प्रदीप कुळकर्णी, अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रवीण महिरे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. रचना इंदुरकर व दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे सर्व मतदार नोंदणी अधिकारी व संबंधित उपस्थित होते.

बैठकीदरम्यान ३१ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध झालेली प्रारूप यादी अद्याप ज्या राजकीय पक्षांनी प्राप्त करून घेतली नाही, ती त्यांच्यापर्यंत तातडीने पोहोचविण्याचे निर्देश श्रीमती बिदरी यांनी दिले.

नागपूर जिल्ह्यात एकूण ४६,३८,५८९ मतदार असून, विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत आजवर ३१,९५,०७८ (६८.८८ टक्के), मतदारांची स्वाक्षरीयुक्त गणना प्रपत्रे प्राप्त झाली असून त्यांची नावे प्रारूप मतदार यादीत समाविष्ट करण्यात आली आहेत. उर्वरित १४,४३,५११ (३१.१२%) मतदार 'गणना प्रपत्र जमा न होणे या प्रवर्गात नोंदवले गेले आहेत. यात बीएलओ यांच्या गृहभेटीदरम्यान न सापडलेले किंवा गैरहजर (५,४५,६४७ - ११.७६ टक्के), कायमस्वरूपी स्थलांतरित (५,२९,९५४ - ११.४२ टक्के), मृत (२,४०,३२७ - ५.१८ टक्के ), अन्यत्र नोंदणी असलेले /दुबार (१,१८,०९९ - २.५५ टक्के ) व इतर (९,४८४ - ०.२० टक्के ) कारणांमुळे प्रपत्र जमा न झालेल्या मतदारांचा समावेश आहे.

जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी दि ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीत आपले नाव तपासावे. यादीत नाव नसल्यास नाव नोंदणीसाठी नमुना क्र. ६ ऑनलाईन किंवा ऑफलाईन भरावा. नाव किंवा पत्त्यात दुरुस्ती करायची असल्यास 'नमुना क्र. ८' आणि मतदार यादीतून नाव वगळण्यासाठी 'नमुना क्र. ७' भरून द्यावा, असे यावेळी प्रशासनाकडून सांगण्यात आले.

## स्वच्छ वायू सर्वेक्षण -२०२६ : नागपूर शहराची उल्लेखनीय कामगिरी

### महाराष्ट्रात तिसरा क्रमांक

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने घोषित केलेल्या 'स्वच्छ वायू सर्वेक्षण - २०२६' च्या निकालांमध्ये नागपूर शहराने उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. १० लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांच्या श्रेणीमध्ये नागपूरने १८३.८ गुणांसह राष्ट्रीय स्तरावर १० वा क्रमांक मिळवला आहे. विशेष म्हणजे, या सर्वेक्षणात सहभागी झालेल्या महाराष्ट्रातील शहरांमध्ये नागपूरने तिसरा क्रमांक पटकावून राज्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

या यशाबद्दल आनंद व्यक्त करताना माननीय महापौर निता ठाकरे आणि मनपा आयुक्त डॉ.विपीन यांनी नागपूरकर जनतेचे अभिनंदन केले आहे. उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, सत्ता पक्ष नेता नरेंद्र (बाल्या) बोरकर यांनी सुद्धा याकामगिरीबद्दल जनतेचे अभिनंदन केले आहे.

महापौर निता ठाकरे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या नेतृत्वात नागपूर प्रगतीच्या वाटेवर वाटचाल करीत आहे. "नागपूरकरांचे आरोग्य आणि स्वच्छ हवा, हे आमचे मुख्य ध्येय आहे. या दिशेने आम्ही करत असलेल्या प्रयत्नांना हे यश यश मिळाले आहे. हे यश नागपूर शहराला देशातील प्रमुख राहण्यायोग्य शहरांपैकी एक बनवण्यासाठी प्रेरणादायी ठरेल."

मनपा आयुक्त डॉ विपीन यांनी प्रशासनाच्या आणि नागरिकांच्या सामूहिक प्रयत्नांना या यशाचे श्रेय दिले. "महापालिकेची स्वच्छ हवा कृती आराखडा प्रभावीपणे राबवण्यासाठी आमचे विविध विभाग आणि कर्मचारी सातत्याने काम करत आहेत. नागरिकांनी दिलेल्या सहकार्यामुळेच आपण हा टप्पा गाठू शकलो. यापुढेही वायू प्रदूषण कमी करण्यासाठी आणखी प्रभावी उपाययोजना राबवण्यात येतील," असे त्यांनी नमूद केले.

नागपूर महानगरपालिका तर्फे वायू प्रदूषण नियंत्रित ठेवण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असून यात मोठा सहभाग पर्यावरण पुरक इ बसेसचा आहे. नागपूरात वृक्षारोपणाचा महत्वकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या सुद्धा लाभ येणाऱ्या वर्षात पाहायला मिळणार आहे.

## हिलटॉप ले-आउटच्या प्लॉटधारकांच्या समस्या सोडविण्याची मागणी

### प्लॉट धारकांच्या समस्या व अडचणीचा तारणहार कोण? : रमेश पिसे



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

हिंगणा तालुक्यातील बूटीबोरी येथील हिलटॉप ले- आउटमधील प्लॉटधारकांच्या विविध समस्या व अडचणी सोडविण्यासाठी हिलटॉप ले- आउट बूटीबोरी प्लॉट धारकांची कृती समितीच्या वतीने पत्रपरिषदेत समितीचे समन्वयक प्रा.डॉ. रमेश पिसे यांनी प्लॉटधारकांच्या प्रश्नांकडे प्रशासन व संबंधित संस्थेचे लक्ष वेधले. कृती समितीच्या म्हणण्यानुसार, फिर्दोस को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटीच्या माध्यमातून १९९३ पासून हिलटॉप ले-आउटमध्ये मोठ्या प्रमाणात प्लॉट विक्री करण्यात आली. मात्र, अनेक वर्षे उलटूनही ठअ/ळड प्रक्रिया पूर्ण झालेली नसून प्लॉटधारकांना ७/१२ उतारे, विक्रीखत व ताबापत्र यांसह आवश्यक कागदपत्रांच्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे प्लॉटधारक आर्थिक व कायदेशीर अडचणीत सापडल्याचा आरोप समितीने केला.

मार्च २०२५ पासून कृती समिती स्थापन करून प्लॉटधारकांच्या प्रश्नांसाठी बैठका व संबंधित पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा करण्यात आल्याचे पत्र परिषदेत समितीने सांगितले. बूटीबोरी नगर पंचायतीचे नगर परिषदेत रूपांतर झाल्यानंतर ले-आउट विकासाबाबत प्रशासनाकडून प्रक्रिया सुरू असल्याची माहिती मिळाल्याचेही समितीने स्पष्ट केले. नवीन मोजणी व आखणी, प्लॉटधारकांना ७/१२ मिळवून देण्यासाठी सहकार्य, NA/TP प्रक्रिया पूर्ण करणे, बदललेल्या प्लॉटधारकांना न्याय देणे तसेच प्लॉटधारकांच्या संमती शिवाय भविष्यात व्यवहार न करणे, अशा विविध मागण्या समितीने सोसायटीकडे केल्या आहेत. तसेच ग्रुप अ, इ, उ, ऊ एव स्वतंत्र ले-आउटची नियमानुसार मोजणी करून नकाशे व फलक लावण्याची मागणी करण्यात आली आहे. आगामी काळात ले- आउटमधील मोजणी व आखणीचे काम करण्याचे नियोजन असून प्रत्येक प्लॉट मागे १,६०० रुपये जमा करण्याचे आवाहन प्लॉटधारकांना करण्यात आले आहे. प्रशासन, शासन व महसूल विभागाकडे प्रश्न मांडताना कृती समितीच्या माध्यमातून पाठपुरावा करण्याचेही यावेळी सांगण्यात आले. पत्रपरिषदेत यावेळी उपस्थित प्रा. डॉ.रमेश पिसे, उमेश रुषिया, किशोर वाशिमकर, अर्पित खंडेलवाल, मधुकर लोखंडे, संजय इनकाने आदी कृती समितीचे सदस्य उपस्थित होते.

## आजाद समाज पार्टीच्या आढावा बैठकीत कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आजाद समाज पार्टी (कांशीराम) च्यावतीने रविवारी रविभवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथे पक्षाची समीक्षा व आढावा बैठक उत्साहात पार पडली. आगामी काळातील पक्षाची संघटनात्मक बांधणी, विविध सामाजिक प्रश्नांवर पक्षाची भूमिका तसेच नागपूर जिल्हा व शहरातील पक्षाच्या कामकाजाचा आढावा यावेळी घेण्यात आला.

प्रदेश संपर्क प्रमुख उमेश हिवराडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला उमेश हिवराळे - महाराष्ट्र संपर्क प्रमुख पूर्व विदर्भाध्यक्ष नितीन नागदेवते, प्रदेश महासचिव तथा जिल्हा इन्चार्ज अॅड. संजय वानखेडे, प्रदेश महासचिव जे.बी. रामटेके, प्रदेश सचिव दिगंबर पलटणकर, जिल्हाध्यक्ष ओमूल तामगाडगे तसेच पश्चिम नागपूर निलेश राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकी दरम्यान नागपूर जिल्हा व शहरातील विविध भागांमधील अनेक कार्यकर्त्यांनी आजाद समाज पार्टीमध्ये प्रवेश केला. उमेश हिवराडे, नितीन नागदेवते व जिल्हाध्यक्ष ओमूल तामगाडगे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत या कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश केला.

आशिष निस्वादे यांची जिल्हा उपाध्यक्षपदी, शोएब कुरेशी यांची जिल्हा महासचिवपदी, तर विशाल बनसोड, सूरज पुराणिक आणि रोशन ठवरे यांची जिल्हा सचिवपदी नियुक्ती करण्यात आली. सद्भाऊ यांची शहर महासचिवपदी तर वैभव सोनटक्के यांची शहर सचिवपदी नियुक्ती करण्यात आली. याशिवाय असित पाटील यांची दक्षिण नागपूर विधानसभा अध्यक्षपदी, तर बादल बनसोड यांची दक्षिण- पश्चिम नागपूर विधानसभा अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. पक्षाच्या संघटनात्मक विस्ताराच्या दृष्टीने या नियुक्त्या महत्त्वपूर्ण मानल्या जात आहेत. यावेळी दीक्षाातई चौरे, अश्विन पाटील, विक्की वानखेडे, राजू मेश्राम, जुगनू डांगरे, अश्विन सोनटक्के, हर्षनंद तामगाडगे, अथांग करोडे, दीपक पाटील, अजय गायकवाड, अतिश शंभरकर, निखिल ढेंगरे आणि अतिश बनकर यांच्यासह अन्य कार्यकर्त्यांनीही पक्षात प्रवेश केला. बैठकीला शहर उपाध्यक्ष मेश्राम, उमरेड विधानसभा अध्यक्ष रवींद्र पाटील, कामठी विधानसभा अध्यक्ष थूल यांच्यासह पक्षाचे विविध विधानसभा, शहर व जिल्हा कार्यकारिणीतील पदाधिकारी उपस्थित होते.

## पचमढी यात्रेनंतर मावंद-कढाई पूजनाची परंपरा आमदार चरणसिंग ठाकूर यांनी जोपासली

### श्रावण सोमवारनिमित्त घोगरा येथील मन्नाथेश्वर देवस्थानात धार्मिक कार्यक्रम, भाविकांसह कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती



**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

श्रावण महिन्यातील पवित्र सोमवारचे औचित्य साधून नरखेड तालुक्यातील घोगरा येथील मन्नाथेश्वर देवस्थान येथे आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या वतीने मावंद व कढाई पूजनाचा धार्मिक कार्यक्रम भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. यानिमित्ताने परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घेतला.

मध्यप्रदेशातील सुप्रसिद्ध पचमढी येथील मोठा महादेव मंदिराच्या यात्रेला आमदार चरणसिंग ठाकूर हे आपल्या कार्यकर्त्यांसह गेले होते. मोठा महादेवाचे दर्शन घेऊन यात्रा करून आल्यानंतर मावंद करण्याची जुनी धार्मिक परंपरा असल्याचे सांगितले जाते. पूर्वजांपासून चालत आलेली ही परंपरा आजही श्रद्धेने जोपासली जात असून, आमदार चरणसिंग ठाकूर यांनीही ही परंपरा कायम ठेवत मन्नाथेश्वर देवस्थान येथे मावंद व कढाई पूजनाचे आयोजन केले.

श्रावण सोमवारच्या निमित्ताने मन्नाथेश्वर देवस्थान परिसरात सकाळपासूनच भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. विधिवत पूजा-अर्चा, कढाई पूजन आणि धार्मिक विधी पार पडल्यानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. या धार्मिक सोहळ्यामुळे घोगरा परिसरात श्रद्धा आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

यावेळी मन्नाथेश्वर देवस्थान समितीचे अध्यक्ष आमदार डॉ. आशिष देशमुख, दिनेशजी ठाकरे, राजूजी हरणे, नरेशजी अरसडे, समीरजी उमप, प्रवीणजी लोहे, भाजप जलालखेडा मंडळ अध्यक्ष अक्षय विरखडे, महामंत्री दिनेशजी चाफले, महामंत्री दिलेशजी ठाकरे, सतीशजी रेवतकर, महामंत्री मयूरजी दंढारे, माजी सभापती वसंत चांडक, जलालखेडा भाजपा महिला अध्यक्ष प्रतिक्षा दंढारे, रवी कनीरे, नाना मानकर, तुषार राऊत, उपसरपंच मनीष काटोले, पदवीधर संयोजक काटोल विधानसभा प्रफुल्लजी जोशी, युवा मोर्चा उपाध्यक्ष विक्की बन्नगरे यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. घोगरा, लोहारा, जुनेवाणी गट ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्य, पदाधिकारी तसेच परिसरातील ग्रामस्थ आणि भाविक मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थित होते. धार्मिक परंपरा जपण्यासोबतच सामाजिक एकोपा आणि भक्तीभाव वृद्धिंगत करणारा हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

**जुनी परंपरा, नवी पिढी**
**आणि अखंड श्रद्धा**

पचमढी येथील मोठा महादेवाच्या यात्रेनंतर मावंद करण्याची परंपरा केवळ धार्मिक विधी नसून श्रद्धा, संस्कृती आणि पूर्वजांनी जपलेल्या परंपरांचे प्रतीक मानली जाते. आधुनिक काळातही अशा परंपरा जपण्याचा प्रयत्न होत असल्याने या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com Epaper : epaper.sinhvani.com

# महिला आशिया चषक : मोहसिन नक्वींच्या उपस्थितीमुळे पुरस्कार सोहळ्याभोवती वादाचे सावट

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या रंगमंचावर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना म्हणजे केवळ २२ यार्डांच्या खेळपट्टीवरील चेंडू आणि बॅटचा संघर्ष उरत नाही, तर तो राजनैतिक संबंध, कोट्यवधी चाहत्यांच्या भावना आणि मैदानाबाहेरील प्रतिष्ठेचा एक तीव्र संघर्ष बनतो. गेल्या वर्षीच्या पुरुष आशिया चषक स्पर्धेतील वादग्रस्त क्षणांच्या कटू आठवणी अद्याप ताज्या असतानाच, आता महिला आशिया चषक स्पर्धेतही तशाच नाट्यमय घडामोडींची पार्श्वभूमी तयार होताना दिसत आहे.

आशियाई क्रिकेट परिषद (एसीसी) आणि पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे (पीसीबी) अध्यक्ष मोहसिन नक्वी १३ सप्टेंबर रोजी दुबई येथे होणाऱ्या महिला आशिया चषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यामुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेट वतुर्ळात पुन्हा एकदा जुन्या वादाची ठिणगी पडण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

### दुबईतील अंतिम सामना आणि नक्वींची उपस्थिती

जिओ सुपरच्या वृत्तानुसार, मोहसिन नक्वी महिला आशिया चषकाच्या अंतिम फेरीच्या समारोप समारंभाचे अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. आशियाई क्रिकेट परिषदेचे प्रमुख म्हणून विजेत्या संघाला चषक प्रदान करण्याचा शिष्टाचार त्यांच्याकडे जातो. मात्र, हीच औपचारिकता आता एका संभाव्य आंतरराष्ट्रीय पेचप्रसंगाचे केंद्रबिंदू बनली आहे.

हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला संघाने या संपूर्ण स्पर्धेत अप्रतिम सातत्य दाखवत उपांत्य फेरीत दिमाखात प्रवेश केला आहे. सद्यस्थितीतील खेळाचा दर्जा पाहता भारतीय महिला संघ विजेतेपदाचा प्रबळ दावेदार मानला जात आहे. जर भारतीय संघाने अंतिम फेरीत धडक मारून विजेतेपद पटकावले, तर मंचावर भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौर आणि मोहसिन नक्वी समोरासमोर येतील. गेल्या वर्षीच्या अनुभवावरून भारतीय संघ नक्वींच्या हातून चषक स्वीकारणार का, की पुन्हा एकदा ऐतिहासिक बहिष्काराची पुनरावृत्ती होणार, याकडे क्रिकेट विश्वाचे लक्ष लागले आहे.

### मैदानातील वाढता दुरावा: 'नो शेकहँड' प्रोटोकॉल

मैदानाबाहेरील तणावाचे प्रतिबिंब थेट खेळपट्टीवर आणि नाणेफेकीच्या वेळी स्पष्टपणे उमटताना दिसत आहे. चालू महिला आशिया चषकात भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेल्या साखळी सामन्यादरम्यान दोन्ही कर्णधारांमधील वाढता दुरावा उघड झाला.

भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौर आणि पाकिस्तानची कर्णधार फातिमा सना यांनी सामन्याच्या सुरुवातीला अथवा सामन्यानंतर पारंपरिक हस्तांदोलन टाळले. क्रिकेटमध्ये हस्तांदोलन हे परंपरेने खिलाडूवृत्तीचे प्रतीक मानले जाते. मात्र, दोन्ही देशांमधील तणावपूर्ण वातावरणामुळे खेळाडूंनी केवळ खेळावर लक्ष केंद्रित करत मैदानाबाहेरील संवादाला पूर्णपणे पूर्णविराम दिल्याचे पाहायला मिळाले.

ही घटना अचानक घडलेली नाही. गेल्या वर्षीच्या पुरुष आशिया चषकातही भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादव आणि पाकिस्तानचा कर्णधार सलमान अली आगा यांनी अशाच प्रकारे हस्तांदोलन टाळले होते. मैदानातील हा ताण केवळ खेळाडूंपुरता मर्यादित नसून तो दोन्ही देशांच्या क्रिकेट प्रशासकीय धोरणाचा एक भाग बनल्याचे स्पष्ट संकेत यातून मिळतात.






### २०२५ च्या पुरुष आशिया चषकातील तो हायव्होल्टेज ड्रामा

सध्याच्या चिंतेचे मूळ २०२५ च्या पुरुष आशिया चषकाच्या अंतिम सामन्यात घडलेल्या अभूतपूर्व नाट्यमय घडामोडींमध्ये दडलेले आहे. भारताने अंतिम फेरीत पाकिस्तानचा पराभव करत आशिया चषकावर आपले नाव कोरले होते. मात्र, त्यानंतर पुरस्कार वितरण सोहळ्यात जो राजकीय आणि प्रशासकीय पेच निर्माण झाला, त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेट वर्तुळालाही चक्रावून सोडले होते.

भारतीय संघाने सामना संपण्यापूर्वीच स्पष्ट केले होते की, ते मोहसिन नक्वी यांच्या हातून चषक स्वीकारणार नाहीत. नक्वी हे पाकिस्तानच्या अंतर्गत प्रशासनातील एक महत्त्वाचे राजकीय व्यक्तिमत्त्व असल्यामुळे आणि दोन्ही देशांतील राजकीय संबंध ताणलेले असल्यामुळे भारतीय संघ व्यवस्थापनाने हा पवित्रा घेतला होता. भारताचा हा आक्षेप माहीत असूनही मोहसिन नक्वी व्यासपीठावर चषक देण्यासाठी ठामपणे उभे राहिले. तब्बल अर्धा तास हा ताणतणाव मंचावर सुरू होता.

कर्णधार सूर्यकुमार यादव आणि संपूर्ण भारतीय संघाने मंचावर जाऊन नक्वी यांच्याकडून चषक घेण्यास ठाम नकार दिला. भारतीय व्यवस्थापनाची मागणी होती की, एसीसीच्या इतर कोणत्याही तटस्थ अधिकाऱ्याच्या हस्ते चषक दिला जावा. मात्र नक्वी मंचावरून हटायला तयार नव्हते आणि भारतीय संघ झुकण्यास तयार नव्हता. अखेर क्रिकेटच्या इतिहासातील अत्यंत विचित्र आणि तणावपूर्ण वातावरणात तो सोहळा पार पडला होता.

### महिला आशिया चषकासमोर संभाव्य पेचप्रसंग

पुरुष संघाच्या त्या ऐतिहासिक भूमिकेनंतर आता महिला आशिया चषकात बीसीसीआय आणि भारतीय महिला संघ कोणती रणनीती अवलंबणार, यावर जोरदार चर्चा सुरू आहे.

पहिला संभाव्य पेच म्हणजे, जर मोहसिन नक्वी स्वतः मंचावर उपस्थित राहिले आणि भारताने विजेतेपद पटकावले, तर कर्णधार हरमनप्रीत कौर चषक स्वीकारण्यास थेट नकार देऊ शकते. यामुळे राजनैतिक आणि क्रीडा पातळीवर नवा वाद पेटेल, तसेच आशियाई क्रिकेट परिषदेच्या कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण होईल.

दुसरा मार्ग म्हणजे पयार्यी प्रोटोकॉलचा वापर करणे. अंतिम क्षणी होणारा वाद टाळण्यासाठी एसीसीच्या उपाध्यक्षपदी असलेले इतर पदाधिकारी किंवा अमिराती क्रिकेट बोर्डाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे चषक देण्याची जबाबदारी सोपवली जाऊ शकते. यामुळे खेळाचे वातावरण सुरक्षित राहील आणि वादावर तात्पुरता तोडगा निघू शकेल.

तिसरा पैलू म्हणजे पाकिस्तानी क्रिकेट बोर्डाची आणि नक्वींची स्वतःची भूमिका. जर नक्वी एसीसीचे अध्यक्ष या नात्याने आपल्या अधिकारांवर ठाम राहिले, तर पुरस्कार वितरण सोहळ्यात पुन्हा एकदा पुरुष आशिया चषकासारखाच अर्ध्या तासाचा मोठा पेचप्रसंग उद्भवू शकतो.

### प्रशासकीय हालचाली आणि खेळाडूंचे लक्ष

मोहसिन नक्वी यांच्या महिला आशिया चषकातील उपस्थितीमुळे एसीसीच्या अंतर्गत प्रशासनावरही ताण वाढला आहे. एकीकडे खेळाडू मैदानात घाम गाळून चॅम्पियन बनण्याचे स्वप्न पूर्ण करत असताना, अशा प्रशासकीय वादामुळे खेळाडूंच्या कामगिरीपेक्षा वादांचीच चर्चा अधिक रंगते.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) अद्याप यावर अधिकृत भाष्य केलेले नाही. मात्र सूत्रांच्या माहितीनुसार, दुबईतील भारतीय दूतावास आणि बीसीसीआयच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांमध्ये समन्वय साधला जात आहे, जेणेकरून मंचावर भारतीय खेळाडूंची कोणतीही अडचण होणार नाही आणि खेळाडूंचा सन्मानही राखला जाईल.

दुसऱ्या बाजूला, भारतीय महिला संघ सध्या उत्कृष्ट फॉर्मात असून त्यांचे संपूर्ण लक्ष उपांत्य आणि अंतिम सामना जिंकण्यावर केंद्रित आहे. हरमनप्रीत कौरच्या आक्रमक नेतृत्वाखाली संघ मैदानाबाहेरील दबावाला बळी पडणारा नाही, हे स्पष्ट आहे. १३ सप्टेंबर रोजी दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर केवळ आशियातील सर्वोत्तम महिला संघ कोण, याचाच फैसला होणार नाही; तर मैदानाबाहेरील प्रशासकीय वर्चस्वाच्या लढाईचा दुसरा अंक कसा रंगतो, हे पाहणे जागतिक क्रिकेटसाठी अत्यंत उत्कंठावर्धक ठरणार आहे.

– ९०९६३७२०८२

# साक्षरता दिनः लोकांचे प्रबोधन करण्याचे स्तुत्य प्रयत्न

आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन दरवर्षी ८ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. हा दिवस साक्षरतेचे महत्त्व आणि शिक्षणाचे अधिकार यावर जागरूकता वाढवण्यासाठी साजरा केला जातो. साक्षरता ही व्यक्तीच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. साक्षरतेच्या अभावामुळे व्यक्ती आणि समाज दोघेही मागे राहू शकतात. युनेस्कोने सन १९६६ मध्ये ८ सप्टेंबर या दिनाची स्थापना केली, त्याचा उद्देश जगभरातील साक्षरतेच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करणे आणि शिक्षणाच्या सार्वत्रिक हक्काची पूर्तता करणे होता. अनेक देशांमध्ये अजूनही साक्षरतेचा अभाव आहे, विशेषतः महिला आणि मुली यांच्यामध्ये. अशा परिस्थितीत, साक्षरतेची गती वाढवणे आणि साक्षरतेसाठी प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे.

साक्षरता केवळ वाचन-लेखन यापुरती मर्यादित नाही, तर ती व्यक्तीच्या विचारक्षमतेचा, आत्मविश्वासाचा आणि समाजातील सहभागाचा आधार आहे. साक्षर लोक स्वतःच्या आणि आपल्या कुटुंबाच्या जीवनात अधिक सकारात्मक बदल घडवू शकतात. आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाच्या निमित्ताने, आपण सर्वांनी शिक्षणाच्या महत्त्वाची जाणीव ठेवून, समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी एकत्र येऊन प्रयत्न करणे गरजेचे आहे. शिक्षण आणि साक्षरता यामुळेच आपला समाज खऱ्या अर्थाने समृद्ध आणि प्रगतिशील होऊ शकतो.

**साक्षरता म्हणजे काय? मूळ अर्थ** – केवळ सही करता येणे किंवा अक्षरांची ओळख असणे म्हणजे साक्षरता नव्हे, तर ज्ञानार्जनासाठी लिपीचा वापर करण्याची कार्यक्षमता म्हणजे साक्षरता होय. भारतात सात वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वयाची व्यक्ती किमान एका भाषेत लिहू, वाचू आणि बोलू शकत असेल तर त्याला साक्षर मानले जाते. साक्षरता म्हणजे एखाद्या व्यक्तीला कोणतीही एक भाषा लिहिता, वाचता आणि समजता येण्याची क्षमता होय.

**साक्षरतेचे महत्त्व व व्यक्तिमत्त्व विकासः** साक्षरतेमुळे व्यक्तीचा आत्मविश्वास वाढतो आणि योग्य-अयोग्य समजण्याची क्षमता विकसित होते.

**प्रगतीचा मार्ग** : निरक्षरता हा देशाच्या आणि राज्याच्या प्रगतीमधील मोठा अडथळा आहे. साक्षर समाजामुळे देश आर्थिक व सामाजिक दृष्ट्या प्रगत होतो.जीवन कौशल्येः साक्षरतेमध्ये आता डिजिटल साक्षरता, आर्थिक साक्षरता आणि आरोग्याची जागरूकता यांचाही समावेश होतो.

**निरक्षरतेमागील कारणे:** देशाचा मोठा भाग अजूनही निरक्षरतेशी झुंजत आहे. अशा परिस्थितीत निरक्षरतेमागील कारण काय आहे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहेः- १) कौटुंबिक मानसिकताः कौटुंबिक मानसिकता हे निरक्षरतेचे सर्वात मोठे कारण बनते कारण अजूनही भारतातील अनेक भागात असे पालक आहेत जे त्यांच्या सनातनी विचारसरणीने त्रस्त आहेत. ते अभ्यासाला व्यर्थ मानतात आणि त्याऐवजी मुलांना कामावर आणण्याला महत्त्व देतात. बहुतेक मुलींच्या बाबतीत असे घडते ज्यांच्या पालकांना वाटते की मुली अधिक शिकल्या तर हाताबाहेर जातील. २) पालकांची निरक्षरताः बरेच पालक स्वतः निरक्षर आहेत, त्यामुळे त्यांना शिक्षणाचे महत्त्व इतके चांगले समजत नाही आणि ज्या पालकांना आपल्या मुलांना शिक्षण द्यायचे असेल त्यांना हे देखील माहित नसेल की कृपया मुलांचे प्रवेश आणि इतर प्रक्रिया काय कराव्यात, कारण जे ते मुलांना शिकवू शकत नाहीत. ३) कौटुंबिक पाठिंब्याचा अभावः अनेक मुलांना शिक्षण घ्यायचे असते परंतु पुरेशा कौटुंबिक पाठिंब्याअभावी ते त्यांचा अभ्यास पूर्ण करू शकत नाहीत. ४) गरिबीः- गरिबी हे निरक्षरतेचे एक मोठे कारण आहे, कारण अनेक पालक गरिबीमुळे आपल्या मुलांना शिक्षण देऊ शकत नाहीत. त्यामुळे निरक्षरतेच्या कारणांकडे लक्ष देऊन ते दूर करण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.

**साक्षरता वाढवण्याचे मार्ग** : देशभरात साक्षरता पसरवण्यासाठी विविध पद्धती अस्तित्वात आहेत, यापैकी बहुतांश पद्धती सरकार आणि विविध स्वयंसेवी संस्थांनी वापरल्या आहेत. साक्षरतेला चालना देण्यासाठी खालील काही मार्ग आहेतः- १) मोफत शिक्षणः- देशात असे अनेक लोक आहेत जे गरिबीमुळे शाळेची फी भरू शकत नाहीत आणि आपल्या मुलांना या शाळांमध्ये दाखल करू शकत नाहीत. त्यामुळे मुलांना मोफत शिक्षण देण्याची गरज आहे. याच भागात, सन १९९३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने "उन्नीकृष्णन निकाला"मध्ये १४ वर्षांपर्यंतच्या मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण हा संविधानाच्या कलम २१ अन्वये मूलभूत अधिकार म्हणून दिला. त्यानंतर सन २००३ मध्ये संविधानातील शिक्षणाच्या अधिकारांतर्गत मोफत शिक्षण देण्यात येऊ लागले.

**जागरूकताः**– सतत शिक्षणाविषयी जागरूकता पसरवण्याच्या उद्देशाने अनेक सरकारी, गैर-सरकारी आणि स्थानिक संस्थांद्वारे अनेक मोहिमा चालवल्या जातात. या मोहिमांचा फायदा असा आहे की ते आपल्या मुलांना शाळेत का पाठवणे महत्त्वाचे आहे याबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण करतात. जनजागृतीतूनच शिक्षणाचे महत्त्व प्रत्येकाच्या मनात बिंबवले जाऊ शकते, म्हणूनच या जनजागृती मोहिमा वाढवणे आवश्यक आहे. ३) शिष्यवृत्तीः- शिष्यवृत्ती, अनुदान आणि अनुदानासारख्या योजना गरीब कुटुंबातील किंवा अत्यंत मागासलेल्या जातीतील मुलांसाठी लागू कराव्यात, कारण या योजनांमुळे मुलांना अधिक अभ्यास करण्यास प्रोत्साहन मिळेल. मात्र सध्या अशा अनेक योजना राबविल्या जात आहेत. मात्र खराब व्यवस्थेमुळे अनेक विद्यार्थ्यांना या सुविधांचा लाभ मिळत नाही. ४) मोफत पुस्तके :- मुलांमध्ये शिकण्यास प्रोत्साहन देण्यासाठी शाळांनी मोफत पुस्तकांचे वाटप करणे आवश्यक आहे. तसे, तर या सेवेचा लाभ सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांना उपलब्ध आहे. सरकारी शाळेतील मुलांना इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत मोफत पुस्तके दिली जातात, त्यानंतर त्यांना स्वतः पुस्तके खरेदी करावी लागतात. मात्र, खासगी शाळांमधील मुलांना ही सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे हे मुद्दे लक्षात घेऊन सरकारने धोरणे राबवली, तर देशात एकही मूल निरक्षर राहणार नाही, असे आपण म्हणू शकतो.

– श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी.
गडचिरोली – ९६९९८३६७१७

# डॉ. प्रशांत गायकवाड़ राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार से सम्मानित

## गुरु-शिष्य परंपरा के माध्यम से भारतीय कला-संस्कृति और शिक्षा के प्रसार के लिए मिला सम्मान

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पीडीडीयू नगर, चंदौली। शिक्षक दिवस के अवसर पर न्यू ग्लोबल रिसर्च फाउंडेशन, पीडीडीयू नगर, चंदौली द्वारा आयोजित सम्मान समारोह में देश के विभिन्न राज्यों एवं जनपदों से आए ४० से अधिक शिक्षकों को 'बेस्ट टीचर अवार्ड-२०२६' से सम्मानित किया गया। समारोह में शिक्षा, समाजसेवा और राष्ट्र निर्माण के क्षेत्र में उल्लेखनीय योगदान देने वाले शिक्षकों एवं विशिष्ट व्यक्तित्वों का अभिनंदन किया गया।

कार्यक्रम के मुख्य अतिथि डॉ. एच. के. सिंह, हेड एवं डीन, फैकल्टी ऑफ कॉमर्स, बीएचयू, वाराणसी तथा विशिष्ट अतिथियों में संजीव कुमार, आईपीएफ, रेलवे प्रोटेक्शन फोर्स, दानापुर मंडल, डॉ. प्रशांत गायकवाड़, राष्ट्रपति द्वारा सम्मानित तबला वादक एवं शिक्षाविद, नागपुर (महाराष्ट्र) तथा डॉ. शादाब अली सिद्दीकी, फाउंडर एवं डायरेक्टर, एक्सीलेंस आयुर्वेद अकादमी, अंबेडकर नगर सहित अनेक गणमान्य अतिथि रहे।

समारोह में डॉ. प्रशांत गायकवाड़ को राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार से सम्मानित किया गया। भारतीय शिक्षा परंपरा में निहित गुरु-शिष्य परंपरा को आधुनिक शिक्षा एवं भारतीय कला-संस्कृति से जोड़कर बच्चों के सर्वांगीण विकास के लिए किए जा रहे उनके प्रयासों को सम्मान का प्रमुख आधार बताया गया। उन्हें पुरस्कार स्वरूप अंगवस्त्र, स्मृति-चिह्न एवं प्रमाण-पत्र प्रदान किया गया।

डॉ. गायकवाड़ भारतीय शास्त्रीय संगीत, विशेषकर तबला वादन और संगीत शिक्षा के क्षेत्र में लंबे समय से सक्रिय हैं। उनके कार्यों में विद्यार्थियों को संगीत एवं भारतीय संस्कृति से जोड़ना, विभिन्न स्थानों पर कार्यशालाओं और सेमिनारों का आयोजन तथा आर्थिक रूप से कमजोर वर्गों के बच्चों तक शिक्षा एवं कला प्रशिक्षण पहुँचाने के प्रयास शामिल हैं।

डॉ. गायकवाड़ के नाम लगातार लगभग १४ दिनों तक तबला वादन से संबंधित विश्व रिकॉर्ड जुड़ा हुआ है। इसके अतिरिक्त, उनके द्वारा विभिन्न ४७ देशों के प्रतिनिधि कलाकारों को भारतीय संगीत, कला, संस्कार एवं ज्योतिष से संबंधित प्रशिक्षण उनकी उपलब्धियों में किया जाता है। इन उपलब्धियों के लिए उन्हें विभिन्न राष्ट्रीय स्तर के सम्मानों सहित , वर्ल्ड रिकार्ड से सम्मानित किया गया है।

शिक्षा के क्षेत्र में उनके योगदान का एक महत्वपूर्ण पक्ष विद्यार्थियों के लिए निःशुल्क एवं सामाजिक सरोकारों से जुड़े प्रशिक्षण कार्यक्रम हैं। उनके अनुसार, अब तक लगभग २४,००० विद्यार्थियों को शिक्षा एवं प्रशिक्षण उपलब्ध कराने का प्रयास किया गया है। वे संगीत, तबला, नृत्य एवं गायन के माध्यम से विद्यार्थियों में भारतीय संस्कृति और रचनात्मकता विकसित करने के लिए विभिन्न कार्यक्रमों में सक्रिय रहते हैं।

डॉ. गायकवाड़ सामाजिक रूप से वंचित एवं शिक्षा से दूर बच्चों को मुख्यधारा की शिक्षा से जोड़ने के लिए भी कार्य करते रहे हैं। वे विद्यालयों और विभिन्न संस्थानों में सेमिनार एवं कार्यशालाओं के माध्यम से बच्चों को शिक्षा, संस्कार, कला और व्यक्तित्व विकास के प्रति प्रेरित करते हैं। 'बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ' से जुड़े जागरूकता एवं बालिका आत्मरक्षा कार्यक्रमों में भी उनके योगदान का उल्लेख किया गया है।

उनकी शैक्षणिक एवं सांस्कृतिक यात्रा में भारत सरकार के संस्कृति मंत्रालय के उउफळ से संबंधित शोध फेलोशिप, संगीत विषय में UGC-NET तथा विभिन्न शैक्षणिक एवं सांस्कृतिक संस्थानों से जुड़े दायित्व भी महत्वपूर्ण रहे हैं। वे भारतीय विद्या भवन, सिविल लाइन्स, नागपुर में तबला (संगीत)शिक्षक के रूप में भी कार्यरत हैं। इसके साथ ही स्काउट्स एंड गाइड्स से जुड़े सामाजिक दायित्वों में उन्होंने Assistant District Commissioner के रूप में योगदान दिया है तथा Medal of Merit से सम्मानित किए जा चुके हैं।



डॉ. गायकवाड़ का संबंध नागपुर के संघ बिल्डिंग, महल क्षेत्र से है और वे पारंपरिक संगीत परिवार से आते हैं। उनके परिवार में पीढ़ियों से हार्मोनियम तबला, तानपुरा जैसे वाद्ययंत्रों के निर्माण एवं संगीत परंपरा से जुड़ा संस्कार रहा है। इस पारिवारिक परंपरा के कारण विभिन्न ख्यातनाम संगीतकारों, गायकों और वादकों का उनके परिवार से संपर्क रहा है। इसी सांस्कृतिक विरासत को आगे बढ़ाते हुए डॉ. गायकवाड़ ने शिक्षा, संगीत और भारतीय संस्कृति को अपने सामाजिक कार्यों का माध्यम बनाया।

न्यू ग्लोबल रिसर्च फाउंडेशन द्वारा आयोजित इस समारोह में उत्तर प्रदेश के विभिन्न जनपदों के अलावा महाराष्ट्र, उत्तराखंड, नई दिल्ली, प्रयागराज, अंबेडकर नगर, कानपुर सहित अनेक स्थानों से आए शिक्षकों ने सहभागिता की। समारोह में शिक्षकों को स्मृति-चिह्न, प्रमाण-पत्र, प्रतीक-चिह्न एवं अंगवस्त्र प्रदान कर सम्मानित किया गया। कार्यक्रम में आयोजन को सहयोग प्रदान करने वाले विभिन्न शैक्षणिक संस्थानों, सामाजिक संगठनों एवं मीडिया संस्थानों का भी सम्मान किया गया। संस्था के जिला जनरल सेक्रेटरी डॉ. विकास गर्ग एवं ऑर्गेनाइजेशन सेक्रेटरी डॉ. पल्लव प्रजापति सहित आयोजन समिति के सदस्यों ने अतिथियों एवं सम्मानित शिक्षकों का स्वागत एवं अभिनंदन किया।

समारोह में उपस्थित प्रबुद्ध नागरिकों, शिक्षकों, समाजसेवियों एवं गणमान्य व्यक्तियों ने कहा कि शिक्षा केवल पुस्तकीय ज्ञान तक सीमित नहीं है, बल्कि संस्कार, संस्कृति, अनुशासन और सामाजिक जिम्मेदारी का निर्माण भी उसका महत्वपूर्ण उद्देश्य है। इसी दृष्टिकोण से डॉ. प्रशांत गायकवाड़ द्वारा भारतीय कला एवं संस्कृति को शिक्षा का माध्यम बनाकर नई पीढ़ी तक पहुँचाने के प्रयासों को सम्मान मिलना शिक्षा एवं संस्कृति के क्षेत्र के लिए गौरव का विषय है। शिक्षक दिवस के अवसर पर मिला यह सम्मान डॉ. प्रशांत गायकवाड़ की दीर्घकालीन शैक्षणिक, सांस्कृतिक एवं सामाजिक यात्रा में एक और महत्वपूर्ण अध्याय के रूप में देखा जा रहा है।